

# तीन मुलांचे चार दिवस

आदर्श । विकास । श्रीकृष्ण



891.463 03
45719

# नक्षल्यांकडून अपहृत तिघा युवकांची सुटका

## छत्तीसगडमधील थरारनाट्य; दोघे कराडचे, एक पुण्याचा; राज्यपाल श्रीनिवास पाटील यांच्यासह पत्रकाराची शिष्टाई सफल



नक्षलवाद्यांच्या तावडीतून सुटका झाल्यानंतर युवकांना सरकारने हेलिकॉप्टरने सुकमा विमानतळावर आणल्यानंतरचे छायाचित्र.

# पुण्यातील तीन विद्यार्थ्यांचे नक्षलवाद्यांकडून अपहरण

प्रतिनिधी, नागपूर

नक्षलग्रस्त भागाचा अभ्यास करण्यासाठी सायकलवरून गेलेल्या पुण्यातील तीन विद्यार्थ्यांचे नक्षलवाद्यांनी छत्तीसगडमध्ये अपहरण केले. या वृत्ताला बस्तरचे पोलीस महानिरीक्षक कल्लुरी यांनी दुजोरा दिला. या विद्यार्थ्यांची नावे समजू शकलेली नाहीत.

नक्षलग्रस्त भागातील लोकांशी संवाद साधून त्यांच्या समस्या जाणून घेण्याच्या हेतूने पुण्यातील हे विद्यार्थी नक्षलग्रस्त भागात फिरत आहेत. या विद्यार्थ्यांनी महाराष्ट्रातील नक्षलग्रस्त भागातून या मोहिमेला सुरुवात केली होती.

महाराष्ट्र, छ…
ओदिशाच्या नक्ष…
फिरायचे, तेथील…
त्यांच्या समस्या…
विद्यार्थ्यांचा उप…
त्यांनी हा सायकर…
शनिवारी विजाप…
असताना नक्षल…
केल्याची माहिर…
पापाराव ने त्यांचे…
या वृत्ताला बस्त…
कल्लुरी यांनी दुजो…

# पुण्याच्या तिघांची नक्षलवाद्यांकडून सुटका

## पोलीस व नागपूरच्या पत्रकाराच्या प्रयत्नांना यश

वार्ताहर, गडचिरोली / कराड

नक्षलवाद्यांनी अपहरण केलेल्या तीन विद्यार्थ्यांची पोलिसांच्या विशेष प्रयत्नांमुळे रविवारी सुटका झाली. हे विद्यार्थी मूळचे सातारा जिल्ह्यातील असून पुण्यात शिक्षणासाठी वास्तव्यास होते. याकामी नागपूरच्या एका पत्रकाराने महत्त्वाची भूमिका बजावली आहे.

कराड तालुक्यातील काले येथील आदर्श दीपक पाटील (वय २२), उंडाळे-शेवाळेवाडीचा श्रीकृष्ण पांडुरंग शेवाळे (वय २२) व त्यांचा मित्र विकास ज्ञानेश्वर वाळके (२२, रा. वाघोली, पुणे) हे तीन युवक भारत जोडो अभियानांतर्गत पुणे-भामरागड-दंतेवाडा ते मलखानगिरी अशा महाराष्ट्र-छत्तीसगड-ओदिशा या तीन राज्यांच्या सायकल यात्रेसाठी पुण्याहून निघाले होते. २३ डिसेंबर २०१५ रोजी ते नागपूर येथून निघून गडचिरोली जिल्ह्यातील हेमलकसा येथे पोहोचले. छत्तीसगडच्या विजापूरहून २१ डिसेंबरला बसेगुडा येथे … नक्षलवाद्यांनी



परिसरात एकच खळबळ माजली. अनेकांनी दूरचित्रवाहिन्यांवर सातत्याने या घटनेचे वृत्त दिले जात होते. त्यातच या तरुणांची सुटका केल्याची बातमी आल्यावर साऱ्यांनी सुटकेचा निश्वास टाकला. आदर्श हा पुण्याच्या एसपी कॉलेजमध्ये इतिहास विषयातून एम. ए. तर श्रीकृष्ण शेवाळे पुणे विद्यापीठात संस्कृत विषयातून एम. ए. करीत आहे. याचबरोबर हे दोघे यूपीएससी व एमपीएससी परीक्षेचा सरावही करीत असून, आदिवासी जीवनाचा अभ्यास हा त्यांचा छंद होता. यातूनच गतवर्षी …

पालकांशी मोबाईलवरून संपर्क साधत. २७ डिसेंबरला सायंकाळी उशिरा आदर्शचे आई, वडिलांशी बोलणे झाल्यानंतर मात्र त्याचा मोबाईल बंद झाला. अशातच आज सकाळी आदर्शसह श्रीकृष्ण व विकास वाळके यांचे नक्षलवाद्यांनी अपहरण केल्याच्या वृत्ताने खळबळ माजली.

या तिघांच्या सुटकेसाठी सिक्कीमचे राज्यपाल श्रीनिवास पाटील यांचे पुत्र सारंग पाटील, काले येथील पत्रकार संभाजी थोरात व फलटणचे नगरसेवक अनुप शहा यांनी प्रयत्न केले. दुपारी तिन्ही तरुणांची सुटका झाल्यावर

# नक्षलग्रस्त भागातील आदिवासी दहशतीखाली

## माओवाद्यांकडून सुटका झालेल्या युवकांची माहिती

सकाळ वृत्तसेवा

गडचिरोली, ता. ५ : "नक्षलवाद्यांनी अपहरण केल्याने …ांततेसाठी देशभ्रमण करण्याच्या …नसिकतेला जबर धक्का …सला. आदिवासी लोक त्यांच्या …शतीखाली वावरत आहेत. मात्र, …िही आपण समाजासाठी काम …. नक्षलग्रस्त भागातील आदिवासी …ठ असून, त्यांची संस्कृतीसुद्धा …ी आहे," असे मत विकास …, आदर्श पाटील व श्रीकृष्ण यांनी व्यक्त केले.

…ण्यातील हे तिघेही गेल्या …ात 'भारत जोडो' …दरम्यान शांतीयात्रेवर …ड राज्यात गेले होते. …ांनी अपहरण करून त्यांना …स जंगलात ठेवले होते. …टील म्हणाले, "गडचिरोली …सगड राज्यातील नक्षलग्रस्त आदिवासींची संस्कृती …े जोडण्यासाठी आम्ही या कलचारे भ्रमंतीचा निर्णय घेतला होता. यापूर्वीसुद्धा या भागात आम्ही येऊन गेलो होतो; परंतु असा प्रसंग उद्भवेल, असे कधीच वाटले नव्हते. बस्तरमधील सुकमा भागात बासागुडा गावालगत नक्षलवाद्यांनी आमचे अपहरण केले. नक्षलवाद्यांनी आम्हाला तावडीत घेतले. पोलिस विभाग किंवा गुप्तवार्ता विभागाचे असल्याच्या संशयावरून आमची चौकशी केली. मोबाईल, नकाशा, कॅमेरे तपासून बघितले. पहिले दोन दिवस एका गावातच ठेवले. भाषेच्या अडचणींमुळे आमचे म्हणणे त्यांना समजले नाही. मात्र, जेवणापासून सर्व सुविधा गावातच पुरविल्या. एकाच ठिकाणी ठेवून गावकरी आमच्यावर नजर राखून होते. दोन दिवसांनंतर दोन गणवेशधारी माओवाद्यांनी आम्हाला जंगलात नेले. तेथे कसून चौकशी केल्यानंतर पाचव्या दिवशी आम्हाला सोडण्यात आले. त्यानंतर आम्ही बस्तरकडे निघालो."

या कालावधीत माओवाद्यांकडून कुठल्याच प्रकारचा त्रास झाला नसल्याचेही या तरुणांनी सांगितले.



# Maoists release kidnapped boys

## Trio went missing while on cycle rally for Bharat Jodo mission; they were abducted in Bastar, Chhattisgarh, in late December

Mubarak Ansari
TWEET @ThePuneMirror

Three youths from Pune, who were allegedly abducted by Maoists while on a bicycle rally to spread the message of peace and 'understand the Bharat within India', have been released by the rebels in Chhattisgarh's Sukma district. They will soon be brought to Pune. The youths — Aadarsh Patil (21), Vilas Walke (21) and Shrikrishna Shevale (21) — studied at SP College in the city.

Pune police joint commissioner Sunil Ramanand and ACP Bhanupratap Barge, in-charge of the Anti-Terrorism Squad's (ATS) Pune unit, confirmed that the boys are safe.

The youths had travelled across Maharashtra and entered Chhattisgarh. They also posted photos of their trip along the rivers and jungles. Police officials said that according to the last phone location, the trio was in the Basaguda area of Chhattisgarh.



The youths after their rescue on Sunday

The abduction came to light when the Nagpur police were reportedly informed by someone from Chhattisgarh, following which the local police were roped in to secure the boys' release. The first thing Chhattisgarh police did was to suspend all anti-Maoist operations in Bastar.

IGP, Bastar Range, SRP Kalluri, said, "The three youths were abducted from Basaguda area of neighbouring Bijapur district and kept at Timmapuram village near Chinger under Jagargunda police station limits. They were under the custody of Maoist commander Papa Rao. After receiving news of the abduction, police suspended all anti-Maoist operations in south Bastar. Later, the police were able to locate the whereabouts of the three youths, following which talks were held with the abductors through various means to secure their safe release."

Kalluri, however, did not reveal details about the negotiations with the abductors. "The youths were released and brought safely to the Chintalnar police camp from where they have been flown back to Maharashtra," he added.

The trio had launched a cycle rally from Pune on December 22 under their Bharat Jodo campaign to propagate the message of peace in Maharashtra, Chhattisgarh and Odisha — the states worst affected by Naxalism over the past three decades. The planned to conclude their rally in Balameta, Odisha, on January 12.

Speaking to *Mirror*, Walke's sister, Madhumati, said, "We were unable to reach him for the last few days and were shocked when we heard of the kidnapping. This was the first time they went outside the state for the Bharat Jodo mission. He spoke to us on Sunday evening and said they are all safe."

Walke hails from Perne village in Pune district, while Patil is from Karad and Shewale from Patan, both in Satara district. Walke and Patil hold degrees in geography and history, respectively, from SP College and are preparing for competitive exams.

Patil's father, Deepak, said he is yet to speak to his son. "However, I have been told by the police that he is safe," he said from Karad.

# अपहरणानंतरचे ९६ तास अतिशय थरारक!

## पुण्यातील तिघा तरुणांसाठी क्षणोक्षणी जिवाच्या भीतीचा अनुभव

वार्ताहर, गडचिरोली

नक्षलवाद्यांकडून झालेल्या अपहरणानंतरचा ९६ तासांचा अनुभव अतिशय थरारक होता. बस्तरच्या किर्र जंगलात क्षणोक्षणी जिवाची भीती वाटत होती. नक्षलवादी आता ठार मारतील, उद्या ठार करतील, अशी भीती मनात होती, परंतु चार दिवसांत नक्षलवाद्यांनी साधी थापडही मारली नाही, अशी माहिती पुण्याच्या आदर्श पाटील, विकास वाळके व श्रीकृष्ण शेवाळे या तिघांनी सुटकेनंतर पत्रकारांशी बोलताना दिली.

भारत जोडो अभियानासाठी पुणे-भामरागड-दंतेवाडा ते मलकानगिरी अशा महाराष्ट्र-छत्तीसगड-ओदिशा या नक्षलग्रस्त तीन राज्यांत सायकल यात्रेकरिता पुण्याहून निघालेल्या व नक्षलवाद्यांनी अपहृत केलेल्या या तरुणांची रविवार, ३ जानेवारीला सुटका केल्यावर जगदलपूर पोलिसांनी त्यांना बुधवारी पहाटे गडचिरोली पोलिसांच्या सुपूर्द केले. या वेळी त्यांनी अपहरणानंतरच्या ९६ तासांचा थरार कथन केला. ते म्हणाले, २२ डिसेंबर २०१५ रोजी नागपूरहून निघून आम्ही गडचिरोली जिल्ह्यातील भामरागड तालुक्यातील हेमलकसाला पोहोचले. यानंतर २५ ते २८ डिसेंबर असा मौजा बेद्रे, कारकेली, बैरमगड प्रवास करून छत्तीसगडच्या बिजापूरला व २९ डिसेंबरला बसेगुडाला पोहोचले. येथेच



नक्षलवाद्यांच्या तावडीतून सुटका झालेले पुण्याचे तीन युवक.

एका आश्रमशाळेलगत पाणी पित असताना सशस्त्र नक्षलवाद्यांनी आम्हाला चारही बाजूंनी घेरून अपहरण केले. आम्ही घाबरलेले होतो. आमची चौकशी करून हातपाय बांधून गावात नेले. यावेळी संपूर्ण गावाने आम्हाला घेरलेले होते, परंतु गावकरी कोण आणि नक्षलवादी कोण, हाच प्रश्न होता. यावेळी तेथे दोन गणवेशधारी नक्षलवादी आमची चौकशी करीत होते. पहिला दिवस तर भीतीने गाळण उडाली. मात्र, त्यांनी आम्हाला किर्र जंगलातील बालागुंडम या गावात गावकऱ्यांकडेच ठेवले. तेथेच आम्हाला रात्री वरणभात खायला देऊन पाणी देण्यात आले. तेथेच आम्ही रात्र काढली. दुसऱ्या दिवशी त्याच परिसरातील दुसऱ्या गावात पायीच नेण्यात आले. ही गावे नेमकी कोणती, याबद्दलची माहिती नाही.

नक्षलवाद्यांनी पुन्हा आमची चौकशी केली. यावेळी नक्षलवादी आपापसात गोंडी, छत्तीसगढी व हिंदी व झाडीपट्टी भाषेत बोलत होते. यातील काहींनाच हिंदी समजत होती, तसेच वारंवार नक्षली नेत्यांशी संपर्क करून आमची माहिती देत होते. आम्ही पोलिस दलातील नाहीत, हे स्पष्ट झाल्यावर त्यांनी आमचे हातपाय मोकळे केले. यानंतर आम्ही सलग चार दिवस याच परिसरातील गावांमध्ये मुक्कामी होतो. सकाळ व रात्रीचे जेवण त्यांच्याच सोबत घ्यायचो. आम्हाला ज्या गावांमध्ये ठेवण्यात आले होते तेथील लोकांना भाषा, कपडे, सायकल व कपडे याची साधी माहिती सुध्दा नाही. अतिशय मागासलेला परिसर होता. तेथे अर्धनग्न लोक होते. महिलाही ...

# Maoists release city students in Chhattisgarh

Times News Network



...e and Shrikrishna Shewale

**Raipur:** After four days in Maoist captivity, three students from Pune were released on Sunday in Chhattisgarh.

The students were on a cycle rally from Pune to Malkangiri in Odisha to promote peace when they went missing from Bijapur district.

They were brought to Chin...

...Shewale's cousin told T... he youths had left Pune f... Nagpur, Telangana and Chh... isgarh on their 21-gear bic... les. They last made contact ... December 28 informing t... amily that they were in Chh... isgarh, the cousin said.

The youths went missi... rom the thick forested regi... n Basaguda area of Bijap... istrict. They were on a 'Bh... at Jodo' abhiyan sending ... he message of peace in Mah... ashtra, Chhattisgarh and O... ha, the states mainly affect... y left-wing extremism.

Despair, hope for kin, P 2

# Naxalites kept us for over 4 nights, but treated us well, say 'abducted' students

VIVEK DESHPANDE
NAGPUR, JANUARY 5

THE THREE students from Pune, who were allegedly abducted by Naxals during a cycle expedition, have said that given a chance, "they would like to redo the expedition at the next available opportunity."

Addressing the media at Gadchiroli on Tuesday after they were brought from Chintalnar, Sukma district of Chhattisgarh, the youths—Vikas Walke, Shrikrushna Shewale and Adarsh Patil —said "they had no connection with the Naxalites or their ideology." Their sole mission was to "try and understand India and its people."

Adarsh Patil, whose Facebook page had a poem titled "*Ha hum hain Naxal* (yes we are Naxals)" said, "it does not ...



The three Pune students who were allegedly abducted by Naxals and lat... released. *Express*

... believe in Naxalism."

The youth expressed their regret over not being able to complete their journey up to Visakhapatnam as planned, but were ready to take it up whenever possible in future. They also announced their plan to tour the North-East next year. Post-graduate arts students from Pune, the three friends had left on a bicycle journey, which they referred to as "Bharat Jodo" campaign, on December 22. They had first reached Bhamragarh by bus, parking their bicycles atop the bus and had left for Bhamragarh on their bikes to finally reach Basaguda vil... ...in Bijapur district on December 29. ...

... but kept us at the place for over four nights. All this while, we were treated well," they said. As the news spread and security forces started the search, the Naxalites decided to free them.

Talking to *The Indian Express*, Adarsh Patil said, "Our objective has been to understand human nature. We had covered over 900 km on bicycle last year up to Bhamragarh and had visited Sevagram Ashram, Baba Amte's projects and Abhay and Rani Bang's health projects. We wanted to go beyond Bhamragarh now."

Gadchiroli Superintendent of Police, Sandip Patil, said: "We have heard their story. They are apparently inspired by late ... Andolan. We will ...

# Four city youths kidnapped by Maoists in Bastar

Rashmi Drolia
@timesgroup.com

**Raipur:** Four youths from Pune who were on a peace cycle rally from Pune to Malkangiri in Odisha were kidnapped by Maoists in Bijapur district of Bastar division on Saturday.

Confirming the information, Bastar range inspector general of police SRP Kalluri said, "Four youths whose names are yet to be ascertained went missing from the thick forested region in the Basaguda area."

He added that the information came to light when a person in Nagpur got a call about the youths' abduction. The caller said she was calling from the Chintalnar area. "We are investigating the identity of the caller and the youths who have been abducted," Kallur... said.

An IB alert confirmed tha... the youths were abducted b... hardened Maoist Papa Rao wh... is secretary of the Jagargun... area committee, Kalluri said.

Sources said the you... were on a 'Bharat Jodo' miss... carrying the message of pe... in Maharashtra, Chhattisg... and Odisha — the states ma... affected by left-wing e... mism. They had reportedl... Pune on December 20, 201... were scheduled to reach ... mela via Malkangiri on ... ary 10, 2016.

No information has b... ceived directly form... Maoists, the police said.

# Despair & hope for kin before release

## Students Court Danger In Naxalite Area

Gitesh.Shelke
@timesgroup.com

Pune: A fascination for tribal life when they went on a bicycle trip to the Naxalite-affected district of Gadchiroli last year made three friends plan a similar trip through Maharashtra, Chhattisgarh, Odisha and Telangana, last month.

Shrikrishna Shewale, Adarsh Patil and Vikas Walke, all students from Pune, were kidnapped by Naxalites in Chattisgarh four days ago and released unharmed on Sunday.

Shewale and Patil are childhood friends from Karad in Satara district while Vikas became their friend in Pune. Shewale's parents are retired teachers based in Karad. Shrikrishna is studying MA Sanskrit at the Savitribai Phule Pune University and stays in the boys' hostel on campus.

His brother, Dayanand, told TOI on Sunday that the family was relieved that he had been set free. "We knew nothing about their kidnapping until Sunday morning till we saw the news channels. They had been in captivity for four days," he added.

All three knew about the Naxalite threats they would face in their expedition. "They had prepared a route map and knew that a transit corridor of about 250 km was risky. We spoke to Shr... ishna on h... ...

## In Karad, 2 families wait together for news of children



The students cross a river in the tribal region during their trip

Samrat.Phadnis
@timesgroup.com

**Kolhapur:** The families of two of the abducted students, Shrikrishna Shewale and Adarsh Patil, went through a range of emotions in six hours on Sunday. They were alarmed, anxious and later happy that their children were released by the Naxalites.

"I want to tell my son ... do whatever in life, but never risk it. People's good wishes brought him back. We spent many traumatic hours," Pandurang Shewale, a retired teacher from Koyna Vasahat in Karad in Satara district. ...


... my son. Around 1p, we were told that Shrikrishna and his two friends were released. We were relieved. Those seven hours in between were terrible," Shewale said. He had spoken to Shrikrishna on December 29 when the friends had reached Chhattisgarh.

Adarsh's father Deepak Patil lives in Kale in Karad taluka. "Everybody here is happy now that the children are safe," he said. Patil, also a teacher, arrived at Shewale's residence in the morning. The families gave out sweets after their children were released.

Relatives said Shrikrishna, Adarsh and Vikas had ...

साधना प्रकाशन

G.M.D. Arts, B.W. Commerce & Science College ★ Sinnar Library



# तीन मुलांचे चार दिवस

आदर्श पाटील
विकास वाळके
श्रीकृष्ण शेवाळे

891.463 03
45719

G.M.D.Arts, B.W. Com. & Science
College Library, SINNAR
SENIOR COLLEGE
Acc No 45719 12/11/2022

# अनुक्रम




१०

सफर माणुसकीची

आदर्श पाटील

Mob.: 8806336033



७६

प्रवास : समृद्ध करणारा

विकास वाळके

Mob.: 9673937171



१३५

अनुभूती : दुहेरी संघर्षाची

श्रीकृष्ण शेवाळे

Mob.: 9405605570




# प्रवास : समृद्ध करणारा



विकास वाळके

मला लहानपणापासूनच सायकलबद्दल खूप कुतूहल होतं; पण आवडीचं रूपांतर पॅशनमध्ये होण्यासाठी डिग्रीचं पहिलं वर्ष उजाडावं लागलं. असाच एकदा कॉलेजला आलो असताना माझा मित्र आदर्श आणि मी १५ ऑगस्ट २०१३ ला रायगडावर सायकलनं जाण्याचं ठरवलं. अंतर होतं साधारण १४० किलोमीटर. एका दिवसात आम्हाला एवढं अंतर पार करायचं होतं. दिवस पावसाळ्याचे होते. पहिल्यांदाच आम्ही दोघांनीही एवढी सायकल चालवली होती. सुरुवातीला थकवा जाणवत होता. परंतु सभोवतालचा निसर्ग, पडणारा पाऊस, मोठमोठे धबधबे– जिकडे जाईल तिकडे हिरवागार गालिचा पसरलेला होता. त्यामुळे आलेला थकवा कुठच्या कुठे पळून गेला. आयुष्यात प्रथमच एवढा एकांत अनुभवता आलेला होता. या अनुभवातून शिकूनच आपली माणसं, समाज, त्यांना असणाऱ्या समस्या, त्यांची संस्कृती जाणून घेण्यासाठी दिवाळीत कुठे तरी जायचं ठरवूनच आम्ही परत आलो.

जायचं कुठं, यावर खूप विचार झाला होता. विचाराअंती ठरलं विदर्भ... बाबा आमटेंचे जेवढे प्रोजेक्ट आहेत, त्यांना सायकलने भेट द्यायची. विदर्भच का? तर वेळोवेळी होणारी वेगळ्या विदर्भाची मागणी, तेथील संस्कृती, चंद्रपूर-गडचिरोली- नागपूरमधील आदिवासी भाग समजून घेणं, त्यांच्या समस्या जाणून घेणं, शहरात झालेला प्रचंड विकास व मागासलेली खेडी यांच्यामध्ये निर्माण झालेली संवादाची दरी तसंच उग्र होतं चाललेला नक्षलवाद समजून घेणं... या व अशा बऱ्याच गोष्टी मनात ठेवून दौरा आखला. त्यासाठी सर्व पूर्वतयारी केली.

नकाशा तयार करणं, सायकलची प्रॅक्टिस करणं, मेडिसिन, सायकलचं सर्व सामान... प्रत्येक गरजेची गोष्ट. दौऱ्याला आम्ही नाव दिलं होतं, 'माणूस म्हणून जगायला शिकण्यासाठी, माणूस समजून घेण्यासाठी'. एकूण अंतर होतं ९०० ते ९५० किलोमीटरचं. आम्ही कुठेच राहण्याची सोय करण्याचं ठरवलं नव्हतं. ज्या गावात अंधार पडेल, तिथेच मुक्काम करायचा– मग तो गावातील मंदिरात असो वा आदिवासी पाड्यात. सायकलवरून जाण्याचा उद्देशच लोकांमध्ये जाऊन राहावे हा होता. जेव्हा तुम्ही मोटारसायकलवर अशा एखाद्या टूरवर जाता, तेव्हा तुम्हाला स्थानिक लोकांशी तेवढं समरस होता येत नाही. प्रत्येक गोष्ट जवळून अनुभवता येत नाही. याउलट अनुभव हा सायकलवरचा असतो. जाणारा–येणारा प्रत्येक जण तुमची आपुलकीने चौकशी करत असतो. समोरच्याला तुमच्याबद्दल एक कुतूहल असतं आणि तेच तुमच्यातील दुरावा दूर करण्याचा दुवा ठरतं. सायकल हे संवादाचं एक उत्तम माध्यम ठरतं. हा दौरा दिवाळीतच ठरवण्यामागचं कारणही वेगळं होतं. आदिवासी लोक दिवाळी कशी साजरी करतात, हे बघायचं होतं आणि घरी जाऊन आठ दिवस असेच घालवण्यापेक्षा हे दिवस सत्कारणी लावायचे होते. तसंच कॉलेजलादेखील सुट्टी मारायची गरज नव्हती.

ठरल्याप्रमाणं तो दौरा व्यवस्थित पार पडला. बाबा आमटेंचे आश्रम (आनंदवन, सोमनाथ प्रकल्प, नागेपल्ली प्रकल्प, हेमलकसाचा लोकबिरादरी प्रकल्प), त्याचबरोबर वर्ध्याचं गांधींचं सेवाग्राम, विनोबांचा पवनार आश्रम– हे सर्व आम्ही सायकलवरून वेळेत पूर्ण केले. वाटेत मुक्काम केलेली आदिवासी गावं त्यात गडचिरोलीतील बोदली, कांदोली, मोरोवाही; चंद्रपूरमधील उमरेड, भेंडाळ अशा गावात राहिलो. या गावांतच किशोर लोखंडे (भेंडाळ), रामपुरो (हेमलकसा), सुरेश, महेश (गोंडपिंपरी, चंद्रपूर), गुलाबकाका (भेंडाळा) अशी भेटलेली नवी माणसे आमच्याशी कायमची जोडली गेली. तसंच समाजासाठी, तेथील लोकांसाठी पूर्ण आयुष्य वाहून घेतलेली जगावेगळी माणसंदेखील मिळाली. त्यात विकास आमटे असतील, राणी व अभय बंग असतील, प्रकाश व मंदा आमटे असतील, सेवाग्रामचे श्रीराम जाधव असतील किंवा अहेरीतील डॉ.कन्ना मडावी असतील... त्यांच्याशी बोलणं, त्यांचे विचार जाणून घेणं हा एक खूप समृद्ध करणारा अनुभव होता. त्यांनी स्थानिक आदिवासी लोकांसाठी चालवलेलं काम थक्क करणारं होतं. तो पूर्ण दौरा नागपूर ते गडचिरोलीतील भामरागड असा होता. वरील व्यक्तींशी व स्थानिक लोकांशी बोलल्यावर असं जाणवलं की, ते तर खूप पुढारलेले आणि समाजाच्या प्रवाहाशी जोडलेले आहेत; परंतु भामरागडच्या पुढे गेल्यावर खूपच मागासलेला भाग आहे, पूर्णपणे जंगल आहे.

विदर्भ दौऱ्यावरून आल्यावर भामरागडच्यादेखील पुढे जाण्याचा विचार मनात

सारखा येत होता, दिवाळीत परीक्षा आल्यामुळे शक्य झालं नाही, परंतु जायचं मात्र ठरलं. रात्रंदिवस दौऱ्याचाच ध्यास लागला होता. मार्ग होता भामरागड-सुकमा-दंतेवाडा- बालिमेला-विशाखापट्टणम- एकंदरीत तीन राज्यं (छत्तीसगड, ओडिशा, आंध्र प्रदेश) आम्ही सायकलवरून पालथी घालणार होतो. अंतर तसं कमीच होतं. साधारण ९०० ते ९५० किलोमीटर. पण परिसर पूर्ण दुर्गम व नवखा असल्यामुळे खूप तयारी करावी लागणार होती. राज्याबाहेर पहिल्यांदाच जात असल्यामुळे जास्त काळजी घ्यावी लागणार होती. शिवाय त्या भागात मोबाईल नेटवर्क नसल्यामुळे घरच्यांना पूर्ण कल्पना देणं गरजेचं होतं. खूप मायक्रोप्लॅनिंग करावं लागणार होतं. तिथलं हवामान, भाषा याबद्दल माहिती मिळवावी लागणार होती.

डिसेंबर ते जानेवारीदरम्यान जाण्याचं पक्कं झालं होतं. तारखा निश्चित होत नव्हत्या, कारण रेल्वेचे रिझर्वेशन मिळत नव्हतं. त्यामुळं इतर गोष्टींची जमवाजमव करत होतो. वेगवेगळ्या एनजीओंशी संपर्क साधून माहिती काढत होतो. आदिवासी व त्यांचे प्रश्न यांची उत्तम जाण असणाऱ्या, त्यांच्यात राहून काम करणाऱ्या व्यक्तींशी संवाद साधत होतो; त्यात भामरागडमधील लालसू वकील असतील किंवा अल्लापल्लीतील डॉ. कन्ना मडावी असतील. आदिवासींसाठी सरकारने चालवलेल्या विविध योजनांचा अभ्यास करत होतो- मग त्यात फॉरेस्ट ॲक्ट असेल किंवा आदिवासींसाठी तयार केलेला PESA (Panchayat Extension in Sheculed Area) असेल... अब्दुल कलामांच्या PURA (Providing Urben Amenities in Rural Area) मॉडेलचं- देखील सखोल वाचन केलं. विविध सरकारी अहवाल, सर्व्हे इत्यादी. हा सर्व खटाटोप कशासाठी; तर जेव्हा तुम्ही एखाद्या प्रदेशात जाता, तेव्हा तिथल्या समस्या-योजना यांचा सखोल अभ्यास झालेला असावा. त्यामुळे तुम्हाला त्या परिसराशी आणखीनच समरस होता येतं. तिथल्या लोकांशी बोलताना अडचण येत नाही.

ही सर्व जय्यत तयारी चालू असताना अनेक मित्र आम्हाला वेड्यात काढत होते. कोणी चेष्टा करत होते, तर कोणी विरोध. जवळचे मित्र मात्र पाठीशी ठाम उभे होते. प्रत्येक गोष्टीत त्यांचा हातभार लागत होता- मग तो आर्थिक असेल किंवा मानसिक आधार. तयारी पूर्णत्वाकडे जात होती, पण जाण्याचा दिवस काही ठरत नव्हता. खूप प्रयत्न करूनही रेल्वेचं आरक्षण मिळू शकलं नाही, शेवटी एस. टी.ने जाण्याचं ठरलं. तिकिटंही लगेच मिळाली. दि. २२ डिसेंबर ही तारीख निश्चित झाली. जेमतेम आठवडा राहिला होता हातात, त्यामुळे सायकलिंगची प्रॅक्टिसही चालू केली होती. कधी ५० किलोमीटर, तर कधी एकदम ७० किलोमीटर. सकाळी लवकर उठायचं, फ्रेश होऊन सायकलवर स्वार होऊन जिकडे वाटेल तिकडे निघायचं. ठिकाण काही

निश्चित नसायचं, फक्त अंतराचं गणित निश्चित असायचं. कधी पौड, कधी वारजे माळवाडी, कधी सिंहगड, तर कधी कात्रज-बालेवाडी. प्रॅक्टिस चांगली झाल्यानं एक वेगळाच हुरूप आणि आत्मविश्वास होता. कशाही खडतर परिस्थितीत सायकल चालवण्याचा विश्वास आला होता आणि शरीरही साथ देत होतं.

गुगलवरून मॅप तयार केला होता. अगदी बारीकसारीक गोष्टीसुद्धा त्यात होत्या. कुठे रस्ता आहे, कुठे पूल आहे, गावांमधील अंतर किती आहे, दवाखाने कुठे आहेत, हॉटेल कुठे आहे, तर कुठे रस्ताच नाहीये... इत्यादी. तुम्ही जेव्हा सायकलवरून पूर्णपणे अनोळखी भागात जाता, तेव्हा या सगळ्या गोष्टींची बित्तंबातमी ठेवावी लागते. दौऱ्याचं एकूण नियोजन २० दिवसांचं होतं : दि. २२ डिसेंबर ते १२ जानेवारी. नव्या वर्षाची सुरुवात आम्ही नव्या प्रदेशात व नव्या माणसांत करणार होतो. सायकलची पूर्ण सर्व्हिसिंग केली होती. दोन्ही टायर, ट्यूब, पंक्चरचं पूर्ण साहित्य बरोबर घेतलं होतं. त्याचबरोबर मेडिकलचं पूर्ण साहित्य, वेळ पडल्यास मॅगी, थंडीचे दिवस असल्यामुळे आणि तो परिसर तर पूर्ण जंगलाने वेढलेला असल्यानं स्वेटर, झोपण्यास पांघरूण इत्यादी सामान घेतलं होतं. कितीही सामान, वस्तू बरोबर नेल्या तरी कमीच होत्या. पण आम्हाला हे सगळं सायकलवर वाहायचं होतं. त्यामुळे कमीत कमी कपडे घेण्याचं ठरलं होतं. ७० टक्के सामान हे फक्त खाण्याचंच होतं. खाण्याच्या बाबतीत आम्हाला हलगर्जीपणा करून चालणार नव्हतं, कारण मागील दौऱ्यात मधे कुठेच गाव न लागल्यामुळे आम्हाला मॅगीवरच राहावं लागलं होतं.

या वर्षी दिवाळीत घरी आठवडाभर राहिल्यामुळे घरच्यांना दौऱ्याची पूर्ण कल्पना दिली होती. पण पुन्हा एक-दोन दिवस आधी घरी जाऊन आलो. पुणे शहरापासून जवळच वाघोली येथे घर असल्याने सायकलनेच गेलो, त्यामुळे प्रॅक्टिसही झाली आणि घरच्यांनादेखील भेटलो. वडिलांजवळ बसून दौऱ्याचा प्लॅन व्यवस्थित डिस्कस केला. त्यांच्याकडून काही मार्गदर्शनपर सल्लेदेखील मिळाले. तुम्ही टूरवर निघालेले असता, तेव्हा घरच्यांचा पाठिंबा असणं खूप गरजेचं असतं. त्यामुळे तुम्ही दौऱ्याचा आनंद घेऊ शकता. घरच्यांचे आशीर्वाद घेऊनच पुण्याला आलो. एकंदर स्वारी खूप आनंदात होती.

बघता-बघता २१ डिसेंबर उजाडला. दुसऱ्या दिवशी आम्ही प्रवासाला निघणार होतो. उरलेल्या सामानाची खरेदी, बॅग भरणं यातच आदल्या दिवशीच वेळ गेला. आजच श्रीकृष्णला सायकल घ्यायची होती. त्यामुळे सबंध दिवसभर सायकलची दुकानं पालथी घालत होतो. शेवटी संध्याकाळी आम्ही 'शकिरा'ला विकत घेतलं, कसबा पेठेतल्या एका दुकानातून. तशी दिसायला ती अफलातून होती. मुळातच परदेशी फॅन्टमचा ब्रॅन्ड होता, त्यामुळे नाव ठेवलं, शकिरा! हीच शकिरा उद्यापासून

बस्तरच्या जंगलात पळणार होती. नवी सायकल घेतल्यामुळे श्रीकृष्णची स्वारी खूश होती. २१ गिअर असलेली ही शकीरा चालवायलादेखील मस्त होती.

रात्री काही लवकर झोप येत नव्हती. कधी एकदाची सकाळ होतेय, असं झालं होतं. रात्री उशिरा झोपल्यामुळं सकाळी उशिरा जाग आली. बॅगेत भरलेल्या सामानाची सकाळी उठल्यावर व्यवस्थित वर्गवारी केली, कारण सायकलवर सामान बांधल्यावर तुम्हाला हवी ती गोष्ट पट्कन सापडते. जसं की, फर्स्टएडचं सामान वेगळ्या पॅकिंगमध्ये, सायकल रिपेअरिंगचं सामान वेगळ्या पॅकिंगमध्ये इत्यादी. वेळ पटापट चालला होता.

संध्याकाळी साडेसहाची एसटी होती. मी सर्व सामानाची पुन्हा एकदा खात्री केली. रूमवर आधीच मित्रांचा घोळका जमला होता. दुपारी जेवणच जात नव्हतं. कुठेही बाहेर निघताना माझं असंच होतं. साधारण साडेतीन वाजले होते. ठरल्याप्रमाणे माझे मित्र धनंजय, हृषीकेश, ललित मला सोडायला शिवाजीनगर बसस्थानकावर येणार होते. तिकीट माझ्याकडे असल्यानं, तसंच सायकलचं पॅकिंग करायचं असल्यामुळे लवकर जाणं भाग होतं. थोड्या वेळाने अक्षय, तुषार, सुनील, उमेश, स्वप्नील, श्रावण हे मित्रदेखील आले. श्रीकृष्ण आणि आदर्शदेखील काही वेळाने आले.

नागपूरला जाणारी गाडी लागली होती. त्यामुळे सायकलींचं पॅकिंग आम्ही करत होतो. आमच्या चमूला आता सूरज आणि श्रीकृष्ण ढगेचीदेखील मदत होत होती. सायकली व्यवस्थित पॅकिंग करणं गरजेचं होत, कारण पुणे-नागपूर हे अंतर होतं ८०० किलोमीटर. आदर्श आणि श्रीकृष्ण या दोघांची सायकल गिअरची असल्यामुळे खूप काळजी घ्यावी लागणार होती. सायकल बांधताना गाडीचा कंडक्टर १० मिनिटांपासून 'उरकाऽ उरकाऽऽ' असं ओरडत होता. शेवटी ६.४० ला गाडी निघाली.

सामान व्यवस्थित ठेवून आम्ही निर्धास्त झालो ते पुढील १४-१५ तासांच्या प्रवासाला. निघालो असल्याची घरच्यांना कल्पना देऊन आणि मित्रांना मेसेज करून मी मोबाईल ठेवून दिला. गाडी नगर रोडने चालली होती. विचारांच्या पाठीवर स्वार होऊन मन झेपावत होतं. मागच्या काही दिवसांत केलेल्या अभ्यासाचं मनन करत होतो. नक्षलवादाचे आव्हान, हॅलो बस्तर, एका नक्षलवादाचा जन्म... या पुस्तकांमधून नक्षलवाद ही संकल्पना मी माझ्यापरीने समजून घेत होतो. नक्षलवादाची सुरुवात, उदयाची कारणे, माओवाद, सद्य:स्थितीतील परिस्थिती- सर्व काही.

आज ती ९ राज्ये व ८३ जिल्ह्यांत ही चळवळ पसरलेली आहे. त्यात छत्तीसगड, ओडिशा, आंध्र प्रदेश ही राज्ये आहेत. हा संपूर्ण प्रदेश भारतातील सर्वांत

मागासलेला आणि नैसर्गिक साधनसंपत्तीने समृद्ध आहे. यातील बराचसा भाग असा आहे की, जिथे आजपर्यंत ना वीज आहे, ना रस्ते. ना शाळा आहेत, ना दवाखाने. अशा भागात आम्ही निघालो होतो.

२

शृंखला पायी असू दे, मी गतीचे गीत गाई,

दु:ख उधळायास आता आसवांना वेळ नाही...

बाबांची ही अप्रतिम कविता म्हणत मला कधी झोप लागली, ते कळले नाही.

सकाळी साधारण सहाला जाग आली असेल. वातावरणात वेगळीच प्रसन्नता जाणवत होती. आम्ही अमरावतीमध्ये पोहोचलो होतो. नजर जाईल तिथपर्यंत शेतंच दिसत होती. कापूस, सोयाबिनचं प्रमाण जास्त दिसत होतं. हे बघत असतानाच अब्दुल कलामांचं PURA (Providing Urben Amenities in Rural Area) चं मॉडेल डोळ्यांपुढं येत होतं.

सकाळचे १० वाजत आले होते. खूप भूक लागली होती. गाडी एक स्टॉपवर थांबल्यावर आम्ही फ्रेश होऊन जवळच्या खाद्य पदार्थांवर ताव मारत होतो. रात्रभर एसटीच्या सीटवर झोपल्यामुळे अंग खूप दुखत होतं. आम्हाला नागपूरला पोहोचायला अजून दोन-तीन तास लागणार होते. ऊन चांगलंच कडक होतं. वातावरणातील हळुवारपणा केव्हाच नाहीसा झाला होता. भारताच्या बरोबर मध्यभागी असलेला तो परिसर उष्णतेने व्याकूळ करून सोडत होता. उकाडा खूप जाणवत होता.

साधारण एकच्या सुमारास आम्ही नागपूर शहरात आलो. १६ ते १७ तासांच्या रंजक व मैफलमय प्रवासानंतर आम्ही उतरलो होतो. नागपूरला येण्याची तशी ही दुसरीच वेळ. आधीच्या विदर्भ दौऱ्यात आणि आता. तसं नागपूर लहानपणापासून पाठ्यपुस्तकातून नागपूरची संत्री किंवा नकाशातच पाहायला मिळालं, पण आता या शहराची चांगलीच ओळख झाली होती. विदर्भातील मुंबईच म्हणायची. नागपूर तसं विकसित, पण तरी त्या शहरानं आपला जुना चेहरा जपलेला आहे. तीन सायकली, चार बॅगा आणि आम्ही तिघं- असा लवाजमा घेऊन शेजारील एका हॉटेलमध्ये जेवणाचा बेत आखला. तिघांनीही उत्ताप्पा खाणं पसंत केलं. सायकली व्यवस्थित बांधल्यामुळे कुठेही कसलाही त्रास किंवा चाके आऊट वगैरे झाली नव्हती.

आज अल्लापल्लीला जाण्याचा प्लॅन होता. अल्लापल्लीला जाणारी एसटी ३.३० ला होती, त्यामुळे तिथेच ठाण मांडून बसलो. स्थानकात येणारे-जाणारे मोठ्या उत्सुकतेने आम्हाला विचारत होते, त्यांनाही आमच्याबद्दल कुतूहल वाटत होतं. दरम्यान, अल्लापल्लीला जाणारी गाडी लागली. पुन्हा सायकली व्यवस्थित बांधण्याचं

काम चालू झालं आणि ते काम माझ्याकडेच असायचं. कारण त्या दोघांना नीट सायकली बांधता येत नसायच्या. त्यामुळे हा शिरस्ता पुढेही चालू राहिला- अगदी भामरागडपर्यंत. साधारण ४.३० ला अल्लापल्लीला जाणारी गाडी निघाली. डॉ.कन्ना मडावींना फोन करून तिथे राहण्याची आमची सोय करून घेतली होती. पोचायला साधारण ११ वाजले होते. सलग दोन दिवस प्रवास केल्यामुळे थकवा जाणवत होता. त्यामुळे सामान रूमवर ठेवून आम्ही लगेच जेवायला गेलो. रूमवर यायला साडेअकरा वाजले. गादीवर पडल्या-पडल्या झोप लागली.

सकाळी उशिरा सातला जाग आली. सगळी आवराआवर करण्यात खूप वेळ गेल्याने डॉ. कन्ना मडावी दवाखान्यात निघून गेले होते. सगळं पुन्हा आवरून आम्ही अल्लापल्लीच्या सरकारी दवाखान्यात त्यांना भेटायला गेलो, पण ते ऑपरेशन थिएटरमध्ये असल्याने त्यांना भेटता आलं नाही. चौकशी करत असताना तिथल्या वैद्यकीय अधिकाऱ्यांनी आम्हाला आतमध्ये बोलावून घेतलं. मग काय- अर्धा तास गप्पा मारण्यातच गेला. दवाखाना तसा छोटेखानीच होता, पण आदिवासींची खूप वर्दळ होती. अधिकाऱ्यांशी बोलताना कळलं की, त्या भागात हेमलकसानंतर एवढाच एक दवाखाना उपलब्ध आहे. त्यामुळे दूरवरून लोक येथे उपचारासाठी येतात. तिथली परिस्थिती पाहून आणि सोय पाहून खरंच डॉ. कन्ना मडावींसारखे (एम.बी.बी.एस.) डॉक्टर तिथे काम करतात, ही खूप मोठी गोष्ट वाटते आणि त्यांचा अभिमानदेखील वाटत होता. आधीच्या विदर्भ दौऱ्यात त्यांच्याशी गप्पा झाल्या होत्या. पण या वेळी तिथं थांबणं आम्हाला शक्य नव्हतं, कारण आजच भामरागडला पोचायचं होतं.

सगळं आवरून आम्ही अल्लापल्लीच्या एसटी स्टँडवर गाडीची वाट पाहत थांबलो होतो. साधारण १२ वाजले असतील. दोन गाड्या येऊन गेल्या, पण त्या गाड्यांवर कॅरेज नसल्यामुळे आम्हाला जाणं शक्य नव्हतं. शेवटी आम्ही नागेपल्लीला सायकलने जाण्याचा निर्णय घेतला, कारण तिथून भामरागडला जाणाऱ्या गाड्यांची संख्या अधिक होती. साधारण ५ ते ७ किलोमीटरचं अंतर असावं. नागेपल्लीला येऊन एक तास झाला होता. मागच्या विदर्भ दौऱ्यात नागेपल्लीवरूनच गेल्यामुळे परिसर ओळखीचा वाटत होता. एक गाडी ३.३० ला येणार होती, ती एकदाची आली आणि भामरागडच्या दिशेने रवाना झाली. एका वर्षात तिथल्या परिसरात काहीच बदल जाणवत नव्हता. रस्ते थोडे सुधारले होते, कारण मागच्या वर्षी खूप खड्डे होते. चार दिवसांचा पास असल्यामुळे तिकिटाचे पैसे द्यावे लागले नाहीत,. परंतु सायकलचे पैसे द्यावे लागत होते. पुणे ते नागपूरपर्यंत साधारण १२० रुपये लागले होते आणि आताचा हा कंडक्टर आमच्याकडे २०० रुपये मागत होता. त्याला मी आधीचे तिकीट दाखवून देखील तो ते मान्य करत नव्हता. खूप समजावून सांगूनदेखील

उद्धटपणाचा कळस करत गाडी थांबवून उतरण्याचा पर्याय सांगत होता. शेवटी मी ड्रायव्हरशी बोलून ५० रुपये त्यांना देण्याचं मान्य केलं, तेदेखील विनातिकीट. दुसरा पर्यायच आमच्यापुढे नव्हता. आम्ही हतबल होतो. शेजारील प्रवासी 'आम्हाला आम्ही नेहमी असंच करतो' म्हणून कंडक्टरची बाजू घेत होते. नंतर तर काय चुका करण्याची त्यांना सवयच झाली असावी. एवढ्या दुर्गम भागात आणि तेही गडचिरोलीत कसला आलाय तिकीट चेकर!

अंधार केव्हाच पडला होता. सगळीकडे भयाण शांतता पसरली होती. रोडने फक्त आमचीच गाडी चालली होती. गाडीचाच काय तो आवाज येत होता. रोडच्या कडेला असलेलं घनदाट जंगल त्या वातावरणात शांततेची भर टाकत होतं. मधेच १०-१५ किलोमीटरनंतर एखादा आदिवासी पाडा लागायचा आणि नंतर पुन्हा भयाण शांतता. मागच्या वर्षी याच रस्त्याने गुडघा दुखत असल्यानं एका जीपनं रात्री ९ वाजता हेमलकसातील लोकबिरादरी प्रकल्पात पोचलो होतो. मागील आठवणींना या निमित्तानं उजाळा मिळत होता.

साधारण ८.३० ते ९च्या दरम्यान आम्ही भामरागडला पोचलो. सांगितल्याप्रमाणे लालसूदेखील हजर झाले होते. पहिल्यांदाच भेटत असूनही आमच्यात कोणताच दुरावा जाणवत नव्हता. मुलखावेगळा माणूस होता तो. साधारण ३५-४० वर्षे वयाचे असावेत. राहणीमान एकदम साधं. पुण्यातील नामांकित फर्ग्युसन कॉलेजमधून शिक्षण, तसेच भारतातील टॉपच्या आयएलएस लॉ कॉलेजमधून वकील होऊनही कुठेही बडेजाव दिसत नव्हता. आदिवासी प्रश्नांसंदर्भात भरलेल्या युनोच्या परिषदेत त्यांनी भारताचं प्रतिनिधित्व केलं होतं. गोंडी मायबोली असूनही ते इंग्रजी भाषेत तेवढ्याच सहजतेनं बोलत होते. साधा शर्ट-पॅन्ट, गळ्यात उन्हापासून संरक्षण करण्यासाठी स्कार्फ, बरोबर हीरोहोन्डा सीडी डिलक्स घेऊन स्वारी कुठेही निघायची. कधी छत्तीसगड, आंध्र प्रदेश तर कधी नागपूरदेखील. लालसू वकील म्हणून परिसरात प्रसिद्ध असलेला हा माणूस या भागातील एन्सायक्लोपीडियाच असावा. शेजारील गावातच प्राथमिक शाळेत शिक्षिका असलेली त्यांची पत्नी उज्ज्वलाताई तेवढ्याच तोलामोलाची साथ त्यांना देत होत्या. दोघांचा स्वभावदेखील हसरा असल्यानं आनंदात संसार चालला आहे.

एस.टी.तून सर्व साहित्य उतरवल्यावर आम्ही जवळच असलेल्या लालसूंच्या घरी पहिल्यांदा जाणार होतो. साध्या दोन खोल्यांच्या घरात ते राहत होते. घरी गेल्या-गेल्या त्यांनी आमची उज्ज्वलाताईंशी ओळख करून दिली. चहा घेतल्यानंतर आमचा गप्पांचा फड साधारण अर्धा तास रंगला. बोलता-बोलता आम्हाला CG- Network (Central Gondwana Network)- स्वराबद्दल कळलं. भाषेच्या अडचणीमुळे आवाज हरपलेल्या आदिवासी लोकांसाठी सीजी-

स्वरा म्हणजे एक वरदान आहे. आदिवासींच्या जीवनात प्रकाश घेऊन येणारा किरण आहे तो.

नऊ वाजत होते. आमची मुक्कामाची सोय लालसूंनी हेमलकसा गावात केली होती. वातावरणात गारवा वाढला होता. थंडी वाजायला लागली होती. बांबूचं कुंपण असलेल्या एका झोपडीवजा घरात आम्ही गेलो. घरातील सर्व माणसे आमचीच वाट पाहत असावीत. सर्व जण शेकोटी करून अंगणात बांधलेल्या छपरात बसले होते. लालसूंनी आमची सर्वांशी ओळख करून दिली. त्यापैकी सावळा रंग, जेमतेम उंची व हसरा चेहरा असलेले चिन्नू हेच घरातील कर्ते होते. आम्ही तिघेही प्रथम फ्रेश झालो. मग शेकोटीपुढे शेकत बसलो. गप्पा चांगल्या रंगल्या होत्या. गावातील हालहवाल जाणून घेत होतो. चिन्नू यांचं वय तसं ३०-३५ असावं. खूप बोलायला आवडणाऱ्या या पठ्ठ्यानं आमचं मन कधी जिंकून घेतलं, तेच कळलं नाही. गावातील प्रत्येक बित्तंबातमी त्यांच्याकडे होती. गावातील समस्या सोडवण्यात त्यांचादेखील हातभार लालसूंना लागत असे. एक जिंदादिल कार्यकर्ता होता तो. गावातील समस्यांचा पाठपुरावा करण्यासाठी आम्ही कशी आंदोलनं केली यांचा पाढाच ते आमच्यापुढे वाचत होते. जेमतेम शिक्षण असूनही त्यांचा व्यवहारज्ञानात हातखंडा होता. तसंच दोन मुली झाल्यावर नसबंदी करणारा आधुनिक विचारांचा माणूस होता तो. ठरल्याप्रमाणे लालसू आमच्याबरोबर उद्या इंद्रावती नदी ओलांडेपर्यंत येणार होते. जेवण तयार झालं होतं. आम्हीही खूप भुकेलेलो होतो. थंडीच्या दिवसांत गरमागरम भात आणि बेसन खायला एक वेगळीच मजा आली. पोटभर जेवण केल्यावर आम्हाला 'गोटूल'मध्ये झोपण्यास सांगितलं.

'गोटूल'- आदिवासी संस्कृतीमध्ये याला खूप महत्त्वाचं स्थान असतं. आपल्याकडील एका सभागृहासारखं पण आकारानं लहान असं हे गोटूल. आदिवासी लोक प्रत्येक सणाला, उत्सवाला इथे एकत्र जमतात. पारंपरिक आदिवासी नृत्य, कला इथे सादर केल्या जातात. गावात असलेली एखादी समस्याही इथेच सोडवली जाते. दोन व्यक्तींमधील भांडणापासून न्याय देण्यापर्यंत सगळ्या गोष्टी इथेच केल्या जातात. तरीही काही लेखकांनी गोटूल म्हणजे फक्त 'सेक्स हाऊस' असंच वर्णन केल्याचं लालसूंनी आम्हाला सांगितलं. गावात येणाऱ्या पाहुण्यांची झोपायची सोयदेखील इथेच केली जाते. आमचीदेखील तिथेच सोय केली होती. लालसूंना दुसऱ्या दिवशी बाहेर जायचं असल्यामुळे त्यांनी आमचा निरोप घेऊन 'सकाळी भेटू' असे सांगितले.

सकाळी उशिराच म्हणजे सातला जाग आली. सूर्योदय झालेला होता. वातावरणात वेगळीच प्रसन्नता आलेली होती. सुंदर दृश्य होतं ते. इंद्रावती नदीवर आम्ही अंघोळीला जाणार असल्यामुळे फ्रेश होऊन आम्ही लोकबिरादरीत गेलो.

आदिवासींसाठी वरदान असलेल्या लोकबिरादरीत पुन्हा आल्याने कोण आनंद झाला होता. थोडा वेळ इकडे-तिकडे फिरल्यावर मिथिलची मागील दौऱ्यात भेटलेला व साधारण ५ वर्षांपासून पुण्यावरून येथे शिकण्यासाठी आलेला, त्याची चौकशी केली. जवळच्याच कॉम्प्युटर लॅबमध्ये तो होस्टेलमधील मुलांची नाचाची रंगीत तालीम घेत होता. शाळेचा वार्षिक समारंभ जवळ आल्याने त्याने मुलांचे नाच बसवले होते. आम्ही आत जाताच त्यानेही लगेच आम्हाला ओळखलं. पुण्याहून आल्याने त्यालाही तेवढंच अप्रूप होतं. त्याला आमच्या दौऱ्याबद्दल माहिती दिली. त्यानंही मुलांशी बोलण्याचा आग्रह केला. शेजारील वेगवेगळ्या आदिवासी पाड्यांतून शिक्षणासाठी आलेल्या मुलांना आमच्याबद्दलही तेवढीच उत्सुकता होती. आम्हीही त्यांच्याशी संवाद साधण्याची संधी सोडली नाही.

आदिवासी संस्कृती किती सुंदर आहे, आदिवासी माणूस कसा मनमिळावू आहे, याबद्दल त्यांना सांगत होतो. त्याचबरोबर शिक्षणाची संधी मिळाल्यामुळे संधीचं सोनं करण्याचंदेखील सांगितलं. निसर्गत: तुमच्यात कसे कौशल्य, चिकाटी आहे आणि तुम्ही इतरांपेक्षा वेगळे नाहीत; जरी तुम्ही मागासलेल्या भागातून आलेला असला तरी बुद्धिमत्तेच्या व कष्टाच्या जोरावर तुम्ही यशस्वी होऊ शकता याची जाणीव करून देण्याचा आणि त्यांची भीती व न्यूनगंड कमी करण्याचा प्रयत्न केला. तसंच लालसूंचं उदाहरण देऊन एखादी व्यक्ती मोठी कशी होऊ शकते हे सांगितलं. माणसाची प्रगती परिस्थिती रोखू शकत नाही याची कल्पना दिली. त्यांच्याबरोबर फोटो काढून त्यांचा निरोप घेतला. निघताना रामपुरोबद्दलदेखील विचारलं. तो पुढील शिक्षणासाठी दुसरीकडे गेल्याचं कळलं.

१० वाजत आले होते. जाताना भाऊंची (प्रकाश आमटे) भेट घेतली. गप्पा झाल्या आणि पुन्हा हेमलकसाला आलो. आम्हाला सारंग परसलवारच्या घरी अजून जायचे होते. तो शिक्षणासाठी पुण्यात राहत होता. चांगली ओळख असल्यामुळे त्यानं आम्हाला त्याच्या घरी जायची तंबीच दिली होती. तसा त्याच्या वडिलांचा फोनदेखील येऊन गेला. जाताना त्यांच्या घरी गेलो. सारंगचे वडील पत्रकार होते. त्यामुळे गप्पांसाठी संधीच मिळाली. परिसरातील समस्यांचे त्यांना चांगले आकलन होते. लोकशाहीतील चौथ्या स्तंभाचं महत्त्व आम्हाला आज खूप महत्त्वपूर्ण वाटत होतं. कारण मागासलेल्या प्रदेशात समस्यांचा डोंगरच उभा असतो. त्यांना वाचा फोडण्याचं काम हा स्तंभ करत असतो. त्यांनी आमच्यासाठी खास जेवण तयार केलं होतं. चार दिवसांनी आम्ही पोळी खाणार होतो. गुलाबजाम, बटाट्याची भाजी, वरण, भात असं जेवण आम्ही केलं. ११ वाजत आले होते. आम्ही परसलवारकाकांचा निरोप घेऊन गोटूलमध्ये पुन्हा आलो आणि सामानाची बांधणी केली. खऱ्या प्रवासाला आजपासून सुरुवात होणार होती. लालसू आमची वाट पाहत

होते. आधी त्यांच्या घरी जाऊन उज्ज्वलाताईंचा निरोप घेणार होतो. निघताना ताईंनी त्यांच्या बहिणीशी ओळख करून दिली. पुण्यात शिक्षण झालेली ताई आयुर्वेदातील डॉक्टर होती. आपल्या लोकांसाठी भामरागडला छोटेखानी दवाखाना टाकून लोकांची सेवा करण्याचं कार्य करत होती. पुण्यात शिक्षण घेऊन पुन्हा गावात येऊन लोकांची सेवा करणाऱ्या ताईबद्दल आम्हाला अभिमान वाटला. १२ वाजत आले होते. पुण्याहून आणलेली चितळेंची फेमस बाकरवडी आम्ही त्यांना दिली. त्यांनीही तेवढ्याच आनंदानं तिचा स्वीकार केला. जिथे-जिथे आम्ही मुक्काम करणार होतो, तिथे बाकरवडी देण्याचं आम्ही ठरवलं होतं.

## ३

शेवटी सायकलबरोबरच प्रवासाला सुरुवात केली. खूप हायसं वाटत होतं. मनात असंख्य विचार घोळत होते. सर्व परिसर घनदाट जंगलांनी व्यापलेला होता. सायकल किंवा पायी चालता येईल एवढाच रस्ता असल्यानं आम्हाला सायकल चालवताना खूपच काळजी घ्यावी लागत होती. ऊन डोक्यावर आलं होतं, पण जंगलात त्याची तेवढी तीव्रता भासत नव्हती. चालत येणारे आदिवासीबांधव मोठ्या उत्सुकतेने पाहत होते. जंगलवाट असल्याने चुकण्याची शक्यता होती. लालसू रस्ता दाखवतच गाडी चालवत होते. मनोरंजन करायला चिन्नू बरोबर होतेच. जंगलभागात सायकल चालवताना आम्ही हेल्मेट घालण्याचं टाळत होतो. त्यामागचं कारणही तसंच होतं. आदिवासी माणसांना हेल्मेट हा प्रकारच माहीत नव्हता. त्याचबरोबर आम्ही आमच्या पेहेरावाकडे जातीनं लक्ष दिलं होतं. सायकलिंगचा सूट घालणं मुद्दाम टाळलं होतं. साधी नाइटपॅन्ट आणि टी-शर्ट असा पेहराव ठेवला होता. कोणताही भडकपणा, भपकेबाजपणा न वाटावा हा त्यामागचा उद्देश होता.

निघायला बराच उशीर झाल्यामुळे आम्ही आज महाराष्ट्राच्या सीमेलगत असलेल्या नेलगुंडामध्ये राहावं असं लालसूंनी आम्हाला सांगितलं होतं. जवळील पाणी आता संपत आलं होतं. पाण्यात इलेक्ट्रॉल टाकल्यामुळे पाण्याची चव वेगळी लागत होती. (अशा दौऱ्यावर असता, तेव्हा तुम्हाला पिण्याच्या पाण्याची काळजी घ्यावी लागते. त्या परिसरातील पाणी तुम्हाला पचेलच असे नाही. त्यात असणाऱ्या घटकांमुळे तुमच्या शरीरावर त्याचा परिणाम होऊन, आजाराला आमंत्रण मिळू शकतं. म्हणून इलेक्ट्रॉल मिक्स करून पाणी पीत होतो. त्यामुळे पाणी शुद्ध होण्यास आणि शरीरातील इलेक्ट्रॉलचं प्रमाण स्थिर राखण्यास मदत होते.) सूर्य पश्चिमेस वेगाने झुकत होता. जंगल परिसर असल्याने लवकर अंधार पडत होता. साधारण पाच वाजत आले होते. आम्ही अंतर लवकर पार करण्याचा प्रयत्न करत होतो. अंधार पडायच्या आत नेलगुंडला पोचायचं होतं. यात भरीस भर म्हणून की काय.

श्रीकृष्णची शकीरा मध्येच पंक्चर झाली. नवी सायकल असूनही.

सुदैवानं गावात पंक्चरचं दुकान लागल्यानं चिंता नव्हती. तरी अर्धा तास त्यात गेलाच. साधारण सात वाजता आम्ही नेलगुंडा गावात पोचलो. गाव कसलं ते, १०-१५ घरांचा आदिवासी पाडाच होता तो. कुंपण असलेल्या घरासमोर ओटा होता, तिथे शेकोटी करून घरातील दोन स्त्रिया बसल्या होत्या. लालसूंचा येथे कायम राबता असल्यामुळे त्यांच्या गप्पा रंगल्या होत्या. आज आम्ही साधू वड्डेच्या घरात राहणार होतो. फ्रेश होऊन आल्यावर आम्हीदेखील शेकोटीला चिकटून बसलो आणि गप्पांचा आस्वाद घेत राहिलो. लालसूंनी आमची त्यांच्याशी ओळख करून दिली. पुण्याहून आल्यानं त्यांना आमच्याबद्दल खूप कुतूहल आणि आश्चर्य वाटत होतं. घरातील कुणालाच मराठी, हिंदी येत नसल्यामुळे लालसूच आमचे दुभाषी बनले होते. गप्पा मारताना कळलं की, साधू वड्डेच्या वडिलांना सर्पदंश झाला होता. घरगुती उपचार करून ते हेमलकसाला चालत गेले होते. अंतर होतं साधारण २० ते २५ किलोमीटर. साधारण अर्ध्या तासाने ते आले. आल्यावर आम्ही त्यांची जातीने चौकशी केली. आता ते व्यवस्थित असल्याचं आणि साप चावलेला हात दाखवत आमची खुशालीदेखील विचारली. साप चावणं ही या जंगल परिसरातील रोजचीच गोष्ट. त्यावर त्वरित उपाय म्हणून जंगलातील औषधी वनस्पतींचं ज्ञान हे या माडियाला खूप आधीपासून होतं. आमच्यासाठी कोंबडी कापण्यात आली होती. म्हणजे आज चिकनचा बेत! वातावरणातील थंडी आमच्या गप्पांची साक्षीदार होत होती. नेलगुंडा हे तसं छोटंसं गाव सीमेलगत असल्यानं छत्तीसगडचादेखील प्रभाव इथे होता. गावातील अनेक माणसांचे नातेवाईक हे पलीकडील छत्तीसगडमध्ये वास्तव्यास होते. गावातील सर्व कुटुंबं शेतीच करत होती. वर्षातून धान (तांदूळ) हे एकच पीक घेत असतात. त्या जोडीनं डुक्कर, कोंबड्या, गाई यांचे पालनही केले जात असे. यांच्या संख्येवरच घरातील सुबत्ता ठरते. घरात लागणाऱ्या प्रत्येक गोष्टीसाठी त्यांना भामरागडला किंवा शेजारील छत्तीसगडला जावं लागायचं. गावात कुठेच शाळा, ग्रामपंचायत, वीज, रस्ते या गोष्टी नव्हत्या. पूर्णपणे नक्षलग्रस्त भाग असल्यानं गावात नक्षलींचा राबता असल्याचं गप्पांमधून कळलं.

गप्पा आता चांगल्याच रंगात आल्या होत्या. लालसू त्यांच्या ओघवत्या शैलीत आम्हाला एकेक प्रसंग, गोष्टी सांगत होते. त्यातलीच एक गोष्ट होती एका तरुणाची, जो नेलगुंडामध्ये राहायचा. लहानपणापासूनच इथे दादालोकांचं येणं-जाणं असल्यामुळे त्याला त्यांच्याबद्दल उत्सुकता असायची. त्यांचा गावातील रुबाब बघून त्याला त्यांच्याबद्दल आकर्षण निर्माण झालं. वयाच्या १४ व्या वर्षीच तो चळवळीत सामील झाला. लहानपणापासून हुशार, चाणाक्ष असलेला हा तरुण चळवळीतदेखील काही वर्षांतच नावारूपाला आला. त्याचा नेम अचूक

असल्यामुळं त्याला चळवळीत 'अर्जुन' असं नाव देण्यात आलं. आपल्या कामगिरीच्या जोरावर तो चळवळीत दलम कमांडरपर्यंत जाऊन पोचला. अनेक चळवळींमध्ये तो सामील होता. १० वर्षांनंतर अशाच एका पोलिसांच्या आणि नक्षलींच्या संघर्षात पायाला गोळी लागून जबर जखमी झाला. त्याच्यावर उपचार करण्यात आले. पण जखम काही भरून येत नव्हती. खूप विचार करून त्याने चळवळ सोडण्याचा निर्णय घेतला. आपल्याला आता चळवळीत काम करता येणार नाही, त्यामुळे घरी जायचंय- हा आपला विचार चळवळीतील वरिष्ठांना त्याने सांगितला. वरिष्ठांनीही त्याला चळवळ सोडण्याची परवानगी दिली. पण आता प्रश्न होता पोलिसांचा. मग पोलिसांशी संपर्क साधून त्याने आत्मसमर्पणाची इच्छा व्यक्त केली. पोलिसांनी कोणतेही आढेवेढे न घेता संमती दर्शवली. हा तरुण घरी येऊन त्याने सरकारी दवाखान्यात उपचार घेतले. पूर्णत: बरा झाल्यावर घरी आला. अर्धवट राहिलेले शिक्षण पूर्ण करण्याची इच्छा त्याने लालसूंना बोलून दाखवली. त्यांनी नागपुरात त्याच्या शिक्षणाची, राहण्याची सोय करून दिली. तो तरुण आता एमएसडब्ल्यूच्या (मास्टर इन सोशल वेलफेअर) पहिल्या वर्षाला असल्याचं त्यांनी सांगितलं. अशा अनेक गोष्टी आम्ही ऐकल्या.

जेवण तयार झालं होतं. आम्ही सर्व पुरुषमंडळी जेवायला बसलो. भात आणि चिकन, खूप चवदार जेवण होतं. आधी विचारांनी आणि आत्ता अन्नानं पोट भरलं होतं. आदिवासींमध्येदेखील पुरुषप्रधान संस्कृती असल्याचं समजलं. आधी पुरुषांनी जेवण करायचं आणि जेवढे उरेल त्यातच घरातील साऱ्या स्त्रियांनी भागवायचं, नाही तर अर्धपोटीच झोपायचं. पण त्यातल्या त्यात स्त्रियांना घरात मानाचं स्थान होतं. इथल्या स्त्रीला आपला जोडीदार निवडण्याची मुभा होती, तसेच काही कारणास्तव पतीचं निधन झालं तर पुन्हा लग्न करण्याची मुभाही होती. मनसोक्त जेवण करून आम्ही थोडा वेळ बाहेरच शेकत बसलो. लालसूंनी दुसऱ्या दिवशीचं प्लॅनिंग सांगितलं. सकाळी लवकर उठून आम्ही इंद्रावती नदी ओलांडून एका ठिकाणी जेवण करून पुढे एकटेच प्रवास करणार होतो. लालसू परत फिरणार होते. मी बाजेवर झोपलो. नारळाच्या काथ्यानं तयार केलेल्या बाजेवर झोपताना सर्व शरीर गोळा झाल्यासारखं होतं होतं. दिवसभरातील क्षणांचं, घटनांचं मी आकलन करत होतो. दौऱ्याचा आजचा पहिलाच- म्हणजे सायकलिंगचा पहिला दिवस होता.

रात्री चांगली झोप लागली. सकाळी उजाडायच्या आधी आम्ही उठलो. सर्व उरकून, त्यांचा निरोप घेतला. घरातील प्रत्येक व्यक्ती निरोप देण्यासाठी रस्त्यावर आली होती. त्यांच्याबरोबर फोटो काढून आणि या निरागस आठवणी हृदयाच्या कप्प्यात साठवून प्रवासाला सुरुवात केली. वाटेत लोकबिरादरीने काही दिवसांपूर्वी साधनाताईंच्या नावाने सुरू केलेली छोटेखानी शाळा लागली. भविष्यात विशाल

झाड होणाऱ्या रोपट्याचं प्रतीक होतं ते. थोडा वेळ तिथं थांबून आम्ही सुसाट निघालो. सकाळचा प्रहर असल्याने वातावरणात गूढ प्रसन्नता होती, बरोबरच असलेली थंडी त्यावर कळस चढवत होती. सायकल चालवण्यास वेगळा हुरूप येत होता. वाटेत अनेक नक्षली कार्यकर्त्यांच्या स्मरणार्थ बांधलेली स्मारकं दिसत होती. वाटेत कुठे तरी माकडाच्या अंगावरची कातडी लटकवलेली दिसायची. नीट निरीक्षण केल्यावर कळायचं की, आदिवासींनी माकडे खाल्लेली असावीत आणि त्यांची कातडी तिथं लटकवलेली असावीत. एखाद्या दाट जंगलातून येत असतानाही आम्हाला एकही पक्षी, माकड, हरीण असं काहीच दिसलं नव्हतं. दिवस उजाडायला लागला होता. सूर्याची किरणं झाडांच्या, पानांच्यामधून वाट काढत जमिनीला स्पर्श करत होती. तो किरणांचा तांबूस रंग मनाला मोहून टाकणारा होता. काही विहंगम दृश्यं आम्ही कॅमेऱ्यात बद्ध केली. फोटोग्राफीची एक नवी आवड मला या दोन्ही दौऱ्यांमुळे निर्माण झाली. निसर्गाचं सौंदर्य काही वेगळंच होतं, अगदी मोहून टाकणारं.

मध्ये आदिवासी पाडा लागला, तिथल्या बालवाडीतील मुलांशी थोडा वेळा बोलून आम्ही इंद्रावतीकाठी पोचलो तेव्हा साधारण ११ वाजले असतील. खूप मोठं पात्र होतं इंद्रावतीचं. पण हिवाळ्याचे दिवस असल्याने छोटाच प्रवाह होता. इंद्रावतीच्या अलीकडच्या बाजूला महाराष्ट्र आणि पलीकडे छत्तीसगढ. त्यामुळे दोन्ही राज्यांतील लोकांचा इथे राबता होता. अनेक लोक इथे आले होते. कुणी अंघोळीला, कुणी कपडे धुण्यासाठी, तर कुणी आमच्यासारखी नदी ओलांडायला. नदीच्या पलीकडे आमच्या आधी लालसू आणि चिन्नू आमची वाट पाहत होते. पलीकडे जायला 'डोंगल' नावाचं लाकडाचं नावेसारखं साधन होतं. आकाराने लहान असल्याने सामान व एक जण त्यामध्ये बसणं शक्य होतं. सुरुवातीला आदर्श व श्रीकृष्ण मोठ्या हिरीरीने डोंगलमध्ये बसले आणि चालवता येते का याची चाचपणी करत होते. पण दोघांनाही डोंगल काही व्यवस्थित चालवता येत नव्हतं. त्यांना मी 'असं करा, तसं करा' असं मोठ्या आविर्भावात सांगत होतो. अर्धा तास त्यांची गंमत पाहून झाल्यावर मोठ्या आविर्भावात मी डोंगलमध्ये बसलो. डोंगल पुढे जात नव्हता, तेव्हा मला स्वतःवरच हसायला यायला लागलं. आमचं आणि डोंगलचं गणित काही जुळत नव्हतं. होडी चालवणं राहिलं लांब, पण त्यात आम्ही बसलोही नव्हतो. नदीच्या पलीकडे बसलेले चिन्नू आणि लालसू आमची गंमत पाहत होते. शेवटी न राहवून चिन्नू स्वतः आमच्या मदतीला आले. ते डोंगलमध्ये बसताच डोंगल वेगात पुढे चालू लागला. कसं काय, ते डोंगलच जाणो... दोन तास आम्ही अशीच मस्ती करत घालवले होते.

आता आमचं सामान नदीच्या पलीकडे होतं. खूप दिवसांनी पोहायचा योग

आला होता. पाणी कमी असूनही पोहायचा पुरेपूर आनंद आम्ही घेतला. दुपारचे दोन वाजले असावेत. आम्ही चालतच जवळ असलेल्या गावात गेलो. गाव तसं लहान होतं. नदीतली कसरत एकदाची संपली होती. पण दररोज जाणाऱ्या या लोकांना सवय झाली होती. दोन राज्यांची सीमा असूनही या नदीवर आजपर्यंत पूल बांधला गेला नव्हता. लालसूंकडून ऐकलं होतं की, पावसाळ्यात चार महिने पूर्ण गावांचा संपर्क तुटतो. साधी इंधनाची बोटदेखील इथे उपलब्ध नव्हती. दोन्ही राज्यांनी एकत्रित येऊन, पुढाकार घेऊन पूल बांधणं अशक्य नव्हतं.

आम्ही आता छत्तीसगडमध्ये प्रवेश केला आणि मोबाईललादेखील रेंज आली होती. विचारल्यावर कळलं की, गावात सरकारी वाहनं दिवसातून दोन वेळा येतात. गावात वीजही होती. रस्ता साधाच, पण व्यवस्थित होता. जवळच जायचं असल्यानं चालतच गेलो. गावातील माणसे मोठ्या कुतूहलाने आमच्याकडे पाहत होती. काही माणसे आमची विचारपूस करत होती. पण भाषा छत्तीसगडी किंवा गोंडी असल्यामुळे आम्हाला काही कळायचं नाही. आम्ही आत्ता छत्तीसगडमध्ये असल्याची जाणीव आम्हाला चिन्नूंनी करून दिली. आता हिंदीतच बोलावं लागणार होतं. सुरुवातीला अडखळत किंवा मधेच एखादा शब्द मराठीत यायचा. नंतर मात्र सवय होत गेली आणि आम्ही उत्तम हिंदी बोलायला लागलो. दोन राज्यांमधील भाषेचे वेगळेपण आम्ही अनुभवत होतो. चालत असताना आम्हाला एका मोठ्या झाडाखाली ५०-६० लोकांचा घोळका गटागटाने स्वयंपाक करताना दिसला. सर्व तरुण होते. याबद्दल चिन्नूंना विचारल्यावर त्यांनी माहिती दिली. आदिवासींमध्ये 'पंडुम' हा एक उत्सव साजरा केला जातो. शेतातील धान्य काढल्यावर ते विकण्याच्या व खाण्याच्या आधी ग्रामदेवतेला पंडुम केला जातो. गावातील लोक एकत्र येऊन डुक्कर, कोंबडी किंवा शेळीचा बळी देतात. आंब्याच्या झाडाला आलेला मोहोर असो किंवा धान; हे सगळं जे काही आहे ते देवाचे आहे आणि देवाला पंडुम पाडल्याशिवाय आपल्याला खाण्याची मुभा नसते, हा त्यामागचा विचार होता. आदिवासी समाजात पंडुमला एक वेगळंच स्थान आहे. त्या सर्व व्यक्ती आमच्याकडे आल्या. चिन्नूंनी आमची गोंडीत ओळख करून दिली. हे करत असतानाच आदर्श त्यांचा फोटो घेऊ लागला. त्यातला एक जण मोठ्याने ओरडला, "हमारे इजाजत के बिना आप फोटो क्यूँ खिंच रहे हो? आपको किस ने इजाजत दी..." तो आमच्यावर रागावला. पण चूक आमचीच होती. नंतर आम्ही पुन्हा अशी चूक न करण्याचं ठरवलं. चिन्नूंनी त्यांना कसंबसं समजावलं.

आम्ही एका प्रशस्त कौलारू घरात गेलो. तिथे लालसूंचे नातेवाईक होते. त्यांनी जेवण आधीच तयार करून ठेवलं होतं. आम्हालाही सकाळपासून काही न खाल्यामुळे भूक लागली होती. वाटेत येताना चिवडा आणि लाडू एवढंच काय ते

खाल्लं होतं. इथेही चिकनचा बेत होता. पोटभर जेवून आम्ही त्यांच्या घरातील व्यक्तींशी गप्पा मारत होतो. घरात एक मुलगा, दोन मुली आणि आई-वडील असा परिवार होता. दोन्ही मुली शिकायला गावातल्याच शाळेत होत्या, तर मुलगा गडचिरोलीत कामाला होता. दुपारचे तीन वाजत आले होते. दिवस मावळतीकडे झुकत होता. आज संध्याकाळपर्यंत कुटरूला पोचायचं ठरवलं होतं,. त्यामुळे आम्ही लगेच निघायची तयारी सुरू केली. अंतर होतं साधारण ३५ ते ४० किलोमीटर. आम्ही आत्ता छत्तीसगडमधील बिजापूर जिल्ह्यातील बैरामगड तालुक्यात होतो. हा जिल्हा तसा आकारानं मोठा होता, पण लोकसंख्या कमी होती. घनदाट जंगलही होतंच. गावात प्राथमिक आणि माध्यमिक शाळा दिसत होती. दहावीपर्यंत शिकण्याची सोय होती. आता लालसू आणि चिन्नूंना निरोप द्यायची वेळ आली. त्यांनी आमच्यासाठी स्वत:चे दोन दिवस दिले होते. खरा कार्यकर्ताच असं करू शकतो. ''पुढे काहीही अडचण आली तर फोन करा, आम्ही तिथं येऊ'' असं त्यांनी ठामपणे आम्हाला सांगितलं होतं. मोठ्या जड अंत:करणाने आम्ही त्यांचा निरोप घेतला. पुढे रस्त्याला लागेपर्यंत ते तिथेच उभे होते. हात हलवत आमचा निरोप घेत होते. आम्हीही त्यांना प्रतिसाद देत होतो.

४

आता आम्ही तिघेच होतो. ठरवल्याप्रमाणे हाकेच्याच अंतरावरून चाललो होतो. रस्ता त्यामानाने ठीक असल्याने अंतर भरभर कापत होते. रस्त्याने जाणारे-येणारे आमच्याकडे टक लावून पाहत होते. कुटरू अजून १५ किलोमीटरवर होतं. एका ठिकाणी थोडा वेळ पाणी घेण्यास थांबलो. वाटेत ५ ते १० किलोमीटरनंतर आश्रमशाळा लागत होत्या. मुलींच्या आणि मुलांच्या वेगळ्या होत्या. नाताळच्या सुट्ट्या असल्यामुळे सर्व मुलं-मुली आपापल्या घरी गेलेली होती. प्रशस्त ग्राऊंड, कडेने कुंपण असलेल्या या शाळा खूपच सुंदर दिसत होत्या. ४.३० वाजत आले असावेत. अंधार पडायला लागला होता. आज कुटरूला पोचणं शक्य नसल्यानं आम्ही पुढील गावात थांबायचा निर्णय घेतला. बरेच पुढे आल्यावर श्रीकृष्णचा मोबाईल मागे आम्ही थांबलो होतो त्या ठिकाणी आदर्शकडून राहिल्याचं लक्षात आलं. आदर्श तसाच परत मागे गेला, ते साधारण ५ ते ७ किलोमीटर. त्यामुळे मी आणि श्रीकृष्ण तिथेच एका कडेला त्याची वाट पाहत बसलो होतो.

अंधार पडायला लागल्यामुळे इथेच कुठे तरी राहायची सोय होणं गरजेचं होतं. जवळच चार-पाच झोपड्या दिसत होत्या. एका घरात मी गेलो. ''कोई है क्या?'' असं म्हणत आवाज दिला. तेच घर निवडण्यामागचा हेतूही तसाच होता. घराच्या बाहेर एक दुचाकी लावलेली होती. त्यामुळे घरात नक्की कुणी तरी तरुण राहत

असणार, असा ठोकताळा आम्ही बांधला आणि तो खराच निघाला. घरातून एक मुलगा बाहेर आला. साधारण १४-१५ वर्षांचा असावा. त्याला मी सर्व परिस्थिती सांगितली आणि आजच्या रात्रीची झोपायची सोय होईल का, म्हणून विचारलं. त्यानं काहीही विचार न करता 'हो जायेगी' म्हणत मान डोलावली. पण मी पुन्हा ''आपके माँ-बाप को पूछकर देखो'' असं म्हणत त्याला विचारण्यास सांगितले. तसा शेजारीच शेतात गेलेल्या आपल्या वडिलांना आणि मोठ्या भावाला विचारून पुन्हा आला. आता आमची ऑफिशिअल सोय झाली होती. एका खोलीत सामान ठेवून मी पुन्हा आदर्शची वाट पाहत रस्त्याला पायीच गेलो. बराच वेळ झाल्यानं चिंता लागली होती. माझ्या मोबाईलला रेंज नव्हती आणि दोन्ही मोबाईल त्याच्याकडे असल्याने फोन करता येत नव्हता. रोडवरून येणाऱ्या-जाणाऱ्यांना मी त्याच्याबद्दल विचारत होतो, पण समाधानकारक उत्तर मिळत नव्हतं. मी हळूहळू पुढे चालू लागलो. साडेसात वाजल्याने पूर्ण अंधार पडला होता. बराच वेळानं एक ट्रॅक्टर येताना दिसला. असे बरेच ट्रॅक्टर धान घेऊन जाताना दिसले होते. पुन्हा ट्रॅक्टरच्या ड्रायव्हरला विचारावं म्हणून त्याच्याजवळ जाणार, तोच आदर्शचा आवाज आला आणि माझा जीव भांड्यात पडला. वाटेत ट्रॅक्टर मिळाल्याने तो सायकल ट्रॉलीत टाकून आला होता. श्रीकृष्णचा मोबाईलही सापडला होता आणि राहण्याचीही सोय झाली होती. त्यामुळे सगळं कसं व्यवस्थित झाल्यासारखं वाटत होतं. इतका वेळ चेहरा पडलेल्या श्रीकृष्णच्या चेहऱ्यावरचा आनंद आता काही लपत नव्हता.

त्या घरातील इतर व्यक्तीही आल्या होत्या. आम्ही आमच्याकडील तांदूळ त्यांना दिला होता. गावात लाइट नसल्यामुळे आमच्याकडील बॅटरीच्या उजेडात आम्ही सामान बाहेर काढत होतो. थंडी वाजायला लागली होती. कपडे बदलून घरापुढील मोकळ्या ओट्याच्या मध्यभागी शेकोटी पेटवली. तिला चिकटून थंडीचा बोचरेपणा कमी करण्याचा प्रयत्न करत होतो. आमच्याबरोबरच तो मुलगाही बसला होता. त्याला हिंदी येत असल्यामुळे खूप हायसं वाटलं. त्याच्याशी गप्पा मारल्यावर तो बिजापूरला एका आश्रमशाळेत सातवीत शिकत असल्याचं कळलं. घरात एकूण तीन भाऊ व त्याचे आई-वडील, भाभी असा परिवार होता. मोठा भाऊ व आई-वडील शेती करत, तर दुसरा भाऊ बिजापूरला कामाला असल्याचं त्यानं सांगितलं. विचारल्यावर कळलं की, गावाचं नाव बंदेपारा आहे म्हणून. सकाळी उठल्यावर तो आम्हाला गाव दाखवणार होता. थोड्याच वेळात त्याचे दोन्ही भाऊही आमच्याबरोबर शेकत बसले. तरुण असल्याने समरस होण्यास जास्त वेळ लागला नाही. त्यांनी ''आप कहाँ से आये हो?'' विचारल्यावर ''हम महाराष्ट्र से है। पूना से. गडचिरोली से यहां तक सायकल से आये है।'' असं सांगितल्यावर त्यांनाही आमचं कौतुक वाटलं. सायकल चालवण्याची इच्छा त्यांनी बोलून दाखवली. आम्हीही

होकार दर्शवत त्यांना परवानगी दिली. श्रीकृष्णची सायकल नवी होती, त्यामुळे त्यांनी तीच चालवणं पसंत केलं. एवढ्या अंधारातसुद्धा ते सायकल चालवत होते. गिअरची सायकल त्यांनी कधी बघितलीच नसावी, त्यामुळे त्यांना उत्सुकता असणं साहजिकच होतं. ते परत आल्यावर आम्ही गप्पा मारत बसलो.

अनेक विषयांना आम्ही हात घालत होतो. विजेबद्दल विचारलं असता असं कळलं की, २००५ दरम्यान झालेल्या सलवा-जुडूममुळे येथील घरे, विजेचे खांब तोडण्यात आले होते. दोन वर्षांपूर्वीपर्यंत येथे दादालोकांचा राबता असायचा, पण आता ते येत नाहीत.

आकाशात चांदणं पडलं होतं. चंद्राची अर्धकोर खूपच खुलून दिसत होती. त्याच उजेडात आमची मैफल रंगली होती. गावात ग्रामपंचायत नसल्याचं त्यांनी सांगितलं. घरात लागणाऱ्या साहित्यासाठी, दवाखान्यात जाण्यासाठी बिजापूरला जावं लागत होतं. तसा कुटरूचा बाजार असतो, पण दवाखान्यासाठी बिजापूरलाच जावं लागे. गावात दिवसातून दोनदा बस येत असल्याचं सांगितलं. आता ९ वाजत आले होते. जेवण तयार झालं होतं. आम्ही सर्व जण बाहेरच शेकोटीच्या मंद प्रकाशात डाळ-भातावर ताव मारत होतो. 'हो सके तो कभी पूना भी आना' असं म्हणत त्यांना पुण्याला यायची विनंती केली. त्यांनीही 'जरूर आऊंगा' म्हणत आनंदात मान डोलावली. डाळ-भात खूपच रुचकर लागत होता. एका खोलीत आमची झोपण्याची सोय करून दिली होती. आमच्यासाठी त्यांनी शेजारील घरातून दोन बाजा आणल्या होत्या. दोन बाजांवर आम्ही तिघं झोपणार होतो. सकाळी लवकर जायचं असल्यानं लगेचच झोपणं पसंत केलं. मला कालच बाजेवर झोपण्याचा अनुभव आल्यानं मोठ्या कष्टानं आम्ही तिघे त्या बाजांवर झोपण्याचा प्रयत्न करत होतो. आदर्श मधे असल्यानं त्याला झोपणं अवघड जात होतं. शेवटी ते दोघेही एकाच बाजेवर झोपले. आज दिवसभर सायकलिंग केल्याने खूपच दमलो होतो. मी एकटा एका बाजेवर असल्यानं मला व्यवस्थित झोपता येत होतं. दिवसभर घडलेल्या घटनांचा वेध मी घेत होतो. नेलगुंडातील साधू वड्डे, त्यांचे वडील, इंद्रावती नदी ओलांडताना आमची झालेली गंमत, लालसूंच्या नातेवाइकांच्या घरी केलेलं जेवण, चिन्नू, वाटेत श्रीकृष्णचा हरवलेला मोबाईल, तो सापडण्यासाठी आदर्शने केलेली धडपड, इथे झालेली राहण्याची सोय... सर्व काही डोळ्यांसमोरून जात होतं. त्याचबरोबर रेंज नसल्यानं घरच्यांना फोन न केल्यानं काळजी वाटत होती. असा विचार करतच निद्रा लागली.

सकाळी सातला जाग आली. थंडी खूप असल्याने अंघोळ करता आली नाही. फ्रेश होऊन आम्ही त्या मुलाबरोबर गावात फिरत होतो. गावात साधारण ३०-३५ पाडे असावेत. प्रत्येक पाड्याच्या पुढे सारवलेलं अंगण, शेणाने सारवलेल्या भिंती,

त्यावर केलेलं नक्षीकाम असं सुंदर दृश्य असायचं. जवळच्या शाळेतदेखील आम्ही जाऊन आलो. सुट्ट्या असल्याने वर्ग मोकळेच होते. चौथीपर्यंत तिथे शाळा भरत होती. तीन खोल्या असलेली शाळा आणि तिच्यापुढे मोकळं मैदान. या मैदानात क्रिकेट स्पर्धा आयोजित केल्या जातात, असं तो मुलगा सांगत होता. मागल्या वर्षीच आमच्या संघानं पहिल्यांदाच ही स्पर्धा जिंकली असल्याचं आणि १५ हजारांचं बक्षीस मिळालं असल्याचं अभिमानानं म्हणाला. क्रिकेट हा खेळ इथेदेखील खेळला जातो! व्हॉलिबॉलदेखील या भागात आम्ही पाहत आलो होतो, कारण प्रत्येक गावात व्हॉलिबॉलला लागणारी नेट आम्हाला दिसायची. मागासलेला भाग असूनदेखील या लोकांनी क्रिकेट व व्हॉलिबॉलसारख्या आधुनिक खेळांना आत्मसात केलं होतं. माणूस कितीही मागासलेला-अविकसित असला तरी खेळाला त्याच्या जीवनात अनन्यसाधारण महत्त्व असतं, हे आम्ही स्वत: पाहत होतो.

'बंदेपारा' नाव असलेल्या या गावात धानच पिकत होतं. हे धान सरकारी गोदामांना विकलं जायचं. वर्षभरातील त्यांची कमाई तेवढीच असायची. ज्या भावाने सरकार माल घेईल, त्यावरच समाधान मानावं लागत होतं. जवळपास कुठेच मोठी बाजारपेठ नसल्याने त्यांना ते बाजारात विकता येत नसे. बिजापूरला बाजारपेठ होती, पण माल नेण्याचा खर्च खूप होता. त्यामुळे त्यांच्यापुढे दुसरा पर्यायही नव्हता. शरीराने लहान, काटक पण लाजाळू, सुरुवातीला कमी बोलणारा हा मुलगा आता आमच्याशी भरपूर गप्पा मारत होता. "मुझे बहुत पढना है। माँ-बाप का नाम रोशन करना है।" असं आम्हाला मोठ्या आत्मविश्वासानं सांगत होता. त्याच्या डोळ्यांत आम्हाला वेगळीच चमक दिसली. सकाळचे आठ वाजत आले होते. आम्हाला निघणं भाग होतं. सामान पॅक करून निघालो. घरातील सर्व व्यक्ती कामावर गेलेल्या होत्या. "मन लगा कर पढाई करना और बहुत आगे जाना" असं म्हणत आम्ही त्याचा निरोप घेतला.

आज आम्ही बिजापूरला जाणार होतो. साधारण ५० ते ५५ किलोमीटरचं अंतर असावं. पुढे गेल्यावर डांबरी रस्ता असल्याचं आम्हाला सांगण्यात आलं होतं. त्यामुळे अंतर खूप वाटत नव्हतं. जवळील लाडू, चिवडा, चिक्की खाल्ल्यानं दुपारपर्यंत काही चिंता नव्हती. रस्ता चांगला असल्याने भरभर अंतर पार होत होतं. माझ्या सायकलचे टायर जाडीने कमी असल्यामुळे ती सुसाट पळत होती. वातावरणातील प्रसन्नतेमुळे थकवा जाणवत नव्हता. आज २७ डिसेंबर. दौरा सुरू करून सहा दिवस झाले होते. तसा अजून बराच पल्ला गाठायचा होता. सुकमा, दंतेवाडा, माँ दंतेश्वरीदेवी, मलकानगिरी, बालिमेला आणि विशाखापट्टणम् असा प्रवास करायचा होता. त्यामुळे 'अभी तो शुरुवात हुई थी, मंजिल तो कोसों कदम दूर

थी.’ सुरुवातीला या भागाचा अभ्यास करताना दंतेवाडीतील एज्युकेशन सिटीबद्दल खूप ऐकलं होतं. त्याबद्दल यू-ट्यूब व विकिपीडियावरून माहिती काढली होती. तसा दंतेवाडा हा पूर्णपणे जंगलाने वेढलेला प्रदेश. पूर्ण देशात नक्षलवाद्यांचं माहेरघर म्हणून कुप्रसिद्ध असलेला हा जिल्हा २०१३ मध्ये एकदमच उत्तम शैक्षणिक कार्यासाठी प्रकाशझोतात आला होता. त्याला कारणही तसंच होतं. पूर्णपणे मागासलेल्या या जिल्ह्यात पोलीस आणि नक्षलींमध्ये सततची धुमश्चक्री चालत असते. त्यामुळे शिक्षणाचा विचार करणेदेखील हास्यास्पद गोष्ट होती. पण याच प्रदेशात आज इंजिनिअरिंगपासून मेडिकलपर्यंत, फार्मसीपासून मॅनेजमेंटपर्यंतच्या आधुनिक कोर्सची उपलब्धता केली होती. नर्सरीपासून इंग्रजी माध्यमाची सोय केलेली होती.

तसं प्राथमिक शिक्षण हे स्थानिक आदिवासी भाषेमध्ये दिलं जात होतं, जे की मुलं शाळेत न येण्याचं मूळ कारण होतं. ‘पोटा केबिन, उडान, छू लो आसमान’ या योजनेंतर्गत मुलांची शिक्षणाबरोबरच राहण्याची सोय केली होती. कॉम्प्युटरपासून डिजिटल शिक्षणाची सोय केली होती. या सर्व प्रयोगामागं जिल्ह्याचे कलेक्टर ओ. पी. चौधरी होते. याचाच गौरव म्हणून २०१५ मध्ये पंतप्रधान अॅवॉर्ड त्यांना देण्यात आलं होतं. पूर्णपणे मागासलेल्या या भागात आधुनिक सोईंनी सुसज्ज असलेल्या एज्युकेशन सिटीला भेट देण्याचं आम्ही आधीच ठरवलं होतं. त्यामुळेच दंतेवाडाला (सुकमावरून पुन्हा मागे, आमच्या सायकलच्या रूटमध्ये नसतानाही) आम्ही जाणार होतो. तसेच दंतेवाडा हे नाव पडलेल्या या परिसरातील दैवत असलेल्या माँ दंतेश्वरीदेवीच्या मंदिरातही जायचं होतं. १४व्या शतकात चालुक्य राजांच्या काळात बांधलेले हे मंदिर स्थापत्यशास्त्राचं मूर्त प्रतीक होतं. सायकलनं सुकमाहून दंतेवाडाला जाणं व पुन्हा सुकमाला येणं खूप वेळखाऊ होतं. त्यामुळे आम्ही सुकमाहून दंतेवाडाला बसने जाण्याचं ठरवलं. एक दिवस तिथे राहून, सर्व प्रदेश फिरून आम्ही पुन्हा सुकमाहून मार्गस्थ होणार होतो. सुकमा जिल्ह्यात जिल्हाधिकारी म्हणून काम करणाऱ्या व महाराष्ट्रीय नीरज बनसोड याचीही आम्ही भेट घेणार होतो. तसंच महिला शिक्षणसबलीकरण, आरोग्य या क्षेत्रांत काम करणाऱ्या संस्थांच्या कार्यकर्त्यांनाही सुकमात भेटणार होतो. एकंदरीत भरीव नियोजन होतं.

सकाळी प्रवासाला सुरुवात करून दोन तास झाले होते. उन्हं केव्हाच डोक्यावर आली होती. रस्त्यावरची वर्दळ वाढली होती. माझ्या सायकलच्या पॅडलचा नट सारखा पडत होता. तो पुन्हा जोडून पुढे जात होतो. तो नवीनच टाकायला लागणार होता, पण मधे कुठे सायकलचं दुकान नव्हतं. विचारल्यावर कुटरूला असल्याचं कळलं होतं. कुटरू अजून ५ ते ७ किलोमीटर लांब असल्यानं तसंच जाणं भाग होतं. साधारण दुपारी एकच्या रणरणत्या उन्हात आम्ही कुटरूला पोचलो. गावचा आज

नेमका बाजार होता. त्यामुळे खूप गर्दी होती. गावात प्रवेश करताच हातात बंदुका घेऊन उभे असलेले सीपीआरएफ व छत्तीसगडी पोलीस दिसले. एवढा मोठा पोलिसांचा पहारा पाहून या परिसराची गहनता आम्हाला आधीच जाणवली होती. आम्हीही 'जय हिंद' म्हणून त्यांना सॅल्यूट करून आमच्या एकंदर दौऱ्याबद्दल माहिती दिली. त्यांनी आमचे ओळखपत्र तपासून आम्हाला पुढं जायची परवानगी दिली.

तसं कुटरूबद्दल आधी खूप वाचलं होतं. गावाचा विस्तार मोठा होता. बऱ्यापैकी विकास झालेला होता. गावात रस्ते, शाळा, लाइट, सरकारी दवाखाना यांची उपलब्धता होती. २००५ मध्ये सुरू झालेल्या 'सलवा जुडूम' नावाच्या प्रयोगाची सुरुवात याच खेड्यातून झालेली होती. या प्रयोगाचा अर्थ 'शांती यात्रा' असा होतो, परंतु या प्रयोगाचा, चळवळीचा उद्देशच नक्षलचळवळ कमी करणे असल्यानं हिंसाचार खूप झाला होता. स्थानिक लोकांना एकत्र करून, त्यांना प्रशिक्षण देऊन, त्यांच्या हातात शस्त्र देऊन नक्षलींविरोधात लढण्यास तयार केले होते. यात लहान मुलांपासून तरुणांचा मोठ्या प्रमाणात भरणा होता. असे हजारो शस्त्रधारी युवक आणि पोलीस एकत्र येऊन नक्षलग्रस्त भागात मोहीम राबवत होते. यात नक्षलसपोर्ट करणारी गावे जाळून टाकणे, त्या भागातील घरे नष्ट करणे, लोकांना मारणे- असे करत ही मोहीम राबवली गेली होती. काँग्रेसचेच नेते असलेले महेंद्र कर्मा यांच्या नेतृत्वाखाली ही मोहीम आखली गेली होती. दंतेवाडा, सुकमा या बस्तर भागात मोठ्या प्रमाणात ही मोहीम राबवण्यात आली होती. मोठ्या प्रमाणात हिंसाचार झालेला होता. अनेक निरपराध लोकांचा नाहक बळी गेला होता. दोन्ही बाजूंचे बरेच नुकसान झाले होते. अनेक तरुणांना, पोलीस अधिकाऱ्यांना व नक्षलींच्या बड्या नेत्यांना प्राण गमवायची वेळ आली होती. बलात्काराच्या, लुटण्याच्या असंख्य घटना घडल्या होत्या. अशा चळवळीच्या केंद्रबिंदू असलेल्या कुटरू या गावात आम्ही नुकताच प्रवेश केला होता.

गावात बाजार असल्याने आसपासच्या गावचे आदिवासीबंधू आपला माल विकण्यास व विकत घेण्यास आले होते. यात जंगलात मिळणाऱ्या अनेक उत्पादनांचाही समावेश होता. यात मध, डिंक, फळे त्याचबरोबर शेतातील धान, मिरची, बांबूपासून बनवलेल्या वस्तू यांचा समावेश होता. त्याचबरोबर खाण्यासाठी जिलबी, लाडू, चिवडा- विशेषकरून मांस-मच्छीच्या मोठ्या प्रमाणात रांगा लागलेल्या दिसत होत्या. एकूणच मोठा बाजार असल्यामुळे तुडुंब गर्दी होती. गर्दीतून वाट काढत आम्ही थोडे आतमध्ये गेलो. ठरल्याप्रमाणे के.मधुकर राव यांचा पत्ता विचारू लागलो. समोरच्याला पत्ता विचारताना आधी तो आमची विचारपूस करत होता. शेवटी लालसूंचं नाव सांगितल्यावर एकाने पत्ता सांगितला. तसा जवळचाच होता. सरळ पुढे जाऊन डाव्या बाजूला असलेल्या शाळेचा तो पत्ता होता. आम्ही

चालतच तिथे गेलो.

शाळेच्या आवारात पोचल्यावर एका कडेला सायकली लावून आम्ही आत जाऊन एका उघड्या खोलीत त्यांची वाट पाहत बसलो. काही वेळातच पॅन्ट-शर्ट, खांद्यावर पांढरी पट्टी असलेली, बरोबर दोन बंदुकधारी पोलीस असलेली साधारण ४५-५० वय असलेली एक व्यक्ती आत आली. सावळा रंग, जेमतेम उंची असलेली ही व्यक्ती के. मधुकर राव असावी, अशी खात्री पटली. या व्यक्तीला भेटण्यामागचं प्रयोजनही तसंच महत्त्वाचं होतं. महेंद्र कर्मांच्या मृत्यूनंतर के. मधुकर राव सलवा जुडूमचे दुसऱ्या क्रमांकाचे नेते होते. या प्रदेशातून जात असल्याने तसेच आदिवासी व नक्षल चळवळीचा अभ्यास करताना त्यांना भेटणे गरजेचे होते. आमची चौकशी व विचारपूस आधीच झाल्याने ते आमच्यासमोर येऊन बसले. पुन्हा खात्री म्हणून साध्या वेशात असलेल्या त्यांच्याबरोबरच्या पोलिसाने आमची चौकशी केली. सर्व सोपस्कार पार पडल्यानंतर आम्ही आमच्या अभियानाची व एकंदर प्रवासाची थोडक्यात त्यांनाही माहिती करून दिली. आमचं शिक्षण, नाव, कुठून आलो यासारख्या प्राथमिक ओळखीनंतर मुख्य भागाकडे वळलो. कुटरू गावाबद्दलची माहिती आम्ही जाणून घेत होतो. गावाची लोकसंख्या, शिक्षणाची सोय, आरोग्याची- शाळेची उपलब्धता याबद्दल माहिती विचारत होतो. तेदेखील त्यांच्यापरीने सांगत होते. सलवा जुडूमबद्दलही आम्ही त्यांना विचारलं. त्यावर ते म्हणाले, ''हमने तो हमारे उपर होनेवाली अन्याय विरुद्ध पुकारी हुई जंग थी। जब नक्षली हाथ में बंदुका ले सकते है, तो हम हमारे रक्षण के लिए हाथ में बंदुक क्यों नही ले सकते? नक्षलीयों के कारण हमारे गाव का, हमारे प्रदेश और राज्य का विकास नही हो पाता। हम इसको किस हद तक सह सकते है? इसलिए गांव और राज्य में कोई आना ही नही चाहता। लेकिन हमारे इस प्रयास को सुप्रीम कोर्टने २०११ को बंद करने को कहा।''

आम्ही तिघेही लक्ष देऊन शांतपणे ऐकत होतो. यानंतर मी ''इसके बाद कितने लोक मृत्युमुखी हुए।'' असं विचारलं. ''उसकी पुरी जानकारी हमने सुप्रीम कोर्ट को दी है'' असं म्हणत जास्त बोलण्याचं टाळलं. ''नक्षलीओने हमारे अनेक लोगों को मार कर दफना दिया। इसलिए बहुत लोगों का कुछ पता नही है। हम यहाँ जिन बच्चों के माँ-बाप इसमें मरे है उनके लिए पाठशाला चलाते है। उनकी पूरी खाने-रहने की व्यवस्था की है।'' असं ते आम्हाला सांगत होते. चहा आणि चिवडा खातच आम्ही ऐकत होतो.

''आज एक लडकी का हम जनमदिन मना रहे है।'' असं सांगून, ''थोडी देर में खाना आ जाएगा, आप खाना खा कर ही जाओ'' असं म्हणत त्यांनी आम्हाला जेवणाचा विनंतीवजा आग्रह केला. पण अजून खूप अंतर जायचं असल्यानं आणि

जेवण तयार होण्यासही अवकाश असल्याने आम्ही ''नही, हमें आज बिजापूर को पहुँचना है। हमे तो निकलना चाहिए'' असं त्यांना सांगितलं. जाताना शाळेतील मुलांना भेटण्याची इच्छा व्यक्त केली. त्यांनी ती मान्य करून मुलांना बाहेर बोलावलं. यात अगदी चार वर्षांपासून ते सोळा वर्षांच्या मुला-मुलींचा समावेश होता. एवढ्या लहान मुलांना पाहून आम्हाला खूप आनंदही झाला आणि दु:खही झालं होतं. आनंद अशासाठी की, आम्हाला एवढ्या लहान मुलांना भेटता आलं आणि दु:ख याचं होतं की, एवढ्या लहान वयात त्यांचं आई-वडिलांचं छत्र हरपलं होतं. आम्ही कुणाला गाणं म्हणता येत असेल तर म्हणण्याचा आग्रह केला, तर त्यांनीही सामूहिक गीत सादर केले. 'आज हमारे यहाँ अतिथी पधारे है।' असे त्या गीताचे बोल होते. खूप सुंदर असं सामूहिक गीत एका स्वरात ते सर्व गात होते. आम्ही आमच्याकडील चॉकलेट्स त्यांना वाटली. घेताना प्रत्येक जण 'थँक्यू' म्हणत होता. आम्ही त्यांच्याबरोबर अर्धा तास घालवला. पण वेळ कसा गेला ते समजलंच नाही. तिथून पाय निघत नव्हता, पण जाणं तर भागच होतं. त्या निरागस चेहऱ्यांवरचं हे हसू कायम राहावं, अशी ईश्वराची प्रार्थना करत आम्ही निरोप घेतला.

प्रत्येक जण आमच्याकडे मोठ्या कुतूलहलाने पाहत होता. तीन सायकली, चार बॅगा आणि आम्ही तिघे- असा आमचा लवाजमा होता. चौकातच नक्षलवाद्यांच्या विरोधात लढताना मृत्युमुखी पडलेल्या व्यक्तींच्या स्मरणार्थ एक स्मारक बांधलेलं होतं. या स्मारकावर लहान अक्षरांत अनेकांची नावं लिहिलेली होती. ती बघून आम्ही पुढील प्रवासाकडे निघालो होतो. वाटेत सायकलच्या दुकानात माझ्या सायकलचं पॅडल दुरुस्त केलं. दुपारचे दोन-तीन वाजत आले होते. रणरणत्या उन्हात आम्ही चाललो होतो. थोडा नाश्ता केल्याने भूक तात्पुरती भागलेली होती. बिजापूर अजूनही साधारण १५-२० किलोमीटर दूर होतं. रस्त्याच्या कडेला दुतर्फा जंगल असल्याने उन्हाची तीव्रता जाणवत नव्हती. आम्ही सायकली आता वेगाने दामटत होतो. रस्ता मोकळाच असल्याने काही वाटत नव्हतं.

कुटरूपासून बरंच पुढं आल्यावर रस्त्याच्या दुतर्फा झाडांच्या फाद्यांना पांढरे पेपर अडकवलेले दिसत होते आणि त्याच्यावर लाल रंगानं काही तरी मजकूर हिंदीत लिहिला होता. आम्ही मोठ्या उत्सुकतेनं सायकली थांबवून वाचण्याचा प्रयत्न केला. 'विकास के नाम पर भांडवलदारों का घर भरनेवाली सरकार का धिक्कार हो', 'लाल क्रांती आने वाली है', 'गरीब किसानों की खेती हडपने वालों को हम छोडेंगे नहीं' अशा बऱ्याच प्रकारची पत्रकं होती ती. खाली एरिया कमांडर, बस्तर (सीपीआयएम) असा मजकूर लिहिलेला होता. असा प्रकार साधारण २०० ते ३०० मीटरपर्यंत होता. नक्षलवाद्यांची पत्रकं होती ती.

आता आम्ही जगदलपूरहून बिजापूरला जाणाऱ्या नॅशनल हायवेला लागलो

होतो. कुटरूहून येणारा रोड या हायवेला जोडतो, तिथे मोठा चौक आहे. याच चौकात आम्ही काही वस्तू घेण्यासाठी थांबलो होतो. त्यात दूध, साखर, चहापावडर यांचा समावेश होता. पुढे त्याचा आम्हाला उपयोग होणार होता. तिथेच आम्ही अर्धा लिटर दुधाची पिशवी फस्त केली आणि दुधाच्या आणखी पिशव्या घेतल्या. पाश्चराईज्ड केलेल्या अमुल दुधाच्या पिशव्या नासण्याची किंवा गरम करण्याची गरज भासणार नव्हती. केळांचा दर ५० रुपये डझन असल्याचं कळलं, तरी एक डझन केळी घेऊन तिथेच खाल्ली.

सहा वाजत आले होते. आम्ही निघणार तोच श्रीकृष्णच्या सायकलच्या मागच्या टायरमधली हवा गेल्याचं कळलं. जवळच सायकल रिपेअरचं दुकान असल्यानं आमचा वेळ वाचला. पंक्चर होती. शकिराने आता कळस केला होता. तीनदा पंक्चर झाली होती. आमच्या दोघांच्या सायकलमध्ये हवा भरण्याचीही गरज भासली नाही. आदर्शची माधुरी तर मोठ्या ऐटीत विनाअडथळा पळत होती. पंक्चर काढत असतानाच शेजारचे काका आमची विचारपूस करत होते. महाराष्ट्रातून आल्याचं कळताच त्यांनी जवळच एका टपरीवर रंगकाम करणाऱ्या व्यक्तीला आमच्याकडे बोलावलं. विचारल्यावर कळलं की, ती व्यक्ती महाराष्ट्रातील अमरावती जिल्ह्यातील होती. त्यांनी तिथे रंगकामाचं कॉन्ट्रॅक्ट घेतलेलं होतं. त्यांनादेखील आम्ही पुण्याहून आल्याचं कळल्यावर खूप आनंद झाला. आमच्या मोहिमेबद्दल कळल्यावर त्यांनी आश्चर्य व्यक्त करत चहा घेण्याचं सुचवलं. पण आम्ही आधीच दूध घेतल्याचं आणि सायकल चालवताना चहाने त्रास होत असल्याचं त्यांना सांगितलं. 'सावकाश व काळजी घेत प्रवास करा' असा सल्ला देत त्यांनी आमचा निरोप घेतला.

निघायला सहा वाजले असतील. रोड रुंदीने मोठाच होता. दोन पदरी असूनही पुण्या-मुंबईसारखी वाहतूक नव्हती. मोठ्या गाड्यांचं प्रमाण कमी होतं. खासगी बसेस, दोन चाकी, चार चाकी अशा गाड्यांचं प्रमाण जास्त होतं. आता अंधार पडायला लागला होता. त्यामुळे पुढील रस्त्यावरील काही दिसत नव्हतं, म्हणून आमच्याकडील एकानं बॅटरी हातात घेतली. बॅटरीच्या छोट्या प्रकाशात आम्ही मार्ग काढत निघालो. रस्त्याच्या कडेला दुतर्फा घनदाट जंगल होतं. मधेच एखादी गाडी पुढून आली की त्या प्रकाशामुळं दिलासा मिळायचा. तिघेही अंतर ठेवून हळूहळू निघालो. रस्ताने एकदम १०-१५ दुचाकी गाड्या लाइट न लावता येत असत. जवळ आल्यावर ते सीआरपीएफचे जवान पेट्रोलिंगला निघालेले दिसत होते.

जसजसं आम्ही पुढे जात होतो तसतसा रस्त्याच्या दुतर्फा दिव्यांचा प्रकाश दिसू लागला. रस्त्याच्या दोन्ही बाजूला रेसिन्डेंशियल एरिया होता. तसंच सरकारी अधिकाऱ्यांची अनेक निवासस्थानं होती. रस्त्याच्या कडेला एका ठिकाणी

हातगाडीवर काही तरी खाण्याचा पदार्थ दिसत होता. जवळ गेल्यावर कळलं की, उकडलेल्या अंड्याची प्लेट व भुर्जी मिळत होती. भूक तर खूपच लागली होती. पोटात कावळे ओरडायला लागले होते. मी आणि आदर्शने अंड्यांच्या दोन प्लेट भुकेच्या तडाख्यात फस्त केल्या. रस्त्याच्या दुतर्फा दिवे असल्याने लख्ख प्रकाश पडला होता. अंड्यांवर ताव मारून आम्ही पुढे निघालो. आता रस्त्याच्या दोन्ही बाजूला घरे, मोठाल्या बिल्डिंग, दुकाने यांच्या रांगाच लागल्या होत्या, पण वर्दळ कमीच होती.

आम्ही रस्त्याच्या डाव्या बाजूला असलेल्या मंदिराकडे वळलो. मंदिर आकाराने मोठं होतं. पुढे प्रशस्त जागा होती. आतमध्ये दोन भाविक तिथल्या पुजाऱ्यांशी गप्पा मारत बसलेले दिसले. कडेला सायकली लावून आम्ही परवानगी काढण्यासाठी आत जाऊन पुजारीकाकांना आमची ओळख करून दिली. साधारण ६६-७० वर्षांचे पुजारी पायाने अपंग होते. आमच्या एकूण दौऱ्याबद्दल माहिती देऊन आजची रात्र झोपण्याची सोय होईल का, म्हणून विचारलं. सुरुवातीला थोडे आढेवेढे घेत, पोलीस पूछताछ करती है, असं म्हणत परवानगी दिली. परवानगी मिळताच आम्ही सामान सोडून घेऊ लागलो. सामान आत ठेवल्यावर, शेजारीच असलेल्या पाण्याच्या टाकीवर फ्रेश होऊन आम्ही जेवायला निघालो.

साधारण ९ वाजत आले असावेत. तसं छत्तीसगडमध्ये पूर्ण शाकाहारी हॉटेल मिळणं खूपच कठीण होतं. कारण आदिवासी समाजात मांस-मच्छी यांचं आहारात मुख्य स्थान होतं. जवळच्याच एका हॉटेलमध्ये आम्ही जेवण करणं पसंत केलं. डाळ, भात, रोटी आणि दोन भाज्या असा मेनू होता. जेवण तसं साधं होतं, पण भूक लागल्यामुळे पोटभर जेवण केलं. भूक लागल्यावर माणूस कसलंही जेवण पसंत करतो, हे अनुभवातून जाणवत होतं. मग घरच्यांना फोन करून आम्ही बिजापूरला पोचल्याचं व सुखरूप असल्याचं सांगितलं. थोडा फेरफटका मारून पुन्हा मंदिरात आलो. मंदिरातच असलेल्या मोठ्या चादरी खाली टाकण्यास पुजाऱ्यांनी आम्हाला दिल्या होत्या. थंडी लागू नये म्हणून एकावर एक अशा दोन चादरी खाली टाकल्या. मंदिर मोठं असल्याने थंडी अधिकच वाजत होती. मंदिराला गेट असल्यामुळे त्यातून खूप हवा आत येत होती. गेटची चावी त्यांनी आमच्याकडेच दिली. जाताना पुजारींबरोबर सेवा करणाऱ्या ताईंनी 'सकाळी लवकर येते' असं म्हणत निरोप घेतला.

सकाळी ताईंनी हाक मारल्यावरच जाग आली. मंदिरात रात्री दोघांना मोठा उंदीर दिसला. तो बॅगेतल्या सामानाची नासधूस करेल, या भीतीने त्यांनी पळता भुई थोडी झाली होती. सकाळी उठल्यावर रात्रीचा हा किस्सा त्यांच्याकडून ऐकताना हसणं आवरता येत नव्हतं. पुन्हा सर्व सामान बांधून फ्रेश झालो होतो. मंदिरासमोर

SENIOR 45719

रस्त्याच्या पलीकडच्या बाजूला दंतेवाड्यात यशस्वी ठरलेल्या लाइव्हली हूड प्रकल्पाची मोठी इमारत होती. आम्ही आत जाऊन सकाळीच तिची पाहणी केली. दोन वर्षांपूर्वीच त्या बिल्डिंगचं मुख्यमंत्र्यांच्या हस्ते अनावरण झालं होतं. आतमध्ये मुलींसाठी शिवणयंत्र कोर्स, मुलांसाठी इलेक्ट्रिक, मशिनिस्ट, फिटर असे एकूण २५ कोर्स उपलब्ध होते. हा प्रकल्प पाहून ताईंचा निरोप घेऊन आलो. प्रवासाला सुरुवात करणार असल्यामुळे कुठे नाश्ता मिळतोय का, याची चाचपणी करत होतो. थोडे पुढे गेल्यावर एक टपरीवजा दुकानाबाहेर 'साऊथ इंडियन पदार्थ मिळतील' अशी पाटी होती. यात इडली, डोसा यांचा प्रामुख्याने समावेश होता. साहजिकच आम्ही आमचा मोर्चा तिकडे वळवला. खूप दिवसांनी काही तरी वेगळं खायला मिळत होतं. तिघांनीही डोसा खाणंच पसंत केलं. डोशाची चवही स्वादिष्ट होती. त्यामुळे आमची स्वारी भलतीच खूश होती.

जवळ पोलीस स्टेशन होतं. तिथे मोठ्या प्रमाणात फौजफाटा तैनात केलेला होता. त्याकडं दुर्लक्ष करत आम्ही पुन्हा सायकलवर स्वार झालो. आमच्या मागून दोन परदेशी तरुणी येताना दिसल्या. त्या दोघीही सायकल चालवत येत असल्याने आम्ही त्यांची चौकशी केली. त्या दोघीही जर्मनीहून आदिवासी प्रश्नांचा अभ्यास करण्यास आल्या होत्या. एका संस्थेमार्फत त्या तिथे महिन्याभरापासून काम करत होत्या. त्यामुळे आम्हालाच त्यांच्याबद्दल खूप कुतूहल आणि आश्चर्य वाटत होतं. त्यांना जवळच असलेल्या संस्थेच्या कार्यालयात जायचं असल्यानं त्यांनी आमचा निरोप घेतला. परदेशातून येऊन स्थानिक आदिवासी लोकांचे प्रश्न जाणून घेणे- तेही भाषेचा, संस्कृतीचा, विचारांचा अडथळा असतानाही- सगळं काही अचंबित आणि विचार करायला लावणारं होतं.

G.M.D. Arts, B.W. Commerce & Science College, Sinnar Library

५

आम्ही आता बिजापूर शहराच्या बाहेर चाललो असल्याने, माणसांची वर्दळ कमी झाली होती. जसजसं आम्ही पुढे जात होतो तसतशी पोलिसांच्या गाड्यांची ये-जा वाढली होती. पुन्हा घनदाट जंगल सुरू झालं. बरंच पुढं गेल्यावर रस्ता एकदम अरुंद झालेला दिसत होता. आता सीआरपीएफचे जवान दिसू लागले. पुढे रस्त्याचं काम चालू असल्याचं दिसत होतं. क्वचितच एखादी गाडी समोरून येत होती. पुढं दोन-तीन मशीनने रस्त्याच्या कडेची झाडे काढण्याचं काम चाललं होतं. पायी चाललेल्या सीआरपीएफ जवानांना आम्ही 'जय हिंद' म्हणत सलाम ठोकून पुढे जात होतो. त्यांनी आपुलकीने चौकशी-विचारपूस केली. आम्ही आमच्या अभियानाबद्दल माहिती देत होतो. बहुतेक हा खूपच नक्षलप्रभावित इलाका असल्याचं पोलिसांच्या संख्येवरून कळत होतं.

थोडं पुढं गेल्यावर चांगला रस्ता लागला. त्यामुळे सायकल चालवायला सोपी जात होती. अनेक गावं मधे लागली. काही अंतर गेल्यावर सीआरपीएफ कॅम्प लागला. चेकपॉइन्ट होता तो. तिथल्या जवानाने आमचे आयकार्ड तपासत आमची चौकशी केली. ''भाई, ये बहुत नक्षलप्रभावित इलाका है, आप यहाँ सायकल पे क्या कर रहे हो?'' ४०-४५ वय असलेल्या या जवानाला 'हम महाराष्ट्र के है' असं सांगितलं. त्यानं साथीदाराला 'महाराष्ट्र के लडके को बुलाओ' असं म्हणत इशारा केला. काही वेळाने एक तरुण तिथे आला. त्याच्याशी बोलताना कळलं की, तो औरंगाबादचा आहे. त्याला खूप दिवसांनी किंवा पहिल्यांदाच असा कुणी तरी मराठी माणूस भेटला असावा. त्याने जातीने विचारपूस करत पाणी प्यायला दिले.

आता प्रत्येक ठरावीक चार-पाच किलोमीटरवर सीआरपीएफचा कॅम्प लागत होता. प्रत्येक ठिकाणी आमची चौकशी केली जात होती. एका ठिकाणी आम्ही ''आगे जाने के बाद कुछ नहीं होगा ना!'' असं एका जवानाला विचारलं, तर त्यानं ''अरे, उनके दुष्मन तो हम है। आप तो खाली विद्यार्थी हो। आपको कुछ नही करेंगे। खाली आपकी पूछताछ करेंगे और छोड देंगे।'' असं सांगत ''संभल कर सायकल चलाना। बीच-बीच में उन्होने आयइडी (इंप्रोव्हाइस्ड एक्स्प्लोझिव्ह डिव्हाइस) लगाया हुआ होता है'' असं म्हणत आम्हाला काळजी घेण्यास सांगितलं. माणुसकीवर तर आमचा गाढ विश्वास होताच आणि आमचा हेतूही स्वच्छ होता. त्यामुळे आम्हाला भीती नव्हती. भीती होती ती वाटेत आयइडी असल्याची. कारण माणसाशी बोलून तुम्हाला तुमचं मत मांडण्याची तरी संधी मिळते, पण आयइडीशी कसला आलाय संवाद? त्यावर वजन पडलं की तो फुटणारच! शक्य तेवढी काळजी घेत आम्ही सायकल चालवत पुढे निघालो.

वाटेत अनेक शाळा लागत होत्या. त्यातल्याच एका शाळेत आम्ही गेलो. नाताळमुळे शाळेला सुट्टी होती. पण एक शिक्षक पेपर तपासत होते. त्यांच्याशी संवाद साधला, माहिती घेतली. नंतर एका अंगणवाडीत गेलो. तेथील मुलांना चॉकलेट्स देऊन पुढे निघालो.

पुढे बऱ्याच अंतरावर सीआरपीएफ कॅम्प लागला. कडक ऊन पडल्यामुळं खूपच गरम होतं होतं. तहानही लागली होती. कूलरचं थंड पाणी कॅम्पच्या बाहेरच झाडाखाली पिताना खूप बरं वाटत होतं. उन्हामुळं आणि भुकेमुळं खूपच थकवा जाणवत होता. तिघांनाही खूप भूक लागली होती. चेकपोस्टवर ड्युटी करत असलेले जवान आमची विचारपूस करत होते. आमच्या अभियानाबद्दल जाणून चकित होत होते. त्यातील एक तरुण जवान म्हणाला, ''अरे भाई, यहाँ क्यों आये हो? देश जोडना ये नक्षली कुछ नहीं जानते, वे तो खाली देश उडाना जानते है।'' त्यानंतर लगेच शेजारच्या आणि वयाने मोठ्या असलेल्या जवानाने 'भाई, घबराओ मत।

आपको नक्षली कुछ नहीं करेंगे। आप तो बच्चे है।' असं म्हणत आम्हाला जेवण केलं का म्हणून विचारलं. ''अभी नही किया। पर बहुत भूख लगी है। हम आगे जा कर खाना बनानेवाले है'' असं सांगितल्यावर ते म्हणाले, ''हमारे मेस में बचा हुआ खाना है। दाल-रोटी है, खा लो। आपका पेट भर जाएगा'' असं म्हणत आपल्या एका सोबती जवानाला आतून जेवण आणायला सांगितलं. काही क्षणांतच त्यांनी रोटी, डाळ, कांदा आणलं. खूप भूक लागल्यामुळे आम्ही तिघेही त्यावर अक्षरशः तुटून पडलो. सगळ्याची भन्नाट चव लागत होती.

खाता-खाता आम्ही त्यांच्याशी गप्पा मारत होतो. प्रत्येकाला त्याचं नाव, कुठले आहात असं विचारत होतो. कुणी बिहार, कुणी हरियाणी, कुणी उत्तर प्रदेश, कुणी गुजरात, तर कुणी आसाम असे वेगवेगळ्या राज्यांतून इथे आलेले होते. तसा विचार केला तर संपूर्ण भारतच इथे सामावला होता. 'गाव कब जाते हो?' असं विचारल्यावर 'चार-पाच महिने के बाद जाते है' असं हसतच एकानं उत्तर दिलं. घरापासून इतकं लांब राहत असलेल्या या जवानांचा खरंच अभिमान वाटत होता. पोटभर जेवण केल्यामुळे ग्लानीही यायला लागली होती. जेवण झाल्यावर थोडा वेळ थांबून आम्ही निघालो. जाताना जवानांना कॅडबरी दिली. सुरुवातीला त्यांनी ती न घेता, 'आपको आगे लगेगी, आप खाओ' असं म्हटलं. पण अखेर आमच्या आग्रहाखातर घेतली. सर्वांचा निरोप घेत आम्ही मार्गस्थ झालो.

साधारण ४.३० वाजले असावेत. दिवस मावळायला सुरुवात झाली होती. रस्त्यावर चुकून एखादी गाडी किंवा माणूस दिसत होता. रस्त्याच्या कडेने पूर्ण घनदाट जंगल होते. निघताना एक मोठा उतार होता. या उतारावरून अबुझमाड पर्वतरांग दिसत होती. घनदाट जंगलांनी वेढलेल्या ह्या प्रदेशाचं दृश्य मोहून टाकणारं होतं. आम्हाला कळून चुकलं होतं की, आम्ही आज बासागुडाला पोचणं शक्य नाही. त्यामुळे पुढे एखाद्या गावातच मुक्काम करावा, असं ठरवलं. पण पुढे कुठे गाव नसल्याने तसेच पुढे चाललो होतो. पुढे बासागुडा म्हणून एक गाव आहे, असं कळलं होतं. साधारण ५.३० ते ६ च्या दरम्यान गावात पोचलो. गावाच्या सुरुवातीलाच पोलिसांची चौकी होती. त्याच्या समोरच्या बाजूला सीआरपीएफ जवानांचा कॅम्प होता. गावात शाळा असल्याचं कळलं होतं. पण आधी मुलांनी आम्हाला एक वयस्कर स्त्री राहत असलेल्या घरात पाठवलं. कारण शेजारीच असलेल्या मंदिराच्या त्या पुजारी होत्या. तिथे रात्री खूप थंडी वाजेल म्हणून त्यांनी शाळेतील शिक्षकांना भेटून शाळेतच सोय होते का, हे पाहण्यासाठी आम्हाला शिक्षकांकडे घेऊन जाण्यास मुलांना सांगितलं. शाळेच्या मागच्या बाजूला राहत असलेल्या शिक्षकांना आमची ओळख व दौऱ्याबद्दल सांगितल्यावर शाळेत राहण्याची परवानगी दिली. वसतिगृहात मुलांबरोबर राहण्याची सोय झाली. बिजापूर जिल्ह्यातील हे शेवटचं गाव होतं.

गावातील पोलीस चौकीसमोर अनेक तरुण व्हॉलिबॉल खेळण्यात मग्न होते. गाव तसं छोटचं. साधारण ५० ते ६० घरं असावीत. जवळून एक नदी वाहत होती. डिसेंबर महिना असल्यानं नदीला जेमतेम पाणी होती. सर्व सामान सोडून आम्ही आतमध्ये ठेवत होतो. वसतिगृहातील चार-पाच मुलंही बरोबर होती. त्यांनाही कुणी तरी सायकलवर आल्याचं खूप कौतुक आणि आश्चर्य वाटत होतं. सर्वांनी आम्हाला भैया, दादा म्हणत केव्हाच आपलंसं करून टाकलं होतं.

शाळा नुकतीच सुरू झाल्यामुळे वसतिगृहातील सगळी मुले गावाकडून आलेली नव्हती. फक्त पाच-दहा मुलंच आली असल्याने एका रूममध्ये आमची झोपायची सोय झालेली होती. आदर्शला खोकला व सर्दी झाली असल्यानं तो पोलीस चौकीतच जवानांसाठी असलेल्या दवाखान्यात जाऊन आला होता. बासागुडामध्ये बीएसएनएलची रेंज येत-जात होती. घरून फोन आले, तेव्हा खूपच मोठ्या आवाजात बोलावं लागत होतं. अंधार पडायला लागला होता. होस्टेलमधील मुलांनी जेवणाची तयारी सुरू केली. तेच जेवण बनवणार होते. मेनू होता भात आणि त्याबरोबर दालसांबार. हे सर्व ते चुलीवर करणार होते. गॅस त्यांना माहीतच नव्हता. जंगलातून मिळणारे लाकूड हाच त्यांचा गॅस होता. दोन दिवस अंघोळ न केल्यामुळे मी आज मस्त अंघोळ करणार होतो. वातावरणात गारवा असल्याने मुलांच्या आग्रहाखातर आमच्यासाठी चुलीवर मोठ्या पातेल्यात पाणी ठेवलं होतं. जवळून वाहत असलेल्या 'तालपेरू' नदीमुळे आणखीनच थंडी वाजत होती. लाइट गेल्यामुळे अंधारातच जेवण बनवण्याची तयारी सुरू होती. आम्ही आमच्याकडील बॅटरीच्या साह्याने त्यांना मदत करत होतो. पाणी कडक तापलं होतं. खूपच दिवसांनी मी गरम पाण्यानं जवळ असलेल्या हातपंपावर अंघोळ केली. त्यावर सोलर लावून व्यवस्था केली होती. दिवसभर सूर्याच्या प्रकाशाने सोलरवर बसवलेली बॅटरी चार्ज होऊन ती मोटारीला जोडून पाणी हातपंपातून वर खेचून पाणी साठवण्याची व्यवस्था केली होती. आधुनिक तंत्रज्ञान वापरून तयार केलेली सिस्टीम मी पहिल्यांदाच पाहत होतो. सरकारने तो हातपंप बसवलेला होता. नंतर त्याबद्दल वाचन केल्यावर कळलं की, अशी व्यवस्था करण्यासाठी पाण्याची पातळी वर असावी लागते. आपल्याकडे पाण्याची पातळी खूपच खाली असल्याने अशी व्यवस्था करता येणार नाही.

जेवण आता तयार होत आलेलं होतं. सांबाराचा खमंग वास येत होता. 'खाना बनाने के लिए कोई आदमी नही हैं?' असं आम्ही त्या मुलांना विचारलं. त्यावर 'एक आदमी है, लेकिन वो नही आता। हमें ही खाना पकाना पडता है।' असं सांगितलं. ही मुलं जेवण बनवण्यात वाकबगार दिसत होती. शिक्षकही तिथे आले. आजच ते त्यांच्या गावावरून आले होते. जगदलपूरच्या आसपास ते गाव होतं. ते आमच्याशी गप्पा मारत होते. ''भाई, तुम इतने कठीन इलाके में क्यों आये हो? यहाँ से आगे बहुत

खतरा है। आप आगे नहीं जा सकते।'' पन्नाशीच्या जवळपासचे हे शिक्षक मोठ्या पोटतिडकीने सांगत होते. ''हमारा सायकल अभियान है। हम तो स्टुडंट है। वे हमे कुछ नहीं करेंगे, पूछताछ करेंगे और छोड देंगे।'' असं उत्तर आम्ही दिलं. शिक्षकांनी काहीसं हसून वेळ मारून नेली.

आम्ही त्यांच्याकडून इथल्या परिसराबद्दल, शाळेबद्दल माहिती विचारली. दहावीपर्यंत शिक्षणाची सोय या शाळेत होती. आसपासच्या अनेक गावांतून मुलं-मुली शिकण्यासाठी येत असतात. काही महिन्यांपूर्वी पुलाच्या पलीकडे पोलीस आणि नक्षलवादी यांच्यात चकमक झाली होती, असं त्यांनी सांगितलं. गावातील अनेक तरुण हे पोलिसांत होते. ग्रामपंचायत नावाचा तर प्रकारच नव्हता. गावात ख्रिश्चन आणि हिंदू या धर्मांचे लोक मोठ्या प्रमाणात राहात असल्याचं त्यांच्याकडून कळलं होतं. रात्रीचे आठ वाजले असावेत. शिक्षकांनी 'सकाळी पुन्हा भेटू या' असं म्हणत निरोप घेतला. मुलांनी सर्व जेवण रूममध्ये नेलं होतं. आमच्यासाठी ताटांचा बंदोबस्त करण्यात आला होता. जेवायला बसायच्या आधी लाइट आली. आम्ही सर्व जण एकाच खोलीत जेवणावर ताव मारत होतो. त्याचबरोबर सर्वांशी ओळख करून घेत होतो. प्रत्येक जण आसपासच्या खेड्यातून शिकण्यासाठी आलेला होता. गप्पांचा ओघ सुरूच होता. मुलं शिक्षणाबद्दल अनेक प्रश्न विचारत होती, अनेक शंकांचं समाधान करून घेत होती. त्यातील एक जणाने मोठ्या गंभीरतेने 'भैया, आपको यहाँ नहीं आना चाहिए, यहाँ आगे बहुत खतरा है' असं मत व्यक्त केलं. आम्हीही 'हमारा उद्देश साफ है, हम तो विद्यार्थी है, इसलिए वो हमें कुछ नही करेंगे' असं म्हणत शांतपणे त्यांना समजावून सांगितलं. 'हां भैया, वो लोग आपको कुछ नहीं करेंगे' असं म्हणत त्यांच्यातल्या एकाने पाठिंबा दर्शवला.

शेजारच्या रूममध्ये मुलं टीव्ही बघायला गेली. रात्रीचे ९.३० वाजले होते. आज २८ डिसेंबर. दौरा सुरू होऊन ७ दिवस झाले होते. सात दिवसांतील अनुभव थक्क करणारे होते. अनेक नव्या गोष्टी पाहायला मिळाल्या होत्या. वेगळी संस्कृती, वेगळा समाज, वेगळी माणसं बघायला आणि त्यांच्याशी हितगुज करायला मिळालं होतं. अनेक शाळा, त्यातली लहान मुलं, सरकारी दवाखाने, डॉक्टर, शिक्षकांशी संवाद साधता आला. एकूणच, जीवन समृद्ध करणारा अनुभव होता. अजून बराच पल्ला गाठायचा होता. आज दिवसभरात मोठा पल्ला आम्ही गाठला होता. शरीर खूप थकल्यासारखं झालं होतं. त्यामुळे लवकर झोप लागली.

सकाळी उशिरा म्हणजे सातला जाग आली. अजूनही थंडी वाजतच होती, पण उठणं गरजेचं होतं. फ्रेश होऊन काल बोलावल्याप्रमाणे सीआरपीएफ कॅम्पच्या वरिष्ठांना भेटायचं होतं. काल ज्या दवाखान्यात आदर्श गेला होता तिथे दुसऱ्या दिवशी जाताना भेटण्यास सांगितलं होतं. तसे आम्ही तिघंही कॅम्पवर गेलो. वरिष्ठांनी

चौकशी केली आणि पुढे जाण्यास सांगितलं.

रस्त्यावरून सीआरपीएफचे जवान पायी, टू-व्हीलरवर जाताना दिसत होते. वसतिगृहातील मुलं आमच्या सायकली फिरवत होती. नऊ वाजत आले होते. सामानाची बांधणी करून बॅगा सायकलला व्यवस्थित बांधल्या. वसतिगृहातील शिक्षकांबरोबर आणखीही दोन शिक्षक आले होते. त्या सर्वांबरोबर आम्ही फोटो काढले आणि त्यांचा निरोप घेतला. तत्पूर्वी, आम्ही घरी फोन करून आमची ख्यालीखुशाली कळवली होती.

इथून पुढचा प्रवास तसा खडतरच असणार होता, कारण पुढे रस्ता नसल्याची आम्हाला कल्पना होती. तसंच सर्वत्र जंगल असल्यामुळे जंगलरस्त्यानेच पुढचा प्रवास करावा लागणार होता. मोबाईलला रेंज नसणार आणि पाणी व जेवणाचीही उपलब्धता असेल की नाही याची खात्री नव्हती. त्याची आधीच तयारी आम्ही केली होती. खाण्याचं बरंचसं सामान होतं. हळूहळू आम्ही निघालो होतो. तालपेरू नदी संथ वाहत होती, एखाद्या स्थितप्रज्ञ साधूसारखी. तसं तिचं पात्र लहान होतं, पण शेजारील गावांसाठी ते निसर्गाचं वरदान होतं. काही ठिकाणी नदीच्या पात्रातील काळा खडक उघडा पडला होता. त्यावरच नदीने आपल्या प्रवाही पाण्याने नक्षीकाम केलेले दिसत होते. लहान रांजण-खळगे तयार झालेले आम्हाला दिसत होते. गोदावरीची उपनदी असलेली ही नदी बिजापूर जिल्ह्यात उगम पावते. पुढे तेलंगणा राज्यात प्रवेश करून गोदावरीला मिळते. शेतीबरोबरच मासेमारीही काही प्रमाणात केली जाते. या नदीवरील पुलावरून आम्ही पुढे जात होतो. पूल तसा जुनाच पण मोठा होता. समोरून सीआरपीएफचे जवान येत होते. पूल पास करून पुढे गेल्यावर आम्हाला आणखी एक सीआरपीएफचा कॅम्प लागला. कॅम्पच्या बाहेरच अनेक जवान उभे होते. ते पेट्रोलिंगसाठी निघाले असावेत. आम्हाला सायकल कडेला लावून थांबवण्यात आलं. ''आप कहाँ से आये हो? आपको यहाँ किसने आने दिया? आप इसी रास्ते से क्यों आये हो? पिछली कॅम्पवालों ने आपकी पूछताछ नहीं की क्या? आपको उन्हों ने कैसे छोड दिया?'' अशा अनेक प्रश्नांचा भडिमार सुरू केला. आम्हीही प्रामाणिकपणे आमच्या दौऱ्याची व मागच्या सीआरपीएफ कॅम्पमध्ये झालेल्या चौकशीची माहिती दिली.

''हमारे सायकिल यात्रा का रास्ता यहाँ से बासागुडा और वहाँ से सुकमा जाता है। हमारी यात्रा महाराष्ट्र के पूना से है। हर दिवाली में हम ऐसी सायकल यात्रा निकालते है। पिछली साल पुरे विदर्भ में हम घुमें थे । लोगों से मिलना, उनसे बातचित करना, समाज के भीतर रहना, आदिवासियों के प्रश्न जानना, उनकी संस्कृती जानना...। इस सबके लिए हमे ऐसी यात्रा निकालनेकी प्रेरणा होती है। इस यात्रा को हमने भारत जोडो और 'मनुष्य जैसे रहना, सिखने के लिए और मनुष्य जान लेना' ऐसा शीर्षक एवंम्

संदेश दिया है।'' अशा प्रकारे आम्ही त्यांना समजावून सांगत होतो. पण ते आमचं काही ऐकायलाच तयार नव्हते. मात्र तिथल्या एका माणसाला आम्ही महाराष्ट्रातून आलो आहोत हे कळलं तेव्हा तो मोठ्या लगबगीने आमच्याजवळ आला. साधारण ४०-५० वय असलेला हा माणूस लातूरचा असल्याचं त्यानं आम्हाला सांगितलं. पुण्यातील एका रोड कॉन्ट्रॅक्टरने बासागुडा ते पुढे रोड बनवण्याचं कॉन्ट्रॅक्ट घेतलेलं होतं. याच कॉन्ट्रॅक्टरकडे एका गाडीवर हा माणूस ड्रायव्हर म्हणून कामाला होता. सुरुवातीला आमची विचारपूस करून झाल्यावर ''बाबांनो, पुढं जाऊ नका. आम्हाला एवढं पोलीस संरक्षण असूनही आम्ही जीव मुठीत धरून इथे काम करत असतो. तुमच्या हातात तर काहीच नाही. शहाणे असाल तर माझं ऐका, इथून मागे फिरा. बिजापूरहून जगदलपूरला जा. जीव प्यारा असेल तर मागे जा'' असं कळकळीनं सांगत होता. 'तुमच्या पाया पडतो, पण माझं ऐका. तुम्ही मागे परत जा.' म्हणून विनवणी करत होता.

मी त्यांच्याकडे पाहत तसाच उभा होतो. आधी ठरल्याप्रमाणे पुढं जायचं की पुन्हा मागं जायचं- काहीच कळत नव्हतं. खूप अवघड प्रसंग होता तो. दोन महिन्यांपासून केलेल्या प्लॅनिंगवर पाणी फिरवायचं, का प्लॅननुसार पुढं जायचं- असे दोनच पर्याय होते. मन हिंदोळ्यावर होतं. कधी वाटायचं हे काका सांगताहेत तर त्यांचं ऐकावं, इथून मागे जावं तर कधी वाटायचं इथपर्यंत आलोय, आता मागे फिरलो तर पुन्हा कधीच इथून जाता येणार नाही. भारतातील सर्वांत दुर्गम भागात, सर्वांत मागासलेल्या भागात परत कधीच जाता येणार नाही. असे एक ना अनेक विचार ताबा घेत होते.

''तुम्ही इथपर्यंत आलात हीच तुमची खूप मोठी अचिव्हमेंट आहे. तुम्ही मागे जा'' असं शेवटचं सांगत ते काका तिथून पुढे निघून गेले. ''आम्ही कोणताच दौरा अचिव्हमेंट म्हणून पाहिला नव्हता किंवा एक कामयाबी म्हणून पाहत नव्हतो; तर एक अनुभवसंपन्न, स्वत:च्या विचारांची कक्षा रुंदावी, समाज समजून घेता यावा, भारत समजून घेता यावा, माणूस म्हणून जगायला शिकता यावं, आपली संस्कृती-कला व आपली माणसं समजून घेता यावीत, त्यांचे विचार, समस्या आम्हाला कळाव्यात, म्हणून आम्ही अशा दौऱ्यांची आखणी करत असतो. यासाठी आम्ही घरून पैसे न घेता वर्षभरात मिळालेल्या पॉकेटमनीतून पैसे साठवून अशा यात्रा करत असतो. यासाठी कोणतीही संस्था वा कोणत्याही व्यक्तीकडून आर्थिक मदत घेत नाही. शेजारीच बसलेल्या जवानांपैकी एकाने आदर्शला त्याच्याकडे बोलावलं. मी कडेलाच उभा होतो. उत्तर प्रदेशहून आलेला तो जवान आदर्शला शांतपणे सांगत होता, ''हमे सीआरपीएफ में अच्छी ट्रेनिंग मिलने के बाद भी हम इन नक्षलीओं के सामने टिक नहीं पाते, वो बहुत चालाख होते है। मेरी बात मानो, तो पीछे जानाही

आपके लिए अच्छा होगा।'' आदर्शनेही ठामपणे, ''हम तो स्टुडंट है। हमारा हेतू साफ है। हम आगे जाएगे।'' असं त्याला सांगितलं.

हे सगळं होत असताना मी सर्व ऐकत-बघत होतो. कुठे तरी मनाला असं वाटत होतं की- सीआरपीएफचे जवान, आधीची महाराष्ट्रातील माणसं एवढं सांगत असताना, आणि पुढं खड्डा दिसत असतानाही कशाला त्यात स्वत:हून उडी मारायची? माझे हे विचार मी या दोघांना बोलून दाखवले. श्रीकृष्णदेखील ''विकास, तुला काय वाटतंय?'' असं म्हणत माझं मत विचारत होता. माझं वरील मत मी त्यांना सांगितलं होतं. आदर्श मात्र पुढे जाण्याच्या विचारावर ठाम होता. तेवढ्यातच मगाशी आमची विचारपूस करणारे ज्युनिअर अधिकारी आपल्या मोठ्या साहेबांना त्या कॅम्पच्या मुख्य अधिकाऱ्यांना बाहेर घेऊन आले. त्यांना आमच्याबद्दल सर्व काही सांगण्यात आलं. आमच्या तिघांचं लक्ष त्या अधिकाऱ्यांकडे होतं. आता ते काय निर्णय घेणार याची काहीच कल्पना नव्हती. सुरुवातीला प्राथमिक चौकशी करून, शेवटी 'आप जा सकते हो' असा निर्णय त्यांनी दिला. मगापासून माझं मन मागे जाण्यास सांगत होतं. पण जेव्हा स्वत: अधिकाऱ्यांनी आम्हाला जाण्यास परवानगी दिली, तेव्हा मीही पुढे जाण्यास तयार झालो. काही तरी निर्णय घेऊनच व पूर्ण विचार करूनच त्यांनी आम्हाला जाण्याची परवानगी दिली असल्याने आमचे हौसले और भी बुलंद हो गये. सभोवताली असलेल्या जवानांना आश्चर्याचा धक्काच बसला.

६

सायकलवर स्वार होऊन आम्ही पुन्हा त्याच जोशात सायकलिंग सुरू केलं. जवानांनी सांगितल्याप्रमाणे आयइडीपासून सावधानता बाळगण्याचा प्रयत्न करत होतो. तशी थोडी भीती होती; पण आता मागे हटायचं नाही, असंच ठरवून निघालो होतो. मगाशी आमच्याशी बोललेले जवान पुढून येत होते. थोडा उतार लागला होता. पुढे मशिनरीच्या साह्याने, रोड बनवला जात होता. शेजारी जंगलात अनेक जवान गस्त घालताना दिसत होते. रस्ता अगदी साधाच बनवला जात होता. त्यामुळे हळू जावं लागत होतं. वातावरणात एक निरव शांतता पसरली होती. सूर्याच्या किरणांनी आता रौद्र रूप धारण केलं होतं. उन्हाच्या झळा अधिकच जाणवू लागल्या होत्या. येणाऱ्या जवानांच्या डोळ्यांत वेगळीच गहनता व चेहऱ्यावरची गंभीरता आम्हाला परिसरातील दाहकतेची जाणीव करून देत होती. आता जवानांची संख्या कमी झाली होती. रस्त्याचं काम चालू असलेल्या ठिकाणाहून थोडे पुढे गेल्यावर आजपर्यंतच्या माहितीवरून व जवानांनी सांगितल्याप्रमाणे चार-पाच फूट खोल खड्डे खणलेले दिसत होते. दुपारचे १२ वाजून गेले होते. गुडघ्यापर्यंत वाढलेल्या गवतातून

मार्ग काढत आम्ही जंगलातील भागातून चालत होतो. दाट झाडी व सोबतीला गुडघ्यापर्यंत गवत हेच कमी की काय, म्हणून पॅन्टला कुसळ टोचत होते. पायांत घातलेल्या शूजवर आणि पॅन्टवर सगळे कुसळ चिकटले होते. उपाय म्हणून आदर्शने पॅन्टच्या आतून पेपरचा कागद गुंडाळला होता. सायकलवरील सामानाच्या बोजामुळे हळू चालावं लागत होतं. माझ्या सायकलचं टायर लहान असल्यानं ते घसरायची भीती अधिक होती. तरीही अशा परिस्थितीत पुढे निघालो होतो. पुढे काय वाढून ठेवलंय याचा थांगपत्ता नव्हता. वेळ पटापट जात नव्हता- जणू घड्याळाचे काटे थांबले असावेत. मनात असंख्य विचारांचं काहूर माजलं होतं. पण विचार करण्याची ही वेळ नव्हती. झाडांच्या फांद्या अंगाला घासत होत्या. यातच उन्हामुळे पूर्ण शरीर घामाने डबडबलेलं होतं. तहानही खूप लागली होती. जवळचं पाणी कधीच संपलं होतं. घशाला कोरड पडली होती. मधेच एखादा मोठा दगड यायचा किंवा एकदम मोठा खड्डा. त्यातून सायकल काढणं खूपच अवघड जायचं.

आम्ही चालत साधारण चार-पाच किलोमीटर अंतर कापलेलं होतं. दोन तासांपासून आम्ही चालत होतो. जंगलातून मार्ग काढत चालणं आता नकोसं झालं होतं. कधी चांगला रस्ता लागतोय, असं झालं होतं. पण पर्याय नव्हता. शेवटी मजल-दर मजल करत आम्ही एका वाडीवजा गावात पोचलो. इकडे-तिकडे कुणी माणूस दिसतोय का, म्हणून पाहिलं. समोरच एक १२-१४ वर्षांचा मुलगा चालताना दिसला. खूप तहान लागल्यामुळे आम्ही पिण्याच्या पाण्यासंदर्भात त्याला विचारणार होतो, तेवढ्यात त्याच्या मागच्या बाजूला एक हातपंप आम्हाला दिसला. 'यह पानी पिने का है क्या?' असं त्याला विचारलं. त्यानं मान हलवून 'हाँ' असं सांगितलं. आमच्यातील श्रीकृष्णने तिघांच्या बाटल्या घेतल्या आणि तो पाणी भरण्यास गेला. तोपर्यंत आम्ही दोघे तिथेच उभे होतो. त्या मुलाच्या चेहऱ्यावर एक अनोळखीपणाची आणि संदिग्धतेची भावना दिसत होती. सावळा रंग, शरीराने लहान असलेला मुलगा आमच्यासमोरून कधीच नाहीसा झाला होता. समोर दोन-तीन झोपड्याच नजरेस दिसत होत्या. मात्र आता एवढं दाट जंगल दिसत नव्हतं. बराचसा परिसर मोकळा होता. उन्हातून आल्यामुळे आम्ही झाडाच्या सावलीचा आधार घेतला होता. श्रीकृष्ण पाणी घेऊन आला होता.

पाणी पिणार तेवढ्यात एक ५५ ते ६० वर्षांचे गृहस्थ आमच्यापुढे उभे ठाकले. कमरेला धोतर, अंगात साधा शर्ट, खांद्यावर पांढरे कापड असलेल्या त्या व्यक्तीनं आमची विचारपूस केली. सुरुवातीला आम्हाला खूप हायसं वाटलं, कारण या व्यक्तीला आम्ही पुढील मार्ग विचारणार होतो. ''आप कहाँ से आये हो? आपको किसने भेजा? इधर कहाँ जा रहे हो? जंगल रास्ते क्यों आये हो?' अशा एक ना अनेक प्रश्नांची मालिकाच त्याने सुरू केली. आम्ही प्रामाणिकपणे आमच्या एकंदर

दौऱ्यांबद्दल व मार्गाबद्दल माहिती दिली. सर्व ऐकून घेऊन या वृद्ध व्यक्तीने तोंडावर कोणतेही हावभाव न आणता, ''मेरे पिछे आईयेगा, मैं आप को रास्ता दिखाता हूँ'' असं म्हणत आम्हाला त्याच्यामागे येण्यास सांगितलं. ती व्यक्ती रस्ता दाखवतोय म्हटल्यावर आम्हाला खूप हायसं वाटलं, कारण मागील दौऱ्यामध्ये अनेक स्थानिक लोकांनी चांगला रस्ता दाखवल्याचा अनुभव गाठीशी होता. त्यामुळे जेव्हा कोणी असा रस्ता दाखवत, तेव्हा आम्ही पूर्ण विश्वास ठेवूनच जात असू. आम्ही तिघांनी एकमेकांकडे पाहत क्षणाचाही विलंब न लावता त्याच्या मागे जाण्याचा निर्णय घेतला होता.

हे सर्व घडत असताना गावातील २०-२५ माणसांचा घोळका पुढून येत असताना दिसला. गावातील सर्व पुरुष, लहान मुलं आमच्या सभोवताली जमली होती. सगळ्यांच्या चेहऱ्यावर अनोळखीपणाची भावना दिसत होती. साधारण १००-१५० मीटर अंतरावर एका कडेला गेल्यावर आम्हाला तिथे थांबण्यास सांगितलं गेलं. माझ्या मनात असंख्य विचार दाटून आले होते... आता ते आम्हाला काय करणार आहेत? पुढं काय वाढून ठेवलंय याची कल्पना आम्हाला नव्हती, पण पर्यायही नव्हता. आम्ही सहजच पण चेहऱ्यावर कोणताही हावभाव न आणता, सायकली एका कडेला उभ्या केल्या. प्रत्येक व्यक्ती आमच्याकडे पाहत होती. त्यांच्या बघण्याचा रोख कळत नव्हता. त्यातील कुणी लुंगीवर, कुणी पँटवर होते. एका तरुणाच्या हातात रेडिओ मात्र दिसत होता. मन बधिर झालं होतं. अशा वेळेला शांततेनं घेणं गरजेचं होतं. त्या व्यक्तीने आम्हाला एका झाडाखाली नेलं. तोपर्यंत आलेल्या तरुणांनी आमच्या बॅगा तपासून पाहिल्या होत्या. 'कुछ नहीं होगा, इधर आओ' असं म्हणत त्यांनी आम्हाला खाली बसण्यास सांगितलं. कशासाठी, ते कळलं नाही. तरी मन घट्ट करून आम्ही बसलो. सर्व माणसं सभोवताली गोळा झाली होती. तिघांनाही गुडघ्यावर बसण्यास सांगितलं. आम्हीही गुडघ्यावर बसून त्यांच्याकडे पाहत होतो.

तेवढ्यात तीन युवकांनी मागून आमचे हात झाडाच्या मुळ्यांनी तयार केलेल्या दोरीने बांधले. माझ्या मनात क्षणात वेगळेच विचार येऊन गेले. आता आपल्याला काय करणार आहेत? आपला शिरच्छेद करणार की काय? किंवा, असंच बांधून ठेवणार की मारहाण करणार? आम्ही एकमेकांना मराठीत बोलून धीर देण्याचा प्रयत्न करत होतो. आपल्याला काहीच होणार नाही, अशी मनोमन प्रार्थना करत होतो. माझ्या हाताला दोन दोऱ्यांनी बांधलं असल्यानं खूपच रुतल्यासारखं होत होतं. अनेक जण आम्हाला विचारायचे, 'आप कहाँ से आये हो? आप को किसने भेजा? हमारे जंगल रास्ते से क्यों आए हो? आप को पुलिस ने भेजा क्या? कहाँ जाना है?' आम्हीदेखील तेवढ्याच पोटतिडकीने त्यांना आमच्या अभियानाबद्दल सांगत होतो.

आमच्याकडे तेवढाच एक पर्याय होता. त्यामुळे सर्व व्यवस्थित सांगण्याचा प्रयत्न करत होतो. आमच्या तिघांच्या पँटचे खिसे तपासण्यात आले. त्यातील श्रीकृष्ण व आदर्शचा कॅमेरा, मोबाईल आणि आमच्या एकंदर दौऱ्याच्या नकाशाची झेरॉक्स प्रत त्यांना सापडली. नकाशात अनेक गावे व इतर माहिती असल्याने त्यांना आणखीनच संशय आला असावा.

''ये नक्शा कहाँ से लाया? किस ने दिया?'' ते विचारत होते. 'इंटरनेटसे निकाला है' असं आम्ही सांगत होतो. इंटरनेट हे काय असतं, हेच माहीत नसल्यामुळे त्यांचा विश्वासच बसत नसावा. यानंतर आम्हाला आणखी थोडं पुढं नेऊन वेगवेगळ्या कोपऱ्यात नेण्यात आलं. कळून चुकलं होतं की, तिघांची वेगवेगळी चौकशी होणार. जेव्हा वेगळं केलं तेव्हा मला वाटलं की, आम्हा तिघांनाही वेगळं ठेवणार की काय? पण असं काही न करता त्यांनी आमची चौकशी सुरू केली. गावातील प्रमुख असेल कदाचित- साधारण २५-३० वयाचा, शरीराने उंच व काटक, कमरेला लुंगी आणि अंगात पूर्ण बाह्यांचा शर्ट घातलेला, बाह्या दुमडलेल्या, काही तरी खात असलेला आणि मानेवर टॉवेल घेतलेला- असा हा तरुण आमची चौकशी करणार होता. त्याच्या हातात आमच्याकडील नकाशा आणि एक कागद होता. आधी श्रीकृष्ण, आदर्श मग मी- अशी त्यांनी चौकशी सुरू केली. पुन्हा तेच प्रश्न विचारत आमच्या बॅगेतील सामानाची विचारपूस करत होते. माझ्या आणि आदर्शच्या बाजूला खूपच माणसे जमली होती. मला रागावर नियंत्रण ठेवता येत नसल्यामुळे त्या दोघांनी मला शांतीने घेण्याचा सल्ला दिला. त्यातच माझी बॅग आणताना एका तरुणाकडून तिचा बंद तुटला. त्यामुळे मला राहवेना. ''क्या यार, आपने तो मेरी बॅग का बंद तोड डाला....'' असं म्हणत मी माझी नाराजी व्यक्त केली, पण सावरून घेण्याचं ठरवलं. ''घबराना नहीं. कुछ नहीं होगा, हम आपको कुछ नहीं करेंगे।'' असा धीर देत त्यांनी माझ्या सामानाची चौकशी केली. तिघांच्याही सामानाची पूर्ण चौकशी केल्यानंतर त्या २०-३० वर्षांच्या युवकाने आम्हाला त्या माणसांना पुढे घेऊन जाण्यास सांगितले.

साधारण ३-४ वाजले असतील. दिवस मावळतीकडे झुकायला लागला होता. आम्ही तिघे, बरोबर तीन सायकली आणि बॅगा घेऊन येणारे असे मिळून १५-२० माणसांचा लवाजमा चालला होता. आम्हाला कुठं नेतात याची काहीच कल्पना नव्हती. माणुसकीवर विश्वास असल्याने आम्ही लोकांशी जवळीक साधण्याचा प्रयत्न करत होतो. कारण प्रेमामुळे माणुसकी जागी होते, असं ऐकलं होतं आणि अनुभवदेखील घेतला होता. मराठीत असं म्हटलं जातं की, 'प्रेमाने दगडालाही पाझर फुटतो' आणि ही तर माणसेच होती- तुमच्या-आमच्यासारखी. हृदय असणारी, मन असणारी. त्यामुळे भाषेचा अडथळा येत असूनही काही वाटत नव्हतं. कारण एकदा

आदिवासी माणसाचा विश्वास–मन जिंकलं की तो जीव ओवाळून टाकतो, असा आमचा अनुभव होता. मग त्यात मागील विदर्भ दौऱ्यात चंद्रपूर जिल्ह्यातील भेंडाळा गावात भेटलेला किशोर लोखंडे असेल किंवा गडचिरोलीतील मोरोवाही गावात भेटलेला माचू असेल– अशी एक ना अनेक उदाहरणं होती. त्यामुळे चालताना मी पुढील एका तरुणाला, 'आपका नाम क्या है?' म्हणून विचारलं. पण त्याने 'मुझे नाम नहीं है।' असं म्हणत अंतर ठेवणं पसंत केलं. त्याच्या देहबोलीवरून तो जरा वेगळ्याच विचारात दिसत होता. 'इस साल बारीश हुई क्या?' असं म्हणत त्यांना आणखी बोलण्यास प्रवृत्त करत होतो, पण ते बोलण्यास तयार नव्हते. साधारण अर्धा तास चालल्यावर आम्हाला एक भातमळणीच्या खळ्यावर आणण्यात आलं. येताना वाटेत झोपडीवजा अनेक घरं लागली. घरातील प्रत्येक जण मोठ्या उत्सुकतेनं आमच्याकडे पाहत होते, आमच्याबरोबर असणाऱ्या माणसांना गोंडी भाषेत विचारत होते.

सभोवताली भाताची शेती आम्हाला दिसत होती. चौकोनी आकाराची ती शेती दूरवर पसरलेली होती. वाटेत एका उघड्या झोपडीत एक वयस्कर स्त्री काही तरी पुटपुटत होती. न राहवून शेजारील तरुणाला 'ये क्या चल रहा है?' असं विचारल्यावर त्यानं 'कुछ नहीं, उस घर में वो औरत बीमार है। तो वो मांत्रिक इलाज कर रहा है।' पूर्णपणे कुंकवाने माखलेली आणि केस मोकळे सोडलेली स्त्री मोठ्या आवाजात काही तरी ओरडत होती. खूप वेगळंच दृश्य होतं ते. सहा वाजत आले होते. थंडीचे दिवस असल्यामुळे थंडी वाजायला सुरुवात झाली होती. तसं हे खळं घरांपासून दूर होतं. कडेने पूर्ण परिसर मोकळाच होता. तिथं पोचल्यावर काहींनी लाकडं गोळा करून आणली. बहुधा ते शेकोटी पेटवणार होते. एकाने एका झोपडीतून पेटतं लाकूड आणलं. शेकोटी पेटवण्यात आली. लाकडं वाळलेली असल्याने बाकीच्या लाकडांनी लगेच पेट घेतला. गोंडी भाषेत शेकोटीला 'किस्स्' असं म्हणतात, हे नंतर कळलं. अशा दोन–तीन शेकोट्या करून माणसं ऊब मिळवण्याचा प्रयत्न करत होती. अंधार पडत आला होता. सकाळी बासागुडाच्या शाळेसमोरील टपरीत फक्त दोन सामोसे खाल्ल्याने आता खूप भूक लागली होती. कधी एकदाचं जेवण करतोय, असं झालं होतं. सगळीकडे भयाण शांतता पसरली होती. किर्रर काळोख पसरला होता. मधेच एक विमान आकाशातून गेल्यावर "ये क्या होता है?" असं एकाने विचारलं. आम्ही तेवढ्याच उत्सुकतेनं, पण दबक्या आवाजात "वो हवाईजहाज है। उससे हम एक जगह से दुसरी जगह जा सकते है।" असं सांगितलं. त्यानंच पुन्हा विचारलं, "उसमें कितने आदमी बैठ सकते है?" आम्ही सांगितलं "१००–२०० तक आदमी एक साथ बैठ सकते है।"

खूपच भूक लागल्याने आम्ही आमच्याकडील डाळीचे लाडू बाहेर काढले.

सोबत असलेल्या माणसांनाही दिले. लाडू हा पदार्थ त्यांना नवीनच होता. त्यामुळे सुरुवातीला ते घ्यायला तयार नव्हते. आम्ही आधी खाल्ल्यावर त्यांनी घेतले. खायला गोड असल्यामुळे प्रत्येकाला तो आवडला. वेळ जाता जात नव्हता. थोडं खाल्ल्यावर बरं वाटलं. मी स्वत:ची समजूत करून घेतली की, सगळं व्यवस्थित होईल. मनात विश्वास होता, आमचा हेतू चांगला आहे, त्यामुळे काही वाईट घडणार नाही. आम्हा तिघांनाही असंच वाटत होतं की– दादालोक आज रात्री येतील, आजच आमची सखोल चौकशी होईल. कारण दुपारीच एक माणूस खास खबर देण्यासाठी त्यांच्याकडे धाडला गेला होता. मधेच कुत्र्यांच्या भुंकण्याचा आवाज येत होता. आम्ही लगेच इकडे–तिकडे बघत होतो. वाटायचं की, दादालोक आले म्हणून.

मी आडवा पडलो होतो. चंद्र आणि चांदण्यांच्या जगात रमून गेलो होतो. आकाश मला पहिल्यांदाच विशाल वाटत होतं. एवढं निरखून मी पहिल्यांदाच पाहत होतो. खरंच आज ते अथांग महासागरासारखं वाटत होतं. दृष्टी जिथंपर्यंत जाते तिथपर्यंत, कधी न संपणारं... विशाल महासागरात एखादा कोळी एका लहानशा अणूप्रमाणे भासत असतो, तसाच मी स्वत:ला पाहत होतो.

शेजारील घरातून दोन माणसे मोठमोठ्या भांड्यांमध्ये काही तरी घेऊन आली. आम्ही ओळखलं, हे बहुतेक जेवण असणार. त्यांनी येतानाच तीन ताटं आमच्यासाठी आणली होती आणि स्वत:साठी झाडाच्या पानांनी बनवलेले द्रोण. ते त्यात खात असल्यानं आम्ही त्यातच खाणार होतो. त्यात खाण्याची उत्सुकता होती आणि आम्हाला कोणतंच अंतर त्यांच्यामध्ये ठेवायचं नव्हतं. जेवण होतं भात आणि त्याबरोबर लहान मासे असलेली आमटी. श्रीकृष्ण शाकाहारी असल्याने 'ये मच्छी नहीं खाता' असं सांगितल्याने त्यांनी डाळही आणली होती. मी पण भात आणि डाळ खाणंच पसंत केलं. कारण आजपर्यंत कधी लहान मासे असलेली खाल्लेली नव्हती. भूक लागलेली असतानाही जेवण जात नव्हतं. मनावर दडपण आल्यासारखं वाटत होतं. आमच्याबरोबरची माणसंही जेवण करत होती. भात हेच मुख्य अन्न असल्यामुळे ती मनसोक्त भात खात होती. ती खाण्याची पद्धतही वेगळी होती. आधी हाताने गोल लाडूसारखा भाताचा घास करायचा आणि मुठीने सरळ तोंडात टाकायचा. साहजिकच आमच्या आधी त्या सर्वांचं जेवण झालं. सगळे जण 'खाना' असं खुणावत भात घेण्याचा आग्रह करत होते. पण आधीच ताटात वाढलेलं संपत नव्हतं. कसंबसं संपवलं.

जेवण झाल्यावर थोडा वेळ शेकत बसलो. आता अधिकच थंडी वाजू लागली. आम्ही तिघांनीही स्वेटर, कानटोपी, आतून शर्ट आणि हे कमी की काय म्हणून आदर्शने तर त्याच्याजवळील तीन स्वेटर घातले होते. याउलट परिस्थिती त्या

माणसांची होती. अंगात एखादा टी-शर्ट किंवा फुल बाह्यांचा शर्ट, कमरेला गुंडाळलेली लुंगी- एवढेच काय ते थंडीपासून रक्षण करण्यासाठी घातलेले कपडे. संपूर्ण आयुष्यच पणाला लावलेल्या या व्यक्तींना साधी थंडी काय करणार होती? जिथे दोन वेळा खाण्याची पंचाईत होती, तिथे कपड्यांची कसली आलीय बात! जन्मच या जंगल-दऱ्यांमध्ये झाला असल्यामुळे निसर्गत: शरीराला काटकता आलेली. थंडी तर त्यांच्या पाचवीलाच पुजलेली.

रात्रीचे नऊ वाजत आले होते. सगळे जण झोपण्याची तयारी करत होते. आमच्यासाठी त्यांनी निळ्या रंगाचे प्लॅस्टिकचे कागद झोपण्यासाठी आणले होते. आधी जमिनीवर भाताची साळ टाकलेली होती. झोपण्यासाठी शेजारी असलेलं झाड निवडलं होतं. झाडाखालीच का, तर सकाळी थंडीमुळं पडणारं दव हे झाडाच्या पानांमुळं अडवलं जाऊन अंगावर येत नाही आणि कपडे भिजत नाहीत. आमच्या सोबतीला असणाऱ्या व्यक्तीही झाडाच्या बाजूने वर्तुळाकार झोपलेल्या होत्या. आम्ही तिघे मधे झोपलो. मी या दोघांच्या मधे झोपलो होतो. कमी थंडी लागावी म्हणून केलेला हा खटाटोप होता. दादालोक आजच येतील, रात्री येतील, असं आम्हा तिघांनाही वाटत होतं. आम्ही मोठ्या आशेने गावकऱ्यांना 'दादालोग कब आयेंगे' असं विचारत होतो. तेही 'क्या मालूम कब आयेंगे' असं म्हणत अनिश्चिततेचा स्वर काढत होते. दादालोक रात्री येतील, आमची विचारपूस करून उद्या आमची सुटका होईल आणि उरलेला दौरा सुरळीत पार पडेल- अशा विचारात मी गाढ झोपी गेलो. आयुष्यात प्रथमच असं जंगलात, घरापासून खूप म्हणजे खूपच दूर असल्याचा अनुभव घेत होतो. दिवसभर उन्हात चालून दमल्यामुळे निद्रादेवी लवकरच प्रसन्न झाली.

सकाळी लवकर जाग आली- साधारण साडेपाच-सहाच्या दरम्यान. थंडी खूपच वाजत असल्यामुळे सगळे जण शेकोटीला अगदी चिकटून बसले होते. वातावरणात प्रसन्नता असली तरी मनावर वेगळंच मळभ दाटलं होतं. ते त्यांच्या बोलण्यातून प्रकर्षाने जाणवलं. त्यांनी आणलेल्या झाडाच्या काड्यांनी आम्ही आधीच दात ब्रश केले होते. थोड्या वेळाने आम्हाला कालच्या २५-३० वर्षांच्या तरुणाने जवळच असलेल्या हातपंपावर अंघोळीसाठी नेलं. आणि हो, महत्त्वाची गोष्ट म्हणजे सकाळी उठल्यावर आमच्या हाताला बांधण्यात आलेल्या दोऱ्या सोडण्यात आल्या होत्या. बहुधा त्यांना आमच्याबद्दल विश्वास वाटला असावा. त्यामुळे आम्हालाही हायसं वाटलं. कालची हात राखून बोलणारी माणसं आज मनापासून आणि कोणतंही अंतर न ठेवता बोलत होती. मी आधी म्हटल्याप्रमाणं त्यांच्यातील माणूस जागा झाला होता. रात्रीच आमच्या सायकली आणि बॅगा ठेवलेल्या झोपडीतून तीन तरुणांनी त्या आमच्याबरोबर आणल्या होत्या. गावातील माणसांशी बोलताना कळलं होतं की-

आज शनिवार, ३० डिसेंबर. गावचा कोंबडा बाजार भरणार होता. आम्ही हातपंपावर अंघोळ न करता हात-पाय-तोंड धुणंच पसंत केलं.

त्यांनी आमच्यासाठी चहा बनवण्याची तयारी सुरू केली. आम्ही त्यांना 'नको' म्हणत होतो. पण तरीही त्यांनी आग्रह धरला. मग तीन दगडांची चूल मांडण्यात आली. घरातून एक पातेलं आणण्यात आलं. आमच्याजवळ साधारण अर्धा लिटर दूध होतं. त्यात थोडं पाणी, आमच्याकडे असलेली चहापावडर आणि थोडी कॉफीपावडर मिसळली.

चहा आता उकळत आला होता. कॉफीपावडरचा मस्त सुगंध दरवळत होता. सर्वांना चहा खूपच आवडला. कॉफीपावडरमुळे तो आणखीनच स्वादिष्ट लागत होता. चहामध्ये घालण्यासाठी त्यांनी साखर आणली होती, पण आम्ही आमच्याकडची वापरली. त्यांना अजून त्रास द्यायचा नव्हता.

सगळ्या माणसांची कोंबडा बाजारात जाण्याची लगबग सुरू होती. प्रत्येकजण स्वत:चा कोंबडा घेऊन जाताना दिसत होता. लहानांपासून ते अगदी वयस्कर माणसांपर्यंत सगळेच. आम्हालाही हा कोंबडा बाजार बघण्याची उत्सुकता होती. त्याबद्दल विचारल्यावर कळलं की, दोन कोंबड्यांमध्ये झुंज लावली जाते. कोंबड्याच्या पंखाला व पायाला ब्लेड लावले जातात. प्रत्येक झुंजीवर पैसे लावले जातात. ज्याचा कोंबडा जिंकेल त्याला दुसऱ्याचा कोंबडा आणि पैसे मिळतात. एवढंच काय ते या लोकांचं मनोरंजनाचं साधन.

मगाशी आमच्याबरोबर चहा पिणारा लहान मुलगा हातात कोंबडा घेऊन आला होता. त्याच्या चेहऱ्यावर खूप हास्य जाणवत होते. तो त्याच्या वडिलांबरोबर कोंबडा बाजारात जाणार होता. त्याची स्वारी खूप ऐटीत होती. अंगात स्वच्छ धुतलेले कपडे, पायांत पॅरागॉनची चप्पल, केसांचा व्यवस्थित भांग पाडलेला. आम्हीही 'जीत कर आना' असं म्हणत त्याचा हुरूप वाढवला. त्याने मंद स्मित देत होकारार्थी मान हलवली आणि आपल्या वडिलांच्या मागे चालता झाला. मनात विचार आला की, शाळेत शिकण्याच्या वयात आज तो निरागस चेहरा कोंबड्यांच्या बाजारात जाणार होता.

आता भात शिजला होता आणि भाजीही तयार झाली होती. सर्वांना कडधान्याची भाजी व भात वाढण्यात आला. जेवण खूप रुचकर लागत होतं. 'खाना अच्छा हुआ है' अशी पावतीही आम्ही दिली. आज पोटभर जेवण केलं होतं. दुपारचे १२ वाजत आले असावेत. आमच्याबरोबर कालपासून असलेल्या त्या व्यक्तीलाही स्वत:चा कोंबडा घेऊन बाजारात जायचं होतं. (त्यामुळे जिला मी नाव विचारलं होतं ती व्यक्ती आमच्याबरोबर थांबणार होती.) आपला कोंबडा घेऊन जाताना तो आमच्याकडे आला आणि म्हणाला, ''किधर मत जाना, यहाँ ही बैठे रहना।''

आमच्याबरोबर आणखी एक तरुण होता. तो झोपडीच्या पलीकडच्या कडेला बसला होता. बहुधा न दिसावं म्हणून तो तिकडे बसला असावा. आम्ही आत तीन बाजांवर बसलो होतो. वेळ काही जात नव्हता. त्यामुळे तिथेच पक्ष्यांना मारण्यासाठी बनवलेल्या गोट्यांनी खेळत आम्ही वेळ घालवू लागलो. मध्येच एक माणूस केळी घेऊन मोठ्या लगबगीनं आला. आम्हा तिघांनाही दोन-दोन केळी देत निघूनही गेला. हाच तो, ज्याने काल आमचे हात बांधले होते. केळी देऊन तो निघून गेला, पण आमच्या मनात घर करून.

केळी खाऊन आम्ही बाजेवर पडून राहिलो होतो. आमच्याबरोबर थांबलेली व्यक्तीही शेजारच्या बाजेवर पहुडली होती. दुपारचं तळपतं ऊन. सगळीकडे भयाण शांतता पसरली होती. शेजारी असलेल्या बदकांकडे पाहत मी बसलो होतो. दादालोक आल्यावर काय बोलायचं, कसं बोलायचं याचा विचार आम्ही तिघांनी केला होता. समोरच्या व्यक्तीचं आमच्या प्रत्येक हालचालीवर बारीक लक्ष होतं. माझ्या मनावर याचा थोडा भार आल्यासारखं झालं होतं. दादालोक आल्यावर काय निर्णय घेणार, आमच्याशी कसे वागणार- असे प्रश्न पडत होते. आमचा विचार, हेतू चांगला होता; शिवाय आम्ही विद्यार्थी असल्याने थोडा धीर वाटत होता. दुपारचे तीन वाजत आले असावेत. झोप येत नव्हती, म्हणून पडून राहिलो.

अशातच कुणी तरी आल्याची चाहूल लागली. आम्ही तिघेही उठून उभे राहिलो. समोरची व्यक्ती लगेच बाहेर गेली. झोपडीच्या मागच्या बाजूने सात-आठ व्यक्ती येताना दिसल्या. कुणाच्या पाठीवर बंदुका, कुणाच्या हातात तीर. पाणी आणि इतर साहित्य असा लवाजमा घेऊन त्या तिथे आल्या होत्या. त्यातील तीन व्यक्ती आमच्यासमोर येऊन बसल्या. आम्ही उभेच होतो. त्यांनी बसण्यास सांगितले. आम्ही खाली बसलो. त्यातील एक तरुण व्यक्ती साधारण २०-२५ वर्षांची असावी. अंगात काळे कपडे, गोल चेहरा, हातात बॅग. कदाचित तो त्या ग्रुपचा प्रमुख असावा. शरीराने जेमतेम असलेला, परंतु आत्मविश्वासाने भारलेला दिसत होता. त्याच्यासोबतचे कोणी खाली, कुणी शेजारी, झाडाच्या आजूबाजूला बसले होते. कोणी नुसतीच लुंगी गुंडाळून होते, तर कुणी पूर्ण काळ्या कपड्यांमध्ये. एकाच्या हातात रेडिओ दिसत होता. सगळे जण आमच्याकडे कुतूहलाने पाहत होते. आश्चर्याची गोष्ट म्हणजे, झोपडीच्या समोरच एका कडेला दोन महिला बंदुका घेऊन उभ्या होत्या. त्यातील एकीने पूर्ण काळ्या रंगाचा पॅन्ट-शर्ट घातलेला होता, तर एकीने साडी. हातात, पाठीवर बॅगा असलेल्या त्या दोघी झाडाच्या सावलीत बसल्या होत्या.

काही क्षण असेच गेले. त्या तरुण व्यक्तीने आमची विचारपूस सुरू केली. ''आप कहाँ से आये हो? यहाँ कहाँ आये हो? क्यों आये हो?'' आम्ही त्यांना व्यवस्थित

आणि नम्रपणे उत्तरे देत म्हटलं, ''हम पूना से आये है। हमारी सायकल टूर है। हम कॉलेज में पढते है। भारत जोडो की तहत हम यहाँ से जा रहे है। हर दिवाली मैं हम ऐसी सायकल रॅली निकालते है। लोगों से मिलना, उनसे बाते करना, उनका खान-पान जानना, उनकी संस्कृती जान लेना ऐसा हमारा उद्देश है।''

त्या व्यक्तीने ''आपके पास मोबाईल है क्या?'' असं विचारत मोबाईल मागितले. ''आज तक इस रास्ते से कोई दुसरे आदमी आये नहीं है।'' आमचे मोबाईल तपासून न पाहता ती व्यक्ती तशीच बसून होती. ती व्यक्ती मधेच हसायची त्यामुळे त्याच्या मनात काय चालले आहे याचा थांगपत्ता लागत नव्हता. लागलीच निर्णय घेऊन आम्हाला सोडणार की, अजून काही दिवस इथेच ठेवणार, की आम्हाला परत जायला सांगणार- हे कळत नव्हतं. आमच्या हातात एवढंच होतं की, जे काय आहे ते व्यवस्थित समजावून सांगणे. समोरच्या व्यक्तीला हिंदी येत असल्यामुळे खूप हायसं वाटलं. काहीही प्रतिक्रिया न देता 'दो मिनिट रुको' असं म्हणत बाहेर जाऊन झाडाखाली बसलेल्या त्याच्या सहकाऱ्यांशी ती व्यक्ती गोंडीत बोलली. ते आम्हाला समजत नव्हतं. आम्ही शांतपणे त्याच्या येण्याची वाट पाहत बसलो होतो. शेवटी ती व्यक्ती आली. काही तरी निर्णय झालेला असावा. ''ठीक है भैया, आपको दुसरी जगह जाना पडेगा। हमारे उपरवाले पार्टी के लोक आपको छोडने का फैसला लेंगे।'' तोंडावर स्मित हास्य आणत ती व्यक्ती आम्हाला सांगत होती. त्यांचं ऐकण्याखेरीज दुसरा पर्याय नव्हता.

''भैया, हमे जल्दी जाना है। १२ जनवरी से हमारा कॉलेज सुरू हो रहा है। दो दिन हो गये है, घर को फोन भी नहीं किया'' अशी आमची प्रतिक्रिया दबक्या आवाजात मांडली. ''दोन दिन में वो आपको छोड देंगे'' असं म्हणत त्या व्यक्तीने आमच्याबरोबर असलेल्या व्यक्तींना जाण्याचा ठावठिकाणा सांगितला. ते आलेले लोक आता निघाले होते. जाताना एका रांगेत उभे राहून ते एकमेकांचा हात हातात घेऊन 'लाल सलाम कॉम्रेड' म्हणत निरोप घेत होते. ते सगळे निघाले, दोन वेगवेगळ्या ठिकाणी, निम्मे एकीकडे आणि निम्मे दुसरीकडे. शेजारील खोलीत ठेवलेल्या बॅगा आम्ही बाहेर आणल्या. आम्हीही त्यांचा त्यांच्याच शब्दांत निरोप घेतला. बॅगा सायकलवर व्यवस्थित बांधून आम्ही चालतच निघालो. आमच्याबरोबर त्या दोन व्यक्तीही होत्या. आम्ही कुठे निघालो, याबद्दल पुसटशीही कल्पना नव्हती. एक व्यक्ती आमच्यापुढे चालली होती आणि दुसरी आमच्या मागे. रस्ता जंगलातून असल्यामुळे पायवाटच होती. मला या पायवाटेवरून सायकल चालवता येत नव्हती, त्यामुळे मी चालतच जाणं पसंत केलं. आदर्श व श्रीकृष्ण सायकल हळूहळू चालवत चालले होते. साधारण चार वाजता आम्ही तिथून निघालो होतो. उन्हं उतरायला लागली होती. दिवस मावळायच्या दिशेने सरकत होता.

आम्ही पटपट निघालो. कारण बरोबरच्या व्यक्तींना मागे चालत यायचं होतं. येताना आम्हाला काही माणसं दिसत होती. हातात कोंबडा असलेली. कोंबडा बाजारातून ती आली असावीत. वाटेत अनेक चढ-उतार लागत होते. या चढ-उतारासारखं माझं मन खाली-वर होत होतं. त्यांचं आयुष्यही असंच होतं ना... हेलकावे घेणारं. मधेच चढ-उतारासारखं.

साधारण सहा वाजत असावेत. थोड्या वेळाने त्या दोन व्यक्ती आणि सायकलवर बसून एक तरुण आला. त्या दोन्ही व्यक्ती लगेच पुन्हा परतीच्या प्रवासाला निघाल्या. साधारण पाच किलोमीटर अंतर त्यांना चालतच जायचं होतं. त्यामुळे अंधार तर होणारच होता. सायकलवरून आलेल्या तरुणाने आणि इतर चार जणांनी आम्हाला पुढे एका झाडाखाली नेलं. जवळच एक झोपडी होती. आजूबाजूचा परिसर तसा मोकळाच होता. जवळच्या घरातून आमच्यासाठी दोन बाजा आणण्यात आल्या. अंधार पडायला लागला होता. आता कोंबड्यांचा आवाज कमी झाला होता. कोंबडा बाजारावरून येणारी माणसं घरी निघाली होती.

आम्ही इकडे-तिकडे पाहत होतो. परिसर तसा खरंच दुर्गम होता. साधारण १५-२० घरं असावीत, तीसुद्धा दूर-दूर पसरलेली. आम्ही बसलो असताना १५-२० वर्षांपर्यंतची पाच-सहा मुलं येताना दिसली. त्यातील एक मुलगा आमच्याकडे बघून हसत होता. आम्हीही त्याला हसतच सामोरे गेलो. तो आणि त्याचे सवंगडी शेजारच्या झोपडीत गेले. बहुधा ते कोंबडा बाजारातून आले असावेत. बाहेर येताना सगळ्यांच्या हातात बंदुका होत्या. जाताना त्याने हात हलवून आमचा निरोप घेतला. हे दृश्य पाहून मन बधिर झालं होतं. विचारांत डुबक्या खायला लागलं होतं. त्या निरागसांवर हातात बंदुका घेण्याची का वेळ आली असावी? ते आता कुठे निघाले होते? ज्या हातात पेन-पेन्सिल असायला हवी होती, त्याची जागा बंदुकीने का घेतली होती? काहीच कळत नव्हतं. कुणाविरोधात त्यांनी ती शस्त्रे घेतली असावीत, त्यांना माहीत तरी आहे का? एवढ्या लहान वयातच त्यांची विचार करण्याची पातळी तेवढी असावी का? काय वाईट, काय योग्य याची तरी जाणीव त्यांना आहे का? याचा शेवट कसा होणार आहे, हे माहीत आहे का? का कुणास ठाऊक; माझं मन मलाच खात होतं. तशीच परिस्थिती होती ती.

अंधार पडला होता. शेकोटी पेटवली गेली. सात-आठ माणसे आमच्याबरोबर शेकत बसली. मी झाडाखाली पडलेल्या लाकडांचे तुकडे गोळा करून शेकोटीसाठी बाजूला ठेवले. थंडी वाजायला लागली होती. तिघांनी स्वेटर घातलेला होता. 'आप शहर से आये हो, उपर बाजपे बैठ जाईए' असे ते आम्हाला सांगत होते, पण आम्ही खाली बसणंच पसंत केलं. आम्ही वर व त्यांनी खाली बसणं हे आम्हाला योग्य वाटत नव्हतं. थोड्या वेळाने तिथे एक साधारण १६-१७ वर्षांचा मुलगा आला. त्याला

हिंदी येत असल्यामुळे बहुधा आमच्याकडे पाठवले असावे. सावळा रंग, पीळदार शरीर, मोठे डोळे, चेहऱ्यावर तेज असलेला हा युवक आमची चौकशी करू लागला. त्याचा आवाज घोगरा होता. तो शिकाऊ वाटत होता. आधी विचारपूस करताना अंतर राखून बोलणारा हा युवक थोडी खात्री पटल्यावर मोकळेपणाने बोलू लागला. विचारल्यावर कळलं की, त्याचं नाव 'हुंगा' होतं. आमच्या गप्पा रंगात आल्या. बोलायला व आपल्याला समजून घेणारं कुणी तरी भेटल्यामुळे आम्हाला खूप आनंद झाला. त्यानं स्वत:बद्दलची माहिती आम्हाला दिली. आम्हीही त्याला आमच्या अभियानाबद्दल आणि आधीच्या दौऱ्याबद्दल सांगितलं. आम्हाला त्याने 'भैया' म्हणत आपलंसं करून टाकलं होतं. परकेपणाचे फास आता गळून पडले होते. त्याला हिंदी आणि गोंडी भाषा येत असल्यामुळे आम्ही जे बोलत होतो ते तो शेजारील माणसांना गोंडी भाषेत सांगत होता. हुंगा.... नावातच खूप वेगळेपण जाणवत होतं. तो जगदलपूरला एका खासगी होस्टेलमध्ये राहून सातवीत शिकत होता. छत्तीसगड सरकारने घेतलेल्या एका परीक्षेत पास होऊन त्याला सरकारची शिष्यवृत्ती मिळाली होती. सरकारने एक लाख रुपये भरून राहण्याची, जेवणाची, शाळेची पूर्ण व्यवस्था असलेल्या नामांकित शाळेत त्याल घातलं होतं. नवोदयच्या परीक्षेत दोन-तीन मार्कांमुळे निवड न झाल्यामुळे खचून न जाता हुंगाने जिद्दीच्या बळावर स्कॉलरशिप मिळवली होती. अभ्यासात हुशार असलेला हुंगा खेळातही निपुण असल्याचं त्यानं सांगितलं होतं. खो-खो, कबड्डी, धावणे यासारख्या पारंपरिक खेळात त्याने प्रावीण्य मिळवलं होतं. त्याचबरोबर ज्युदोसारख्या आधुनिक खेळात तो माहीर होता. पुढील महिन्यात पंजाबमध्ये राष्ट्रीय स्पर्धेमध्ये तो खेळणार होता. राज्यस्तरावर झालेल्या स्पर्धांचे अनुभव तो मोठ्या उत्सुकतेनं सांगत होता.

साधारण आठ वाजत आले होते. आम्ही अजून तिथेच बसलो होतो. हुंगा त्याच्याबद्दल सांगत होता. सन २००५ मध्ये झालेल्या सलवा जुडूम नावाच्या प्रयोगामुळे त्याच्या गावातील शाळा जाळून टाकली होती. त्यामुळे दोन वर्षं त्याला घरीच राहावं लागलं होतं. याच काळात गावातील अनेक घरे पेटवून देण्यात आली, परंतु हुंगाचं घर दूर असल्यामुळे सुरक्षित राहिलं होतं. अशातच २००७ मध्ये त्याचा अपघात झाला आणि पाय मोडला. तरीही शिकण्याची जिद्द त्याला स्वस्थ बसू देत नव्हती. पाय बरा झाल्यावर त्याने जगदलपूरला शिक्षण घेण्याचं ठरवलं. ते त्याच्या गावापासून साधारण २५-३० किलोमीटर दूर होतं. जगदलपूरला त्याचे काका राहत असल्याने तो तिथेच राहून शिकला. आता होस्टेलमध्ये आल्यापासून खाण्यापिण्याची चंगळ होत होती. धुऊन इस्त्री केलेले कपडे मिळत होते. हे ऐकताना त्याचा खूप अभिमान वाटत होता. शिकण्याची जिद्द असल्यावर माणूस काय करू शकतो, हे आम्ही हुंगाकडून आज शिकत होतो, ऐकत होतो. एकीकडे शाळा जवळ,

घरातील-समाजातील वातावरणही शिक्षणासाठी पूरक, आई-वडिलांना आपला मुलगा शिकून खूप मोठा व्हावा अशी इच्छा असूनही फक्त मुलाची इच्छा नसल्यामुळे तो शिकत नाही- हा विरोधाभास आम्हाला परिस्थितीची जाणीव करून देत होता. गप्पा आता खूप रंगात आल्या होत्या. शेजारी बसलेल्या माणसांना हुंगाबद्दल खूप अभिमान व आदर वाटत होता. आपल्या समाजातील, गावातील मुलगा एवढा पुढे जाऊ शकतो, याबद्दल त्यांना त्याचं कौतुक वाटत होतं. हुंगाला पुढे शिकून डॉक्टर बनायचं होतं. ''मुझे आगे पढकर डॉक्टर बनना है और हमारे लोगों की सेवा करनी है। यहाँ कोई डॉक्टर नही आता इसलिए।'' तो मोठ्या आत्मविश्वासाने सांगत होता. त्याचा आत्मविश्वास आणि चेहऱ्यावरील तेज यातून त्याच्यातील समाजासाठी असलेली धडपड जाणवत होती.

जेवणाची वेळ झाली होती. जेवणही आणलं गेलं होतं. मेनू होता भात, चिंचेचं पाणी, माशाची भाजी. जेवताना खूप आग्रह होत होता. एकजण तर सारखा म्हणत होता, ''ये खाना आप को अच्छा नही लगता होगा, आप तो रोटी खाते है!'' त्याला आमची खूप दया येत असावी, पण त्याच्यापुढे दुसरा पर्याय नव्हता. तो जे खात होता, तेच आम्हीही खात होतो. जिथे वर्षातून एकदाच पावसाच्या पाण्यावर तांदळाचं उत्पन्न घेतलं जातं तिथं पोळी, भाकरी कशी मिळेल? भात हेच त्यांचं पूर्ण अन्न होतं.

जेवण झाल्यावर आम्ही शेजारच्या छपरात झोपण्यासाठी गेलो. मस्त शेणाने सारवून घेतलेलं छप्परवजा घर, पण चारही बाजूंनी खुलं असलेलं. थंडी वाजत असल्यामुळे तिथे शेकोटी पेटवण्यात आली. आम्ही सगळे वरच्या बाजूला झोपलो. सगळ्यात कडेला श्रीकृष्ण, आदर्श, मी, शेजारी हुंगा आणि त्याचा मित्र. तसं थंडीत दाटीवाटीत झोपण्याचा फायदाच असतो. कुणालाच जास्त थंडी वाजत नाही. घरच्यांची काळजी वाटत होती. कारण दोन दिवस त्यांच्याशी फोनवर बोललो नव्हतो. शेजारी एक ओढा वाहत असल्याचं हुंगाने आम्हाला सांगितलं. रात्री बोलता-बोलता कधी झोप लागली, ते कळलं नाही.

## ७

सकाळी उशिराच जाग आली. आमच्या आधी सगळी माणसे शेकोटीला चिकटून बसली होती. आम्हीही त्यांच्याबरोबर शेकत बसलो. आज ३१ डिसेंबर होता. एकंदर नियोजनानुसार आम्ही सुकमाला पोचायला पाहिजे. पण इथेच अडकल्यामुळे काही पर्याय नव्हता. नऊ वाजत आले होते. कोवळं ऊन पडलं होतं. थंडी कमी झाली होती. आम्ही फ्रेश होण्याचं ठरवलं. ब्रश करून आमच्याकडील जिनसांवर ताव मारला. थोड्या वेळाने हुंगा व त्याचा मित्र आम्हाला परिसर

दाखवण्यासाठी घेऊन गेले. परिसर तसा मोठा होता. झाडी कमी होती. हुंगा सांगत होता- ''यहाँ महाराष्ट्र के गडचिरोली से बहुत लोग तेंदुपत्ता तोडने आते है। कम से कम महिना यहाँ रहते है। मुझे हिंदी आने की वजह से वो मुझसे बहुत बाते करते है। मुझे बहुत बार खाना खाने बुलाते है। तेंदुपत्ता खतम होने के बाद वे फिर निकल जाते है।'' त्याने गावातील पहिला रस्ता व त्याच्या शाळेची जागा दाखवली. ''२००२ तक यहाँ बस आती थी, लेकिन सलवा जुडूम के बाद बंद हो गई'' एकूणच तिथल्या समस्यांबद्दल आम्ही त्याच्याकडून जाणून घेत होतो. 'दादालोग पढाई को विरोध करते है क्या?' असं विचारल्यावर, ''नही दादालोग शिक्षण (शिक्षा) को कभी विरोध नही करते। इसलिए तो मैं पढ सकता हूँ।'' यावर ''दादालोग नक्सल में भरती होने के लिए जबरदस्ती करते है क्या?'' असं विचारल्यावर त्याने सांगितलं, ''नही, वो जबरदस्ती नही करते. जब तक उसे और उसके माँ-बाप नही चाहते तब तक वो लडका नक्सल में भरती नही हो सकता.'' यानंतर आदर्शने 'दादा लोग अच्छे है क्या?' असं विचारल्यावर तो म्हणाला, ''दादालोगों की वजह से हमारे गाव का विकास नहीं हो पाता, लेकिन दादालोगों के कारण पुलीस अंदर नहीं आती।''

आता साधारण ११ वाजले होते. संपूर्ण परिसर बघून झाल्यावर आम्ही पुन्हा जागेवर आलो. काही वेळातच दोन व्यक्ती सायकलवरून येताना आम्हाला दिसल्या. हुंगाला गोंडीत काही तरी सांगिल्यातल्यावर हुंगाने आम्हाला पुन्हा त्या झाडाखाली बोलावलं. त्यातील एक युवक आमची विचारपूस करत होता. त्याच्या बोलण्यावरून त्याने दारू प्यायलेली होती, हे कळत होतं. हुंगाला गोंडीत आमच्याबद्दल विचारत होते. हुंगा आमच्याबद्दल माहिती देत होता. आम्हाला काय चाललंय ते कळत नव्हतं. थोड्या वेळाने त्यांनी जेवण बनवण्याचा निर्णय घेतला. शेजारच्या घरातून तांदूळ आणून एका भांड्यात त्यांनी भात शिजत ठेवला. मी एका बाजेवर पडलो होतो. लोक कशासाठी आले, ते कळत नव्हतं. त्यांनी नशा केल्यामुळे आमच्याबद्दल ते दादालोकांसमोर व्यवस्थित माहिती पोचवतील का, याबद्दल मला खूप काळजी वाटत होती. कारण तेच दादालोकांना आमच्याबद्दल सांगणार असावेत, असं आम्हाला वाटत होतं. भात शिजल्यावर आम्ही सर्वांनी जेवणे केली. शेजारी एका घराचं काम चाललेलं होतं. साधारण दोन वाजता ती दोन माणसे 'शाम को चार बजे दो आदमी आपको लेने आयेंगे' असं सांगून गेली. नंतर हुंगा आम्हाला ते काय बोलत होते ते सांगत होता. ''भैया, उनको श्रीकृष्णजी पर शक आ रहा है। वो उन्हे पुलिस लगता है।'' श्रीकृष्णचं पीळदार शरीर आणि मोठी मिशी यामुळे त्यांना श्रीकृष्ण विद्यार्थी नसल्याचा संशय येत असावा. चार वाजता जावं लागणार असल्यामुळे आम्ही अंघोळ करण्याचा निर्णय घेतला. हुंगाही आमच्याबरोबर येणार होता, सोबत त्याचा मित्रही होता. आदर्श तिथेच होता.

जवळच असलेल्या ओढ्यात आम्ही अंघोळ केली. दोन दिवसांनी केल्याने खूप फ्रेश वाटत होतं. त्यादरम्यान ''भैया, इनका मुझे कुछ अच्छा नही लग रहा, आप दादालोगों से अच्छे से बात करता'' असं म्हणत हुंगाने भीती व्यक्त केली. ''कुछ साल पहले एक परदेशी भी सायकल पे ऐसा ही आया था। उसको लोगों ने बहुत पिटा था। खुद वो अपने माथे पर पत्थर डालता था, बाद में लोगों ने उसे जगदलपूर फेंक दिया।'' हे ऐकून अंगावर काटाच आला होता. जणू पायाखालची जमीनच सरकली होती. आपण इथे येऊन खूप मोठी चूक तर नाही ना केली, असं मनात येत होतं. पण आता विचार करून उपयोग नव्हता. आलेल्या परिस्थितीला खंबीरपणे सामोरे जाणे गरजेचे होते. मी बॅगेत माझ्या डायऱ्या आणल्या होत्या. त्या इंग्रजीत लिहिलेल्या असल्याने त्यांना उगाच पत्रकार किंवा दुसरा कुणी तरी असल्याचा संशय येईल म्हणून त्या मी हुंगाकडेच ठेवण्याचा निर्णय घेतला. मी स्वत: हुंगाबरोबर त्याच्या घरी गेलो. जाताना मला वाटत होतं की, त्या जाळाव्यात किंवा गाडून टाकाव्यात; परंतु असंख्य आठवणी त्यात असल्याने हुंगाने त्या जाळू न देता, स्वत:कडे घेतल्या. घरचा पत्ता देऊन त्यावर पाठवायला त्याला सांगितलं. स्पीडपोस्ट करण्यासाठी १०० रुपये दिले. जर कदाचित मी घरी नाही जाऊ शकलो, तर माझ्या आठवणी तरी घरी जातील, असा त्यामागचा प्रामाणिक हेतू होता. आम्ही डायऱ्या ठेवून पुन्हा येऊन बसलो. अजून दोन तासांत केव्हाही आम्हाला नेण्यास दोन माणसे येणार होती. मोबाईलमधील सर्व चार्जिंग संपवण्याचा निर्णय आम्ही घेतला. खूप कठीण परिस्थिती होती.

आम्ही तिघेही शांत बसलो होतो. मोबाईलमधील माचिस सिनेमामधील 'छोड आये हम वो गलियाँ' हे गाणं लावलेलं होतं. खूप काही सांगणारं हे गाणं स्वत:च्या भूमीपासून, प्रदेशापासून दूर आल्यावर येणाऱ्या आठवणींना उजाळा देत होतं. पुढं काय होणार आहे, काही माहीत नाही. मी त्यांना सांगितलं, ''जर आपल्या तिघांना काही बरं-वाईट झालं तर माझा माणुसकीवरचा विश्वासच उडेल.'' चार वाजले असावेत. मोबाईलचे चार्जिंग संपले होते. आपल्या परीने पुढील माणसांना शांतपणे समजून सांगणं एवढंच आमच्या हातात होतं. शेवटपर्यंत प्रयत्न सोडायचे नाहीत, असं आम्ही ठरवलेलं होतं. काही वेळाने चार-पाच माणसे आली. त्यातला एक मध्यमवयीन हातात चाकूच घेऊन आला होता. त्याने नशा केलीय, हे आम्हाला कळून चुकलं होतं. त्यामुळे आमच्या संकटात अजून भर पडली. हुंगाला आधीच आमच्याबरोबर येण्यास आणि आमच्याबद्दल त्यांना व्यवस्थित समजून सांगण्यास सांगितलं होतं. तोच काय तो आमचा आधार होता. आमच्या बॅगा सायकलवर ठेवून आम्ही चाललो होतो. ते जिकडे नेतील तिकडं जाणं एवढाच पर्याय होता.

साधारण अर्धा तास चालल्यावर एका उजाड जागेत एका ठिकाणी आम्हाला

थांबवण्यात आलं. अनेक माणसं तिथं जमलेली होती. लुंगी घातलेल्या एका तरुणाने आमच्यातील एकाला सर्व सामान घेऊन दूर झाडाखाली बोलावलं., त्यानुसार आदर्श आमच्या बॅगा घेऊन गेला. आम्ही दोघंही लांबूनच पाहत होतो. तिथं १५-२० माणसे होती. मला खूप काळजी वाटत होती, कारण बऱ्याच जणांनी नशा केली होती. जवळजवळ अर्धा तास होऊन गेला होता. तिथं काय चाललंय, ते कळत नव्हतं. फक्त पाहता येत होतं. खूप वेळानंतर आदर्श येताना दिसला. मी सुटकेचा नि:श्वास टाकला. काही तरी निर्णय झालेला असावा. आम्हाला जवळील एका ठिकाणी नेणार होते. हुंगा निघाला होता. तो जाऊ नये, असंच वाटत होतं. पण दुसऱ्या दिवशी त्याला जगदलपूरला जायचं होतं, त्यामुळे तो निघाला होता. त्याला डायरी पाठवण्याबद्दल मी पुन्हा इंग्रजीमध्ये सांगितलं.

हुंगा गेल्यावर आम्हाला जवळच्या एका चिंचेच्या झाडाखाली नेण्यात आलं. त्या माणसांत एक तरुण होता, त्यानेही नशा केलेली असावी. ''आप को किसने भेजा? पुलिस ने भेजा क्या? इस जंगल रास्ते से क्यो आये हो? ये नक्शा आपको किसने दिया?'' असे अनेक प्रश्न विचारले जात होते. आमच्याकडील ओळखपत्रे आधीच तिथल्या प्रमुखाने चौकशी करताना घेतलेली होती. आम्हाला नेण्यासाठी आलेला माणूस तर सारखा चाकू दाखवून ''बताओ, आप कहाँ से आये हो? आपको पुलिस ने भेजा क्या?'' असे प्रश्न विचारत होता. ''घबराना नहीं.. कुछ नहीं होगा'' असं म्हणत धीरही देत होता. आम्ही शांतपणे उत्तरे देत होतो. चिंचेखाली टाकलेल्या बाजेवर आम्ही तिघे बसलो. जवळच एक झोपडी होती. अंधार पडायला लागला होता. गावातील माणसे भोवताली जमली होती. अगदी वयस्कर माणसांपासून लहान मुलांपर्यंत. सगळे आमची चौकशी करत होते. शेकोटी पेटवलेली होती. थंडी वाजत होती, म्हणून आम्ही तिघांनीही स्वेटर घातले होते. पण थंडी काही कमी होत नव्हती. आम्हीही शेकत बसलो. बरोबर अनेक लहान मुलं होती. आम्ही त्यांच्याशी बोलण्याचा प्रयत्न केला, पण त्यांना हिंदी येत नसल्याने ती फक्त पाहत हसायची.

साधारण आठ वाजले असावेत. सगळीकडे अंधार होता. सभोवताली भयाण शांतता होती. खूप भूक लागली होती. प्रत्येक घरातून भाजी आणण्यात आली. भातही आणण्यात आला. सर्व जण आमच्याचबरोबर जेवायला बसले. भात, चिंचेची भाजी वाढण्यात आलेली होती. भूक लागूनही जेवण जात नव्हतं. प्रत्येक घासानंतर एक खडा लागल्यासारखं व्हायचं. बहुधा तांदूळ निवडलेले नसावेत. ताटात वाढलेला भात मी कसाबसा संपवला व तसाच बाजेवर पडून राहिलो. आता काही माणसे उरलेली होती. लहान मुलेही आमच्याबरोबर झोपण्यास आलेली होती. तिघांच्या बाजा एकमेकांना चिकटवून मधे शेकोटी पेटवलेली होती. थंडीपासून

संरक्षण करण्याचा हर प्रकारे प्रयत्न आम्ही करत होतो.

आज ३१ डिसेंबर. सर्व जण नववर्षाचे स्वागत जल्लोषात करत असणार. पार्ट्या करत असणार. आमचं नव वर्ष मात्र बस्तरच्या जंगलात आदिवासींबरोबर सुरू होणार होतं. पुढं काय वाढलंय, याची कल्पना नव्हती. जे होईल त्याला धैर्याने सामोरे जाणे, एवढेच हातात होते. गावचा प्रमुख तर 'आपको एक महिना रुकना पडेगा' असं म्हणाला होता. त्यामुळे आम्हीही मनाची तयारी करत होतो. पण कुठे तरी वाटत होतं की, उद्या किंवा फार तर परवा तरी आम्हाला सोडलं जाईल. विचार करणं एवढंच आमच्या हातात होतं. शेकोटीच्या मिणमिणत्या प्रकाशात, या अंधाऱ्या रात्री आम्ही झोपण्याचा प्रयत्न करत होतो. सोबतीला थंडी होती. वातावरणातील भयाणता वाढली होती. कधी तरी झोप लागली. पण थंडीमुळे जाग आली. जवळच असलेल्या झोपडीसमोर त्या घरातील स्त्री आपल्या तीन-चार महिन्यांच्या मुलाला शेकोटीजवळ कवटाळून बसली होती. थंडीमुळे ते लहान मूल रडत होतं. त्याच्या रडण्याच्या आवाजानं शांततेचा भंग होत होता. खूपच हृदयद्रावक दृश्य होतं ते. आपल्या लहान मुलाचं थंडीपासून संरक्षण व्हावं म्हणून ती माऊली अगदी शेकोटीला चिकटून बसली होती. खूप दया येत होती. शरीराने व वयाने एवढे मोठे असूनही आम्ही आमचं थंडीपासून संरक्षण करू शकत नव्हतो. अंगात स्वेटर, अंगावर घेण्यासाठी चादर असूनही आम्ही कुडकुडत होतो. भविष्यात येणाऱ्या असंख्य संकटांची चाहूल त्या लहान मुलाला जन्मापासूनच लागली असावी. आपल्या मुलासाठी आईच एवढे कष्ट उपसू शकते. हीच स्त्री सकाळी उजाडल्यावर नेहमीप्रमाणे घरातील कामं आवरत होती- रात्रभर न झोपता!

आम्हीही आता उठून बसलो होतो. थंडी असल्यामुळे पुन्हा शेकोटीला चिकटून बसलो. साधारण नऊपर्यंत तसंच बसून राहिलो. कालचा तरुण पुन्हा आला. त्याच्या हातात एक कोरा कागद होता. तो आम्हाला पुन्हा 'वो नक्शा आपने कहाँ से लाया' असं विचारत होता. त्यावर आम्ही 'वो इंटरनेटसे निकाला है' असं सांगितलं. 'वहाँ देखकर खुद हाथ से हमने निकाला है' असं सांगितलं. स्वत:ची ओळख करून देताना त्यानं त्याचं नाव सुरेश सांगितलं होतं. 'क्या आप खुद हाथसे निकाल सकते हो क्या?' असं सुरेशने म्हणत पुन्हा नकाशा काढण्यासाठी सांगितलं. त्यावर आदर्शने हाताने नकाशा काढल्यामुळे त्याचा थोडाफार विश्वास बसला. नकाशा हाताने काढता येतो याची त्यांना कल्पना नसावी. त्यानेच आमची जेवणाची सोय केलेली होती.

साधारण २५ वय असलेला सुरेश हुशार वाटत होता. त्याला हिंदी, गोंडीबरोबरच थोडं इंग्रजीही येत होतं. नकाशामधील इंग्रजीत असलेल्या गावांची नावे तो लीलया वाचत होता. जेवण झाल्यावर आम्ही आडवे पडलो. थोड्या वेळाने खबर येईल,

असं म्हणत सामान बांधायला सांगितलं. आम्हाला खूप बरं वाटलं. कारण आज चौकशी होऊन आमची सुटका होणार, असं वाटत होतं. त्यामुळे आम्ही पटापट सायकलला बॅगा बांधून निघालो. कालच्याच रस्त्याने साधारण १५ मिनिटे चालल्यावर एका झोपडीवजा घरात दोन माणसं बसलेली दिसली. आम्ही सायकली एका कडेला लावून पुढे जाऊन थांबलो. त्यातील एक तरुण आधी भेटलेला होता. त्याच्या बरोबर काळे कपडे परिधान केलेला, शरीराने उंच असलेला तरुण बाजेवर बसला होता. बहुधा तो त्यांचा मुख्य असावा. आम्हाला बाजेवर बसण्यास सांगून विचारपूस करू लागले. ''आप कहाँ से आये हो? कहाँ जाना है?'' असं विचारत त्यांनी आमची नावं व पत्ते लिहून घेतले. आम्ही आमच्या अभियानाची माहिती त्यांना दिली. बरोबरच ''हमें आगे विशाखापट्टणम् तक जाना है। चार दिन तो बीत गये, हमारा १२ जनवरी से कॉलेज शुरू होने वाला है'' असं म्हणत लवकर निर्णय घेऊन सोडण्याची विनंती केली. यावर विचार करून ''हमारे उपरवाले पार्टीके लोगोंसे मिलने के बाद आपका निर्णय हो जाएगा। घबराना नहीं, खाने-पिने की व्यवस्था हो जाएगी। बस, दो दिन में छोड देंगे.' असं म्हणत त्याने आम्हाला निर्णय सांगितला.

अजून दोन दिवस म्हटल्यावर तर आम्हाला काय बोलावं, तेच कळेना. शेवटी त्यांच्याच हातात सर्व काही होतं. खात्री पटावी म्हणून त्यांना आमच्या कॅमेऱ्यातील फोटो दाखवले. आम्ही सायकली घेऊन आधीच्या जागेवर परतलो. आता काहीही सुचेनासं झालं होतं. मी बाजेवर पडून राहिलो. 'दोन दिवसांनी सोडू' असं म्हणत आणखी किती दिवस आम्हाला ठेवणार होते, माहीत नव्हतं. मला घरच्यांची खूप आठवण येत होती. त्यांची काय परिस्थिती झाली असेल, सांगता येत नव्हतं. चार दिवसांपासून आम्ही त्यांना फोन केलेला नव्हता. कालच्या माणसाने सांगितल्याप्रमाणे आम्हाला महिनाभर ठेवणार की काय, असा विचार सारखा येत होता. घरच्यांची खूपच काळजी वाटत होती– विशेषत: वडिलांची. लहानपणापासून त्यांनी माझा प्रत्येक हट्ट पुरवला होता. वडिलांबरोबरचं नातं मित्रासारखं होतं. माझ्यावर पहिल्यापासूनच त्यांचा खूप जीव होता. जेव्हा मी हा दौरा आखला, तेव्हा मला विरोध न करता त्यांनी मार्गदर्शनच केलं होतं. मी व वडिलांनी एकत्र बसून दौऱ्याचा प्लॅन डिस्कस केलेला होता. अगदी निघेपर्यंत त्यांच्याशी मी तयारीसंदर्भात बोलत होतो. बाजेवर पडल्या-पडल्या हे विचार मनात घोंगावत होते. त्याचबरोबर कालच्या लहान मुलाच्या भवितव्याचा विचार करत होतो. लहानपणापासूनच त्यांना पोलीस, दादालोक, बंदुका, चाकू, धनुष्यबाण या गोष्टींची ओळख होत होती. पुढे जाऊन ही मुलं आधीच्या गावात भेटलेल्या मुलांप्रमाणे हातात बंदुका घेऊन उभी राहणार होती का? याचा विचार करताना याला बंदुका हेच उत्तर असू शकतं का, प्रश्न

मनात येत होता. शांततेच्या मार्गानं नाही का बदल होऊ शकत? उत्तर काही मिळत नव्हतं. विचारांची कालवाकालव झाली होती.

दुपारचे तीन वाजले असावेत. विचार करत बसलो असताना चाकू घेऊन आम्हाला घ्यायला आलेला कालचा माणूस पुन्हा आला. आज पुन्हा त्याने खूप नशा केली होती. पुन्हा तेच-ते प्रश्न तो विचारत होता. 'घबराना नहीं, कुछ नही होगा... बताओ कहाँ से आये हो? किस ने भेजा है?' आम्ही जास्त बोलत नव्हतो. याच्यापासून सुटका करून घेण्यासाठी मी शेजारी भांडी घासत असलेल्या मुलाला पाणी देण्यासाठी हातपंपाने पाणी उपसू लागलो. त्यावर त्या माणसाने हातातील चाकू दाखवत 'कही मत जाना। इधर ही बैठे रहेना।' असं म्हणत मला बोलावून घेतलं. आम्हाला हालचाल करता येत नव्हती, बाजेवरून उठता येत नव्हतं. आमचं स्वातंत्र्य पहिल्यांदाच हिरावल्यासारखं झालं होतं. आमच्या तिघांमध्ये जास्त बोलणं आम्ही टाळत होतो. कारण बरोबरच्या माणसाला आम्ही काय बोलतोय हे कळत नसल्यामुळे उगाच गैरसमज निर्माण व्हायला नको. म्हणून आम्ही गप्पच होतो. नेल्सन मंडेलांनी उमेदीची २७ वर्षे तुरुंगात कशी काढली असतील याचाच विचार मी करत होतो. आम्ही तर आपल्याच माणसांत, उघड्या जंगलात होतो; तरीदेखील एक अस्वस्थता कायम मनात होती. शेवटी एकदाचा तो माणूस निघून गेला. आम्ही तिघांनी सुटकेचा नि:श्वास टाकला.

सकाळपासून गेलेला सुरेश कुठे गायब झाला होता, काहीच कळत नव्हतं. तोच आम्हाला मोठा आधार वाटत होता. त्याला हिंदी व्यवस्थित बोलता येत असल्यामुळे आम्ही त्याच्याशी बोलू शकत होतो. संध्याकाळ झालेली होती. दिवस मावळला होता. दिवसभर गायब झालेली लहान मुलं पुन्हा आमच्याभोवती बसली. शेकोटी पेटवून आम्ही सर्व बसलो. आम्ही प्रत्येकाला नाव विचारत होतो. सुरुवातीला मुलं खूप लाजत होती. पण ती आमच्याशी हळूहळू बोलू लागली. नाव सांगू लागली. माचू, लगडू, हुंगा... इत्यादी. आम्ही त्यांना गाणं म्हणण्यासाठी प्रोत्साहन देत होतो. पण कोणी गाणं म्हणण्यास तयार नव्हतं. शेवटी आम्हीच गाणं म्हणायला सुरुवात केली. सुरुवात मराठीतल्या प्रार्थनेतून केली. 'खरा तो एकचि धर्म. जगाला प्रेम अर्पावे', जरी भाषा कळत नसली तरी सुरांमुळे त्यांना खूपच हसायला येत असावं. सभोवतालची माणसे, स्त्रियाही आमची गंमत मोठ्या उत्सुकतेने पाहत होत्या. त्याचबरोबर छोड आये हम वो दुनिया, संदेसे आते है, हमे तडपाते है अशी हिंदी गाणीदेखील म्हणत होतो. कुत्रा, मांजर, गाढवाचे आवाज काढताना खूप मजा येत होती. मुलंही खूप हसत होती. एकाच्या हातात श्रीकृष्णने मक्याचं कणीस बघितल्यावर 'इसे यहाँ क्या कहते है?' असं विचारलं. पण काहीच उत्तर न देता त्यातील एकाने अर्ध फुटलेलं मडकं आणलं. शेकोटीच्या कडेला तीन

दगड ठेवत त्यावर ते मांडलं व मक्याच्या कणसाचे दाणे त्यात टाकले व ते काडीने हलवू लागला. या मक्याच्या कणसाचे बघता-बघता पॉपकॉर्नमध्ये रूपांतर झाले. आम्हा सर्वांना पॉपकॉर्न वाटण्यात आले. खूपच खरपूस लागणाऱ्या या पॉपकॉर्नची चव आपल्या पॉपकॉर्नपेक्षा वेगळीच लागत होती. पॉपकॉर्न संपल्यावर आम्ही आमच्याकडील शेंगदाणे बाहेर काढले व ते भाजण्यास सांगितले. भाजलेले शेंगदाणे मुलांना खाताना खूपच मजा वाटत होती. बहुधा ते शेंगदाणे प्रथमच खात असावेत. जेवणाबरोबरही आम्ही शेंगदाणे खात होतो. भातात भाजलेले शेंगदाणे घातल्याने भात खूपच रुचकर व चविष्ट लागत होता. सर्वांचं जेवण होऊन झोपायची तयारी सुरू केली. मुलं आमच्यासोबतच आजूबाजूला झोपली होती. आम्ही पहुडलो होतो. ती रात्र आम्ही खूप एन्जॉय केली. मुलांबरोबर गाणी म्हणण्यात वेगळीच मजा आली.

सकाळ झाली तरी उठावंसंच वाटत नव्हतं. सर्व मुलं शेकत बसली होती, आम्हीही उठून शेकोटीलाच चिकटून बसलो. आमची नावं मुलांच्या चांगलीच लक्षात होती. विकास हा शब्द तर त्यांना ओळखीचा व सहज उच्चारता येत असावा. श्रीकृष्णही लक्षात राहत होता व बोलताही येत होता. पण आदर्श हे नाव लक्षात व उच्चारण्यासाठी अवघड जात असावं. ऊन चांगलं चढलं होतं. कालचा दिवसभर गायब असलेला सुरेश आज सकाळीच हातात रेडिओ घेऊन हजर झाला होता. त्याला बघून आम्हाला हायसं वाटलं. रेडिओची चॅनल्स ॲडजेस्ट करतच तो येत होता. रेंज कमी असल्यामुळे गाणी लावताना वेळ लागत होता. मधे छत्तीसगडी भाषेत गाणी लागत होती. आल्यावरच त्याला 'क्या यार, कल दिनभर कहाँ गायब थे?' असं म्हणत आम्ही नाराजी प्रकट केली. 'नही यार, कल मुझे एक काम था' असं म्हणत त्याने झाडाच्या दोन काड्या आम्हाला दात घासण्यासाठी दिल्या. चिंचेच्या काड्यांनी दात घासत आम्ही जवळच्याच नळावर फ्रेश झालो. १० वाजत आले होते. सुरेशने लगेच जेवणाची तयारी सुरू केली. तो जेवण बनवणार होता. भात शिजायला ठेवला होता. त्याने मोठे वाल आणले होते. आम्ही ते सोलून देत होतो. भात शिजून तयार झाल्यावर पातेल्यात वालाची भाजी शिजत ठेवली. मी खूप प्रयत्न करून बातम्यांचा चॅनल लावला. यात 'छत्तीसगड के मुख्यमंत्री श्री. रमणसिंग सरकारने दो जिलों को नक्षलप्रभावित जिलो में से निकालने की घोषणा की' तसंच 'कुछ सरकारी पदों के लिए मुलाखत न लेने की नरेंद्र मोदी के स्वातंत्र्य दिन के अवसर पर की गई घोषणा आज से जारी होगी...' एकूणच बातम्या ऐकून आम्हाला बरं वाटलं. जेवण तयार झालं होतं. तोंडाला पाणी सुटलं होतं. सर्व जण जेवायला बसलो. बहुतेक लहान मुलं कुठे तरी गेली होती.

सुरेशने एक गोंडीतलं पाठ्यपुस्तक आणलेलं होतं. गोंडी भाषेत एखाद्या पदार्थाला किंवा वस्तूला काय म्हणतात याची माहिती त्यात दिलेली होती. जसं-

पाण्याला हिंदीत पानी म्हणतात, गोंडीत यार. असं छत्तीसगड सरकारचं चौथीसाठीचं पाठ्यपुस्तक होतं ते. सुरेश आमच्याशी गप्पा मारत होता. स्वत:बद्दल सांगत होता. ''मेरी शादी हो कर दो साल हो गये है। कल ही मेरी घरवाली उसके मायके में जगदलपूर गई है। कल मैं मिट्टी से इट बना रहा था इसलिए नही आ पाया। मैं घर बनवा रहा हूँ। उस के लिए इट लग रही थी।'' हे सांगताना त्याने आम्हाला काही महिन्यांपूर्वीची गोष्ट सांगितली. ''कुछ महिने पहले यहाँ रात को पुलिसवाले आए। उन्होने एक पेटवाली औरत को पानी में डुबा-डुबाकर मार डाला। उसके बाद यहाँ बहुत पत्रकार आए थे। सोनी सुरी नाम के आम आदमी पार्टी के नेता ने यहाँ आ कर पत्रकारों को इसकी जानकारी दी। पुलिस कभी भी अंदर आती है। इसलिए हम पुलिस आने की खबर सुनते ही छुपकर बैठ जाते है।'' मनाला सुन्न करणाऱ्या गोष्टी आम्ही ऐकत होतो. ''यह नया सरकार वह उडनेवाली मशीन होती है, रिमोट पे चलती है उससे अब हमला करनेवाली है।'' त्याला ड्रोन म्हणायचं असावं कदाचित. ''आपके इधर होती है ऐसी पुलिस?'' असं त्यानं विचारलं. यावर 'हमारे इधर इतनी पुलिस नही होती, खाली रास्ते पे और पुलिस थाने में होती है।' असं सांगितलं.

मी बाजेवर खाली मान घालून बसलो होतो. काहीच सुचत नव्हतं. आज २ जानेवारी. पाच दिवस झाले होते. अजून घरच्यांशी काहीच बोलणं झालं नव्हतं. त्यांना खूपच काळजी लागलेली असणार. मला असं झोपलेल्या अवस्थेत पाहून सुरेश या दोघांना म्हणाला, ''वो बीमार है क्या?'' त्यावर त्यांनी ''नही उसको घरवालों की याद आ रही है।' असं सांगितलं. सुरेशला माझ्याबद्दल खूप वाईट वाटायला लागलं. त्याने आम्हाला धीर देण्याचा प्रयत्न केला. सुरेशला आमच्याबरोबर थांबण्यास सांगितलं. दुपारचे तीन वाजले होते. खूप भकास वाटत होतं. सगळीकडे शांतता होती. या एवढ्या कठीण काळातही 'आपण असं बसून न राहता, चला काही तरी करू या' असं श्रीकृष्ण म्हणत होता. 'आपण हातपंपाशेजारचं गवत साफ करू व तिथे रोपटी लावू या' असं म्हणत होता. पण आम्ही काही उठण्यास तयार नव्हतो. चेहरा उदास करून आम्ही पडून होतो. मधेच एक माणूस सायकलवर आला आणि त्याने शेजारच्या झोपडीबाहेर काम करत असलेल्या माणसाच्या कानात काही तरी सांगितलं. त्या माणसाने आम्हाला सांगितलं, 'खबर आयी है, हमे जाना है' असं म्हणत उरकण्यास सांगितलं. आम्ही बॅगा भरून त्या सायकलला व्यवस्थित बांधल्या. काही तरी निर्णय झाला असावा, असं वाटत होतं. पण ही तिसरी वेळ असल्यामुळे पुन्हा 'दोन दिवस' असं उत्तर मिळणार का याची खात्री नव्हती.

शेजारच्या झोपडीतून एक आजी बाहेर आल्या. आमच्याजवळ येत त्यांनी आदर्शच्या गालावरून मायेने हात फिरवला. चेहऱ्यावर हसू आणत त्या गोंडी भाषेत

काही तरी बोलल्या. आम्हाला काही समजलं नाही. त्यांच्या हाताची, मायेची उब मात्र जाणवली. आम्ही पटापट निघालो. मनात असंख्य विचार येत होते. निर्णय झाला असेल का? आम्हाला आज सोडणार असतील का? का फक्त चौकशीसाठीच बोलावलं असेल? एक ना अनेक प्रश्न पडत होते. कालच्याच झोपडीत ते दोघे पुन्हा बसले होते. कालचा काळ्या शर्ट-पँटवर असलेला तरुण आज शर्ट आणि लुंगी अशा साध्या वेशात होता. कडेला शेजारची माणसेही जमली होती. आम्ही सायकली लावून बाजेवर जाऊन बसलो. त्या तरुणाने ''आपको क्या लगता है, पार्टी ने क्या निर्णय लिया होगा?'' यावर आम्ही म्हणालो, ''हम तो विद्यार्थी है, हमारा मकसद साफ है। पार्टी को तो हमे छोडना चाहिए।'' यावर थोडा वेळ थांबत ''हाँ, पार्टीने आपको छोडने का निर्णय लिया है।'' असं म्हणत तो आमच्याकडे हसत पाहत राहिला. 'आप को छोडने का निर्णय लिया है।' हे शब्द कानावर पडताच खूप आनंद झाला. कधी तिथून आम्ही निघतोय, असं मला झालं होतं. यानंतर त्यांनी आम्हाला 'आपके यहाँ दादालोग है क्या?' असं विचारलं. यावर 'हाँ, गडचिरोली जिले में है।' असं सांगितलं. यानंतर त्याने आम्हाला त्यांचं दर महिन्याला निघणारं मासिक वाचायलं दिलं. त्यातला एक लेख मोठ्याने वाचायला सांगितला. त्यात मागील महिन्यात आत्मसमर्पण झालेल्यांमध्ये खऱ्या नक्षलवादींची संख्या कशी कमी आहे, यावर लेख होता. तसंच स्थानिक आदिवासींविरुद्ध राज्य सरकार व पोलीस कसा अन्याय करत आहेत, हे हिंदीमध्ये लिहिलं होतं. ''आप यहाँ से आगे आपका दौरा पूरा करेंगे क्या?'' असं त्यानं विचारलं. यावर आम्ही ''देख लेंगे। पाँच दिन तो यहाँ ही गुजर गये । कम से कम बालिमेला डॅम तक तो सायकल से जाएंगें।' असं सांगितलं. साडेचार वाजत आले होते. आता निघणं गरजेचं होतं. ते म्हणाले, ''चिंतलनार नजदीक है। आप वहाँ जाओ। हमारा आदमी आपको चिंतलनार के पास छोड देगा। मैं भी १५ साल हो गए, आज तक चिंतलनार नही गया।'

आमच्या बॅगा सायकलला आम्ही व्यवस्थित बांधून घेत होतो. शेजारी वयोवृद्ध माणूस बसला होता. त्याने कदाचित नशा केली असावी. नशेतच तो 'एक बॅग दे दो। ये कितने की है। एक बॅग दे दो' असं सारखं म्हणत होता. एक बॅग देण्यासाठी आग्रह करत होता. प्रत्येक बॅगेत सामान असल्यामुळे आम्हाला बॅग देता येणार नव्हती. आम्ही त्याच्याकडे दुर्लक्ष करण्याचा प्रयत्न करत होतो. बॅगा बांधून झाल्या होत्या. आम्ही सगळ्यांचा निरोप घेऊन निघालो. त्या तरुणाचाही आम्ही निरोप घेतला. आम्ही रस्त्याला लागेपर्यंत तो पायी आला होता. जाताना स्वत:चं नाव सांगताना 'कॉम्रेड भीमा, बिजापूर एरिया कमांडर' असं म्हणाला.

८

आमच्याबरोबर एक १८-२० वर्षांचा तरुण पाठवलेला होता. ॲटलासची सायकल घेऊन तो पुढे मार्ग काढत जात होता. आम्ही त्याच्यामागोमाग सायकलवरून निघालो होतो. त्याला हिंदी येत नसल्यामुळे आमचं बोलणं काही समजत नव्हतं. त्यामुळे आम्ही त्याला 'चिंतलनार यहाँ से कितना दूर है?' असं विचारलं. त्यानं आमच्या तोंडाकडे काही न कळल्यासारखं पाहिलं. थोडं अंतर चालत गेल्यावर सायकल चालवताना श्रीकृष्णच्या शकिराच्या गिअरच्या सपोर्टरला दगड लागल्यामुळे तो तुटला. त्यामुळे सायकल चालवता येत नव्हती. मोठीच पंचाईत झाली. आधीच उशीर झाला असल्यामुळे आम्हाला घाईनं जाणं गरजेचं होतं. दिवस मावळतीकडे झुकला होता. आता केव्हाही अंधार पडणार होता.

तेवढ्यात सोबतचा तरुण एका ठिकाणी थांबला. तो का थांबला याची काही कल्पना आम्हाला नव्हती. चालतच तो शेजारच्या झुडुपात गेला. तिकडून आम्हाला माणसांचा आवाज येत होता. बहुधा तो त्यांना भेटायला गेला असावा. येताना तो तिथे असलेल्या माणसांना घेऊन आला. त्या माणसांमध्ये एका माणसाचा चेहरा ओळखीचा वाटत होता. दोन दिवसांपूर्वी, ज्या गावातील प्रमुखाने आमची चौकशी केली होती, तोच तिथे हातात बंदूक घेऊन उभा होता. पुढे येत 'हो गई क्या छुट्टी' असं म्हणत आमच्याबरोबरच्या तरुणाला तो काही तरी सांगू लागला. ''आज आप चिंतलनार नही पहुँच सकते। आप को बीच में रुकना पडेगा।'' असं सांगितलं. आम्हीही लगेचच त्यांचा निरोप घेत पुढे निघालो.

अंधार पडत आला होता. आम्ही पटपट चालत होतो. पण अजूनही चिंतलनार काही येत नव्हतं. ते किती अंतरावर आहे याची कल्पना नव्हती. कधी एकदाचं पोचतोय असं झालं होतं. फोन करून घरच्यांशी बोलणं महत्त्वाचं होतं. मधे एक ओढा लागला. त्यावर एकही पूल नव्हता. दोन्ही कडेला सिमेंटचे पोल ठेवण्यात आले होते. त्याच्यावरून सायकलने जाणं अवघडच होतं. पण हळूहळू आम्ही पलीकडे जाण्यात यशस्वी झालो. पुढील तरुणाला रोजची सवय असल्याने तो सहजरीत्या जाऊ शकला. आम्ही आता एका झोपडीवजा घराच्या दिशेने वळालो. कडेने पूर्ण झाडी असलेल्या त्या झोपडीच्या समोरच आम्ही सायकली उभ्या केल्या. बहुधा आम्ही याच घरात राहणार होतो. बाहेरच सारवलेल्या ओट्यावर बाजा टाकण्यात आल्या होत्या. अंधार पडला होता. शेकोटी पेटवण्यात आली. घरातील व आजूबाजूचे अशी अनेक माणसे जमलेली होती. यातच एक वयोवृद्ध माणूस होता. त्याला हिंदी बोलता येत असल्यामुळे त्याने आमची विचारपूस केली. 'हम महाराष्ट्र से आये है' असं सांगताच 'मै भी कई बार महाराष्ट्र गया हूँ' असं अभिमानाने सांगितलं. त्यानं आम्हाला 'सेल्फी पिते हो का?' असं विचारलं. यावर आम्ही

नकारार्थी मान हलवत, 'नहीं हम नशा नही करते' असं सांगितलं. त्यावर हसूनच त्याने 'चलो, ठीक है। कोई बात नही है।' असं म्हटलं.

'यहाँ कभी भी पुलिस आती है।' असं म्हणत त्याने भीती व्यक्त केली. आम्ही त्यांच्यातलेच एक आहोत की काय, असं पोलिसांना वाटायची भीती होतीच. पण एकंदर ओळखपत्रं व अनेक कॉन्टॅक्ट्स यामुळे तसा विचार करण्याची आवश्यकता नव्हती. आम्ही सर्वांनी एकत्र जेवण केले. आजही भात आणि डाळच होती. सगळे बाहेर ओट्यावर झोपले. आम्ही तिघांच्या बाजा एकमेकांना चिकटवून मधे शेकोटी पेटवली, पण थंडी काही केल्या कमी होण्याचं नाव घेत नव्हती. 'सुबह जल्दी निकलेंगे' असं म्हणत बरोबरच्या तरुणाला आम्ही झोपण्यास सांगितले.

सकाळी लवकरच फ्रेश होऊन साधारण सातला चालत निघालो. काही अंतरावर गेल्यावर तो तरुण थांबला. कडेला असलेल्या शेतात जाऊन बांधावर असलेल्या झाडावर चढला. याच वेळी काल रात्री भेटलेला तो वयस्कर माणूसही तिथे आला. झाड्याच्या शेंड्यातून थेंब-थेंब पाणी त्याच्या खाली अडकवलेल्या मडक्यात पडताना दिसत होते. आम्हीही सायकली लावून हा प्रकार बघण्यासाठी तिथे गेलो. त्या तरुणाने पाच लिटरच्या एका प्लॅस्टिकच्या भांड्यात ते मडक्यातील पाण्यासारखा पदार्थ ओतला. भांडं पूर्ण भरलं. त्याने पानाची घडी करून त्यामध्ये ओतून ते शेजारच्या दोन माणसांना दिलं. हे पाहून आदर्श व श्रीकृष्णने ते पिण्याची इच्छा व्यक्त केली. त्यांनाही पानांच्या द्रोणसारखा आकार केलेल्या भांड्यात त्याने तो द्रव दिला. त्याची चव चाखत त्या दोघांनी ते प्यायलं. मी काही ते पिणं पसंत केलं नाही. हे सर्व उरकताच आम्ही पुन्हा पायी चालत निघालो.

दिवस उजाडला होता. सूर्याची किरणं अस्तित्व दाखवत तळपत होती. साधारण नऊ वाजले असावेत. वाटेत एका गावात रस्त्याच्या कडेला घराचे बांधकाम करत असलेल्या माणसाकडे तो तरुण चालत गेला. आम्ही रस्त्यालाच उभे राहिलो. भूक लागल्याने जवळील चिक्की व लाडू खात होतो. काही वेळाने तो तरुण दोन लहान मुलांना घेऊन आला. दोघेही १२-१३ वर्षांचे असावेत. 'ये छोड देंगे चिंतलनार' असं म्हणत त्याने आम्हाला त्या मुलांबरोबर पाठवलं. वयाने खूपच लहान असलेल्या मुलांशी आम्ही बोलण्याचा प्रयत्न केला. त्यातील एक सातवीत शिकणारा होता, तर दुसरा शाळेत जात नव्हता. शाळेत शिकणाऱ्याला हिंदी येत असल्यामुळे आम्ही बोललेलं त्याला कळत होतं. श्रीकृष्णची सायकल जड असल्याने आम्ही हळूहळू चालत होतो. पटपट चालता यावं म्हणून श्रीकृष्णची सायकल मी स्वत:कडे घेतली. आम्ही आता बरंच अंतर चालत आलो होतो. एका बांधावरून चालताना लवकर जायच्या घाईत पाय अडकून मी पडलो. बरोबरची मुलं खूप दमली होती. आम्ही १५-२० किलोमीटर चालत आलो होतो. साधारण अकरा

वाजत आले होते. एका गावातून जात असताना झाडीतून माणसं एकदमच बाहेर आली. आम्ही घाबरलो. पुन्हा विचार आला की, हे आपल्याला पुन्हा थांबवून ठेवणार की काय? आम्ही त्यांना सर्व प्रकार व्यवस्थित सांगितला. ती मुलंही त्यांना गोंडी भाषेत सांगत होती. त्यांचा विश्वास बसल्यावर त्यांनी पुढं जाण्यास परवानगी दिली. साधारण अर्धा तास चालल्यावर आम्ही एका ठिकाणी थांबलो. श्रीकृष्णचं पोट दुखत होतं. 'हम यहाँसे पीछे जाते है। आप सीधा चले जाओ' असं सोबतीची मुलं म्हणत होती. आम्ही त्यांना थोडं आणखी पुढं येण्याची विनंती केली. त्यांनीही मान्य केलं.

भूक लागल्यामुळे जवळील पदार्थावर आम्ही ताव मारला, त्या मुलांनाही देऊ केलं, सुरुवातीला नको म्हणणारी मुलं आग्रह केल्यावर खाऊ लागली. श्रीकृष्णचं पोट दुखायचं जरा थांबलं. पुढील प्रवासाला सुरुवात केली. आता अंतर कमी राहिलं होतं. जंगलरस्ता असल्याने चुकायची शक्यता होती, म्हणून त्या मुलांना बरोबर येण्याचा आग्रह केला होता. काही अंतर चालल्यावर ती मुलं आम्हाला म्हणाली, ''आप यहाँ से सीधा जाओ। आपको चिंतलनार लगेगा। यहाँ से पास में ही है।'' आणि ती परतीला निघाली. ऊन डोक्यावर आलं होतं. चिंतलनारला पोचल्यावर घरच्यांना फोन करून आम्ही व्यवस्थित असल्याचं कळवून पुढील प्रवास करायचा, असं ठरवलं.

आज ३ जानेवारी. आम्ही फार तर बालिमेलापर्यंतच जाऊ शकत होतो. तब्बल पाच दिवसांनी आमचा बाहेरच्या जगाशी संपर्क येणार होता. साधारण चार-पाच किलोमीटर अंतर चालल्यावर आम्हाला पुढून एक स्त्री येताना दिसली. तिला आम्ही 'चिंतलनार कहाँ है?' असं विचारताच, 'बस, आगे ही है।' असं सांगितलं. आम्ही पुढे आलो. रस्त्याच्या कडेला घराचे बांधकाम चाललेले होते. त्याच्या समोरच उभ्या असलेल्या तरुणाने ''आप कहाँ से आये हो? आप महाराष्ट्र से है क्या?'' असं विचारलं. आम्ही त्याला घडलेला प्रकार सांगितला. ''मुझे बार-बार फोन करके आपके बारे में पूछते थे। आप जल्दी पास में ही एक कॅम्प है वहाँ जाओ'' असं त्यानं सांगितलं. बहुधा लालसूंनी त्यांना फोन केला असावा, असं वाटत होतं.

आम्ही गावात पोचलो. रोडच्या कडेला लहान-लहान घरे असलेलं चिंतलनार होतं. गावात जाऊन उजवीकडे गेलो. तिथे रोडच्या कडेला सीआरपीएफचा कॅम्प असल्याचं आम्हाला कळलं. आम्ही सायकली बाहेर लावून एकंदर प्रकार सांगितला. बहुधा त्यांना आमच्याबद्दल काहीच माहिती नव्हतं. त्यांनी बॅगा आतमध्ये घेऊन येण्यास सांगितलं. एका जवानाने विचारपूस केली. बॅगेतील प्रत्येक सामान बाहेर काढून आम्ही त्यांना दाखवत होतो. त्यानंतर आमची पूर्ण माहिती देण्यासाठी शेजारच्या रूमच्या बाहेर बसलेल्या जवानाकडे पाठवलं. आम्ही

येण्यामागचा उद्देश, पत्ता, नाव अशी माहिती देत होतो. आम्ही इथून किती वाजता गाडी असते, हेही विचारलं. यावर गाडी निघून गेल्याचं कळलं. इथून आम्ही सुकमाला जाणार होतो. साधारण दुपारी साडेबारा वाजता आम्ही कॅम्पमध्ये पोचलो होतो.

''आप यहाँ से जल्दी जाओ, फिर गाडी नही मिलेगी'' असं तो सांगत होता. तेवढ्यात आतून चार-पाच जवान आले. आमची विचारपूस केली. ''आप ही वो चार लडके हो क्या पूना से?'' आम्ही सांगितलं, 'हम तीन ही है। पूना से'' त्यांनी आम्हाला ऑफिसमध्ये नेलं. आम्हाला हा प्रकार काहीच कळत नव्हता. त्यांनी आमची नावं लिहून घेऊन वरिष्ठ अधिकाऱ्यांना खबर कळवली. त्यानंतर थोड्याच वेळात आतमधल्या रूममध्ये न्यूज चॅनलवर आम्ही सुखरूप असल्याची बातमी दिसली. प्रथम घरच्यांना फोन करून आम्ही सर्व सुखरूप असल्याचे कळवले. बाहेर मीडियामध्ये आम्ही बेपत्ता झाल्याची किंवा नक्षलवाद्यांनी अपहरण केल्याची बातमी राष्ट्रीय स्तरावर पोचलेली समजली. काही समजत नव्हतं. मन बधिर होऊन, जे काही होत आहे त्याला आम्ही सामोरे जात होतो. एकूणात काय, आम्हाला पुढील दौरा पूर्ण करता येणार नव्हता. आमच्या दौऱ्यावर पाणी पडलं होतं.

### मागे वळून पाहताना

आज मी जेव्हा एकूणच दौऱ्याकडे व त्यानंतर घडलेल्या घटनांकडे पाहतो, तेव्हा मन अचंबित होतं. आमच्या उद्देशाबद्दल मी आधीच बोललो आहे. दौऱ्यानंतर समाजातील अनेक लोकांना भेटता आलं. कुणी आमची वाहवा केली, तर कुणी आमची चेष्टा, तर कुणी टीकाही केली. माध्यमातील काहींनी आम्हाला 'शांतिदूत' म्हणून हीरो बनवलं, तर कुणी 'डाव्या विचारसरणीकडे झुकलेली मुले' असा आमच्यावर शिक्का मारला. आम्ही कसे राष्ट्रीय स्वयंसेवक संघाशी जोडलेले आहोत, असे सांगण्याचे प्रयत्न काहींनी केले. या सर्व गोंधळात आमचा मूळ उद्देशच बाजूला राहिल्याचं दु:ख आजही होत आहे.

ज्या आदिवासी लोकांसाठी आम्ही या दौऱ्याची आखणी केली होती, त्यांच्याबद्दल मात्र कुठेच वाच्यता होत नव्हती. आदिवासी प्रश्न, त्यांचं जीवनमान, त्यांच्या समस्या याबद्दल विचारणा झालेली नव्हती. अनेकांनी एवढ्या लांब फिरायला जाण्याची काय गरज होती, गोवा किंवा कोकणात जायचं होतं... असंही म्हटलं. कुणी 'दुसऱ्या देशात जायचं कशाला,' असे म्हणत आमची चेष्टाच करून टाकली. आपण एका भारत देशात राहतो आणि या महाराष्ट्र राज्याबरोबर छत्तीसगड हेही एक राज्य आहे, हे त्यांना आजतागायत माहीतच नव्हते. मनाला खंत कायमची लागून राहिली की, आम्ही उर्वरित दौरा पूर्ण करू शकलो नाही. सुकमा, दंतेवाडा,

बालिमेला यांसारख्या ठिकाणच्या आदिवासी माणसाला आम्ही भेटू शकलो नाही, आजही ही खंत मनात आहे. आजही वर्तमानपत्रात जेव्हा या प्रदेशातील बातम्या येतात, तेव्हा दौऱ्याबद्दलच्या आठवणी ताज्या होतात. लहान मुलांचे चेहरे डोळ्यांसमोर जसेच्या तसे उभे राहतात. खडतर परिस्थितीमध्ये शिक्षण घेऊन डॉक्टर होऊन आपल्याच समाजासाठी काम करण्याचं ध्येय बाळगलेला हुंगा आठवतो. हाच हुंगा जेव्हा मला फोन करून 'भैया, आप कैसे हो? अच्छे हो ना!' असं म्हणत आमची विचारपूस करतो, तेव्हा मन भरून येतं.

मला माहीत नाही की– मी जे लिहिलंय ते वाचल्यावर लोक मला डावे म्हणतील की उजवा? कारण आज समाजात वातावरणच असं आहे की, प्रत्येकाला डाव्या किंवा उजव्या कप्प्यात टाकण्याची स्पर्धाच लागलेली आहे. कोणी धर्मावर बोलला की तो उजवा आणि कोणी गरीब आदिवासी माणसांसाठी बोलला तर तो डावा संबोधला ज़ातो.

आम्हाला एका पत्रकार परिषदेत एका पत्रकाराने 'पुढील दौरा कोणता?' असं विचारलं होतं. त्यावर आम्ही लगेचच 'पूर्वेकडील राज्ये' असं सांगितलं होतं. सध्या तरी लगेच दौरा आखण्याची व तिकडे जाण्याची वेळ नाही. तसा संपूर्ण भारतच पिंजून काढण्याची मनात प्रबळ इच्छा आहे. पण प्रत्येक गोष्टीची वेळ–काळ ठरलेली असते. अभ्यास करून, स्वत:ला घडवून तसंच स्वत:च्या पायावर उभं राहून प्रशासनातून असेल किंवा शिक्षणातून किंवा समाजसेवेतून देशाची सेवा करणं हे आम्ही आयुष्याचं आद्य कर्तव्य व ध्येय समजतो. माणूस बनण्याचा, त्याला समजून घेण्याचा प्रयत्न करण्याचा प्रवास असाच कायम सुरू राहावा, अगदी शेवटच्या श्वासापर्यंत... अशीच आमची इच्छा आहे.

# अनुभूती : दुहेरी संघर्षाची



श्रीकृष्ण झोवाळे

ठरवल्याप्रमाणे नकाशात काढलेल्या मार्गाने आम्ही या घनदाट जंगलात राहणाऱ्या लोकांमधील माणूस समजून घेण्यासाठी सायकलवरून प्रवास करत होतो. जंगलामध्ये राहूनही मानवधर्माची जाणीव असणाऱ्या लोकांना भेटण्याची इच्छा मागच्या प्रवासामुळे अधिक दृढ झाली होती. २९ तारखेची ती दुपार मार्गशीर्ष महिन्यातील शांत सूर्यप्रकाशातील होती. रस्त्यावर असणाऱ्या मोठ-मोठ्या खड्ड्यांमुळे सायकलींना वेग येत नव्हता. सायकलवरून वारंवार खाली उतरून ती उचलून घ्यावी लागत होती. कोणत्याही संकटाला तोंड देण्याचे ठरवल्यामुळे आम्ही प्रवासाचा आनंद घेत होतो. ज्याप्रमाणे आटलेली नदी पावसाच्या पाण्याने पुन्हा वाहते, त्याप्रमाणे आमचा सायकल प्रवास जंगलातील पालापाचोळ्यांमुळे बुजलेल्या वाटा पुन्हा निर्माण करत होता.

आजच्या प्रवासाची सुरुवात उशिरा झाल्यामुळे आम्ही सायकल वेगाने चालवत होतो. बाटलीमधील पाणी कधीच संपले होते. एखादी वस्ती पाहून पाणी पिण्यासाठी थांबण्याचा विचार होता. तेवढ्यात काही लहान मुले खेळताना दिसली. सायकली बाजूला लावून आम्ही पाण्याच्या दिशेने जाऊ लागलो. तेव्हा गावातील एका मुलाने येऊन चौकशी केली. मुलाच्या बोलण्यात आमच्याविषयी कुतूहलजनक आदर दिसत होता. त्याला शिक्षणाविषयी विचारल्यावर कळले, तो बासागुडाच्या आश्रमशाळेत शिकत आहे. ख्रिसमसच्या सुट्टीमुळे तो घरी आला होता. त्याने आम्हाला प्रश्न विचारायला सुरुवात केली. ‘‘कहाँ से आये हो आप? इधर किधर

जा रहे हो? इस रास्तेसे ही क्यों आये हो आप? क्या आप पुलिसवाले है? आप पीछे चले जाओ.'' त्याच्या बोलण्यावरून-हावभावावरून संभाव्य संकटे स्पष्ट होत होती. अशा प्रसंगाला तोंड देणे खूप महत्त्वाचे होते. तेवढ्यात रस्त्याच्या डाव्या बाजूने काही माणसे येताना दिसली. एकाकडे रेडिओ होता. काया सडपातळ, रंग काळा. काटक शरीरयष्टी असणारी ती माणसे जवळ आली. हातात रेडिओ असणारा माणूस म्हणाला, ''आपको इधर नहीं आना चाहिये था।'' एक व्यक्ती पाठीमागे गेली. ती झाडाखाली बसलेल्या नऊ-दहा व्यक्तींशी काही तरी बोलून परत आली. आपापसात चर्चा केल्यानंतर रेडिओधारक म्हणाला, ''आप रास्ता भूल गये हो। हम आपको ठीक रास्ता दिखाते है। चलो हमारे साथ।''

काही मुलांनी आमच्या सायकली पुढे चालवत नेल्या. आम्हाला एका झाडाखाली उभे केले. पुन्हा बाकीच्यांनी चौकशी सुरू केली. या चौकशीतील प्रश्न संशयास्पद होते. तेवढ्यात तिथे एक बनियन घातलेला माणूस आला. त्याने इतर लोकांना काही तरी सांगितले. नंतर काही लोकांनी आम्हा तिघांचे हात पाठीमागे बांधले. आम्ही घाबरून गेलो. एखाद्या कैद्याच्या मनात फाशीच्या वेळी हात मागे बांधत असताना काय विचार येत असावेत, याची अनुभूती आली. हृदयाचे ठोके जलद गतीने पडताहेत, हे जाणवत होतं. पण मनात विचार ठाम होता- चांगल्या कार्यासाठी आलो आहोत, तर जे होईल ते चांगलेच होईल. जे आहे ते स्वीकारले पाहिजे. ईश्वर चरणी प्रार्थना केली, तुझ्या इच्छेने कार्य घडो.

आम्ही त्यांना सांगण्याचा प्रयत्न करत होतो की, 'हम महाराष्ट्रसे आदिवासी लोगोंसे बातचित करने, उनकी संस्कृती जानने के लिए आये है।' परंतु त्यावर त्यांचा विश्वास बसत नव्हता, हे त्यांच्या चेहऱ्यावरून स्पष्ट होत होते. माझ्या वरच्या खिशात आमच्या प्रवासाचा नकाशा होता. बनियनवाल्या माणसाने तो नकाशा घेतला. नकाशा पाहताक्षणी त्यांच्यात पुन्हा संभाषण सुरू झाले. त्यांनी प्रश्न करायच्या आतच मी म्हणालो, ''हम इस नकाशाके माध्यम से सायकल यात्रा कर रहे है। हम अंततः विशाखापट्टणम तक जाने वाले है।'' त्यांच्यात पुन्हा गोंडी भाषेत संभाषण सुरू झाले, ते आम्हाला समजत नव्हते. बनियनवाला त्यांचा प्रमुख असावा. त्याने काही व्यक्तींना गोंडी भाषेत काही तरी सांगितले. त्यांनी आमच्याजवळ येऊन सांगितले, ''आपको दो दिन यहाँ रुकना पडेगा। हम आपको रहने और खाने को देंगे। दादालोगोंकी परमिशनबगैर आप यहाँ से नही जा सकते.'' तेव्हा लक्षात आलं की, नक्षलवादी माणसांना गावातील वस्तीवरची माणसं दादालोक म्हणतात.

वातावरण अस्वस्थ करणारे होते. आम्हाला चार-पाच जणांनी झाडाखाली जंगलातील पाऊलवाटेने नेले. एक किलोमीटर अंतर गेल्यावर तिथे मध्यम

आकाराची दगडाची टेकडी होती. तिथे तिघांना वेगवेगळे बसवले. मला आदर्श दिसत नव्हता. विकास १०० पावलांवर असणाऱ्या एका झुडपाच्या आड अस्पष्ट दिसत होता. माझ्याजवळ एक व्यक्ती पिशवी घेऊन आली. ''ये आपकी बॅग है क्या?'' असं विचारल्यावर मी होकारार्थी मान हलवली. ती बॅग माझ्यापासून काही अंतरावर ठेवून तो आदर्शकडे गेला. त्यानंतर विकासकडे गेला. माझ्याजवळ असणाऱ्या माणसाने मला प्रश्न विचारला, ''आप पुलिसवाले हो क्या?'' मी 'नाही' म्हणून मान हलवली. इथून जाण्याचे कारण मी सांगू लागलो. ''जंगलातील लोकांचे राहणीमान, त्यांची संस्कृती आम्हाला अधिक शिकवण देते. शहरातील हरवलेली माणुसकी आम्हाला या आदिवासींमध्ये पहायला मिळते. मानवताधर्म आम्हाला इथे अधिक शिकता येतो...'' हे तो ऐकतच राहिला.

तेवढ्यात बनियनवाला माणूस आला. ''आपको पानी चाहिए?'' असं विचारलं. मी ''हाँ चाहिए।'' तो म्हणाला, ''आप खुद पियेंगे, या मैं उपरसे डालू?'' हात पाठीमागे बांधले असल्यामुळे 'उपरसे डालो' असं सांगितलं. वृक्षारोपण करणारा ज्याप्रमाणे लावलेल्या वृक्षाला प्रेमाने पाणी घालतो, त्याप्रमाणे माझ्या तोंडामध्ये तो पाणी ओतत होता. त्यानंतर त्याने माझ्या पिशवीतील साहित्य एक-एक करत बाहेर काढले. ''हे काय आहे? हे कशासाठी?'' असे प्रश्न विचारून सर्व वस्तूंची पाहणी केली आणि ज्या पद्धतीने ती पिशवी भरली होती त्याच पद्धतीने सर्व साहित्य पिशवीत ठेवले. पिशवीत खाण्याचे साहित्य होते. ''ये आप ले सकते हो'' असं मी म्हटलं, तरी त्यानं त्या वस्तूंचा मोह ठेवला नाही. बनियनवाल्याने बांधलेले हात सोडण्यास सांगितले. दोन्ही हात सोडून एका हाताला बांधण्यात आले. सुतळीने बांधलेल्या डाव्या हाताच्या गाठेचा स्पर्श अजून स्पष्ट जाणवत होता. हे सुरू असताना आम्हाला तिघांना स्वतंत्र प्रश्न विचारण्यात आले, पण आमची उत्तरे एकच होती. ''आपको एक-दोन दिन रुकना पडेगा। चिंता मत करो। हम आपको छोड देंगे।'' असं त्यांनी सांगितलं. पुढे काय होणार आहे, याच्या अंदाजाचा लवलेशही नव्हता.

आमच्यापुढे दोन व्यक्ती व पाठीमागे तीन-चार व्यक्ती असे सगळे पुन्हा जंगलाच्या आतील रस्त्याने चालत राहिलो. तुमचे नाव काय, इथे कोणकोणती पिके घेतली जातात, मुले शाळेला कुठे जातात, असे प्रश्न चालताना आम्ही प्रत्येकाला विचारत होतो. पण प्रत्येक प्रश्नाचे उत्तर मिळत नव्हते आणि मिळत होती ती उत्तरेही अस्पष्ट होती. आमच्या आपापसातील संभाषणामुळे त्यांना संशय येऊ नये म्हणून विशिष्ट ठिकाणी इशारा करून किंवा हाताने एखादे ठिकाण दाखवून वेगळाच विषय आम्ही बोलत होतो. आपल्याकडून कोणती चूक झाली नाही ना, असं संभाषण करत चालत होतो. आदर्शच्या अचानक लक्षात आलं- आपले पोलिसांबरोबरचे

काही फोटो आहेत. ते त्यांनी पाहिले, तर त्यांच्या मनात गैरसमज होईल की- आपण पोलिसांना मदत करणारे आहोत किंवा शासनखबरी आहोत, म्हणून मेमरीकार्ड नष्ट केले पाहिजे. संकटकाळी मनामध्ये आलेले विचार योग्य ठिकाणी योग्य पद्धतीने कसे वापरायचे, हे आदर्शकडून शिकावे.

दुपारचे जेवण न झाल्यामुळे खूप भूक लागली होती. म्हणून आम्ही आमच्याकडचे बुंदीचे लाडू काढले. (त्याच वेळी पिशवीत असणाऱ्या कॅमेऱ्यातून मेमरीकार्ड काढून आतल्या आत मी तोडून टाकले) लाडूवरील दाबामुळे मोकळी झालेली बुंदी सर्वांना वाटली, पण ती कुणी खाण्यास तयार नव्हते. म्हणून आम्ही पहिल्यांदा बुंदी खाल्ली, त्यानंतर त्यांना दिली. तेव्हा सगळे तेंदुपत्त्याच्या पानावर बुंदी घेऊन खाऊ लागले. सर्वांना हा गोड पदार्थ आवडला होता.

आमची राहण्याची व्यवस्था एका खळ्याच्या ठिकाणी केली. तिथे पशुपालन अधिक प्रमाणात केले जाते. सूर्यास्ताची वेळ झाली होती. आम्ही ज्या ठिकाणी बसलो होतो, त्या ठिकाणी गाई आमच्या दिशेने आल्या- जणू आमच्या स्वागतासाठीच आल्या की काय! तांबड्या, पांढऱ्या, मिश्र रंगाच्या त्या गाई वासरांना घेऊन फिरत होत्या. काही वासरे आईजवळ जाऊन आनंदाने उड्या मारत होती. जणू आम्ही आल्याचा त्यांना आनंद झाला होता! तिथली थंडी सहन होणारी नव्हती. काही माणसांनी जवळपास असणारी लाकडे आणि पालापाचोळा गोळा करून शेकोटी पेटवली. काहींचे आजूबाजूला लक्ष होते, तर काही शेकोटीजवळ होते. आमचीही ओढ त्या शेकोटीच्या दिशेने वळली होती. डाव्या हाताला अजूनही सुतळी बांधलेली होती. पेटत्या लाकडाचा अग्नी शरीरासह मनाला ऊब देणारा होता. अचानक माझे लक्ष आकाशाकडे गेले. तेव्हा एकाच वेळी दोन तारे विरुद्ध दिशेने जाताना दिसले. ते दृश्य सर्वांनाच दाखवले. एकाच वेळी विरुद्ध दिशेने जाणारे तारे मला पहिल्यांदाच बघायला मिळाले. त्या दिवशी मार्गशीर्ष महिन्यातील चतुर्थी असल्यामुळे चंद्रप्रकाश शीतल होता. त्या मंद प्रकाशात तारे उठून दिसत होते. शेकोटीशेजारी आम्ही त्यांना प्रश्न विचारू लागलो. 'तुम्हाला महाराष्ट्रातील पुणे शहर माहीत आहे का?' त्यांनी नकारार्थी अगर होकारार्थी शब्द न वापरता केवळ तोंडातून विशिष्ट प्रकारचा आवाज काढला. पहिल्यांदा तो आवाज कशासाठी काढतात, हे समजले नाही. परंतु दुसऱ्या दिवशी समजले, तिथे असणारे गोंड आदिवासी आपल्याला माहीत नसणारी गोष्ट नाही म्हणून सांगताना ज्याप्रमाणे लहान मूल गाडी-गाडी म्हणून खेळताना दोन्ही ओठांच्या कंपनाने आवाज काढते, तसाच आवाज ते काढतात.

जेवण आणले होते. आम्हाला ताटलीत जेवण दिले आणि त्यांनी स्वत:साठी पानांपासून मोठ्या आकाराच्या बनवलेल्या द्रोणात घेतले. त्यात द्रोणभर भात आणि

चिंचेचा कोळ होता. मला दिलेल्या ताटलीत भात, चिंचेचा कोळ आणि माशाचे तुकडे होते. हे माशाचे तुकडे पाहिल्यावर मी त्यांना विनंती केली, ''मैं मच्छी नहीं खाता और मुझे आप जिस प्रकार पत्तोके द्रोण में खाते हो, उस प्रकार से दोगे क्या?'' त्यांनी माझी ताटली दुसऱ्याला दिली आणि एका मोठ्या द्रोणात मला जेवण दिले. माझ्या केलेल्या सेवेमुळे मन भरून आले. गोंडी आदिवासी समाज फक्त भात आणि एक-दोन भाज्या, त्यामध्ये चिंचेचा वापर- एवढेच जेवण करतात.

पुढच्या मुक्कामाच्या वेळी सुरुवातीलाच मी सांगत होतो, 'मैं मच्छी नहीं खाता।' त्यामुळे प्रत्येक ठिकाणी ते मला स्वतंत्र चांगल्या प्रकारे भात, त्यावर चिंचेचा कोळ व भाजी वाढत होते. तिसऱ्या दिवशी तर 'मैं मच्छी नहीं खाता हूँ' असं सांगितल्यावर लहान मुले, दूर उभ्या असणाऱ्या स्त्रिया हसू लागल्या. हसण्याचे कारण विचारल्यानंतर कळाले की, तिथे शाकाहारी व्यक्तीही मासे खाते. मासे न खाणारा माणूस त्यांनी पहिल्यांदाच पाहिला असावा.

दररोज सकाळी अकरा आणि रात्री सात वाजता जेवण होत असे. भूक प्रचंड लागत होती, म्हणून सुरुवातीला भरपूर भात घेत होतो. पण शेवटी-शेवटी आमच्याकडून भात खाल्ला जात नसे. विकास आणि आदर्शने एकदाच भरपूर भात घेतला, पण तो संपेना. त्या लोकांच्या लक्षात आल्यावर त्यांनी सांगितले, ''आपको नहीं जा रहा हैं, तो वैसाही रहने दो।'' पण तिघांनीही नेत्रसंभाषणाने ओळखले- जेवण राखले तर आपुलकीने दिलेल्या जेवणाचा अपमान होईल, म्हणून आम्ही तक्रार केली नाही. आज खऱ्या अर्थाने एकेका घासाची किंमत कळत होती. या लोकांनी कधी भाकरी, वरण, पोळी, तूप असले पदार्थ पाहिले तरी असतील का? पंचपक्वान्नांचे जेवण हे कधी जेवले असतील का? भुकेचा अंदाज नसणाऱ्या, अतिलाडाने लाडावलेल्या, ताटामध्ये भरमसाट अन्न राखणाऱ्या व्यक्तींचा सहवास यांना कधी लाभला असेल का? कुपोषित, अंगावरती वस्त्र नसणाऱ्या या लहान-लहान लेकरांना त्यांची आई मॅगी, बेकरीचे पदार्थ, बोर्नव्हिटा, बाळाची गुटी कधी खाऊ घालत असेल का? असे असंख्य प्रश्न पडत होते.

तिथे पहाटे उठून भातकांडणी करतात. कांडलेला भात सुपाने पाखडला जातो. जमिनीमध्ये जाड लाकडाचा ओंडका पुरला जातो. त्याला अंदाजे पाच सेंटिमीटर व्यासाएवढा गोलाकार आणि अंदाजे आठ ते दहा सेंमी खोल खड्डा काढला जातो. त्या खड्ड्यामध्ये नक्षीदार लाकडी मुसळाच्या साह्याने भात कांडला जातो. भात निर्मितीसाठी घेतले जाणारे कष्ट पाहिल्यानंतर कोणाच्या मनात जेवण राखण्याची इच्छा होईल? भूक भागवण्यासाठी दररोज दोन-तीन तास केलेले कष्ट, मायेने आणि वेळच्या वेळी दिलेले जेवण आम्हाला या पाच दिवसांत कधीच त्रासदायक ठरले नाही.

चौथ्या दिवशी पहाटे सुरेश नावाच्या एका मुलाने आमच्यासाठी घेवड्याच्या शेंगा आणल्या होत्या. त्या दिवशीचे जेवण आमच्यादेखत, आम्ही जिथे झोपत होतो त्याच्याजवळ तीन दगडांच्या चुलीवर तयार केले. वाळलेल्या मिरच्या दगडावर कांडून, थोडे मीठ, द्रोणामधून आणलेले तेल आणि आम्ही सर्वांनी निवडलेले घेवडे यांचे मिश्रण करून सुंदर भाजी तयार केली होती. चार दिवसांत पहिल्यांदाच ओळखीची भाजी खायला मिळाली होती.

सगळे पुरुष पहिल्यांदा एकत्र येऊन जेवण करतात, पण जेवणासाठी कधीच कोणी मांडी घालून बसलेले पाहिले नाही. खेळाडू धावण्याच्या अगोदर रेषेला स्पर्श करण्यासाठी बसतो, त्या पद्धतीने ती माणसे जेवायला बसत होती. मोठा द्रोण भरून भात घेऊन हाताच्या साह्याने भाताचा गोळा करून ते खात. त्यामुळे आम्ही घेतलेल्या भातापेक्षा ते कमी वेळात चौपट खात असत. अवघ्या दोन ते तीन पदार्थांवर आपले आयुष्य काढणाऱ्या या व्यक्तींना समजून घेणे विचारांच्या पलीकडचे होते.

पहिल्या दिवसाच्या रात्री तेंदुपत्त्यांच्या झाडाखाली निळ्या रंगाचा प्लॅस्टिकचा कागद टाकून आम्ही झोप घेतली. आमच्याबरोबर असणाऱ्या व्यक्तींना आमच्यावर लक्ष ठेवण्यास सांगितले होते. दादालोकांच्या सांगण्यावरून त्यांनी आम्हाला मधे झोपवले आणि ते आमच्या दोन्ही बाजूला चिकटून झोपले. एका व्यक्तीने झोपण्याआधी सांगितलं, ‘‘पेशाब लगा तो उठा देना। रात में हमे भागना भी पड सकता है। इसलिए तय्यार रहो।’’ तिघांनी एकमेकांना शुभरात्री अशा शुभेच्छा दिल्या आणि झोपी गेलो. मन मात्र लगेच झोपण्यास तयार नव्हते. रात्रीतच किंवा उद्या आपल्याबरोबर काय होईल, पुढे आम्ही एकत्र असू का, सांगितल्याप्रमाणे आम्हाला खरंच सोडतील का... असे एक ना अनेक प्रश्न पडू लागले होते. शेवटी गुरुचरणी प्रार्थना केली– जे होईल ते आपल्या इच्छेने होवो, असे म्हणत झोपी गेलो.

दररोजच्या सवयीप्रमाणे साडेचारच्या दरम्यान जाग आली. पण आज नेहमीप्रमाणे ध्यान करता येणार नव्हते. कारण आपल्या हालचालींमुळे त्यांच्या मनात संशयाचे विचार नको. म्हणून तसाच पडून राहिलो. काही वेळाने आदर्श उठला. अगोदरच शेकोटी पेटवली गेली होती. शेकोटीला गोंड भाषेत किस्स् म्हणतात. आदर्श त्यांच्याशेजारी जाऊन गप्पा मारत होता. झाडाच्या दुसऱ्या बाजूला इतर काही माणसांनी शेकोटी पेटवली. मी उठून त्या शेकोटीच्या उबेला गेलो. डाव्या हाताला बांधलेली रस्सी हातालाच गुरफटून ठेवली. शेकोटीशेजारी असणाऱ्या माणसाने विचारले, ‘‘आप पुलिसवाले तो नहीं ना?’’ मी ‘नाही’ म्हणून नकारार्थी मान हलवली. नव्या दिवसाच्या प्रारंभी विचारलेला हा प्रश्न पोलिसांची

भीती असणारा वाटला.

सूर्यकिरणांची प्रखरता वाढली होती. शेकोटीतील अग्नीचे अस्तित्व हळूहळू कमी होत होते. एक-दोन व्यक्ती कसल्या तरी काडीने दात घासताना पाहिल्या. आम्हीही त्यांना विनंती करून तशा काड्या मागितल्या. तेंदुपत्त्याच्या काडीने घासलेले दात बळकट आणि शुभ्र होतात, हे अनुभवले. सकाळचे नऊ वाजले. आता गावकऱ्यांशी चांगली ओळख झाली होती. आम्हाला हात-पाय धुवायला सांगितले. तोपर्यंत आमच्याबरोबर असणाऱ्या माणसाने त्याच्या घरातून वर्तमानपत्राच्या पुडीतून साखर आणली होती. थोडे पुढे जाऊन सार्वजनिक कुटीतून चहापावडरचा पुडा आणला. बाहेरून येणाऱ्या पाहुण्याला देण्यासाठी या कुटीत सार्वजनिक साहित्य ठेवले जाते. वैयक्तिक स्वरूपात आदिवासी कधीच चहा पीत नाहीत, परंतु आम्ही शहरातील माणसे म्हणून आम्हाला सकाळी चहा देण्याची व्यवस्था केली, असे त्यांच्या बोलण्यातून कळले. दोन दिवसांपूर्वी आम्ही चहा पिण्यासाठी दूध विकत घेतले होते ते पाच दिवस टिकणारे होते. म्हणून आम्ही म्हणालो, आज आम्ही तुम्हाला चहा करून देतो. तीन दगडांची चूल तयार झाली. एकेकाने कामं वाटून घेतली. चहा सुंदर झाला. सर्व साहित्य असल्यामुळे अंदाजे पाच लिटरचे मोठे अर्धे पातेले भरेल एवढा चहा झाला होता. पेल्यांची सोय झाली. सर्वांना प्रथम पेला भरून चहा दिला. दुधाचा चहा पहिल्यांदाच पिणाऱ्या माणसांच्या चेहऱ्यावरचे समाधान पाहून मन आनंदी झाले.

चहा प्यायल्यानंतर आम्ही चारी बाजूंनी मोकळ्या पर्णकुटीत बसलो होतो. आज बुधवार. वसाहतीतील लोकांचा आनंदाचा दिवस, कारण आज कोंबडा बाजार आहे. प्रत्येक पुरुष, तरुण मुलगा आपल्या लढाऊ कोंबड्याला घेऊन बाजारात जातो. जवळपास असणाऱ्या सर्व वसाहतींतील लोक एकत्र येतात आणि एकमेकांच्या कोंबड्यांची झुंज लावतात. कोंबड्यांच्या पायाला पाठीमागे असणाऱ्या नखाला एक लोखंडी नख लावले जाते. त्या नखाचा वापर करून तो कोंबडा पुढच्या कोंबड्यावर सतत वार करतो. धारदार नखामुळे अनेक कोंबडे जखमी होतात. असह्य वेदनेने एखाद्या कोंबड्याने माघार घेतली, तर तो कोंबडा हरला. जिंकलेल्या कोंबड्याला उचलून घेतले जाते. जिंकल्याचा मोबदला म्हणून त्याला हरलेला कोंबडा आणि काही चलन दिले जाते. हा बाजार आठवड्यातून एकदा भरतो. त्यामुळे त्या स्पर्धेत मिळालेला कोंबडा रात्री जेवणासाठी वापरला जातो. हे एवढेच काय ते त्यांच्यासाठी एकत्रित मनोरंजन आणि आर्थिक मिळकतीचे साधन.

आमच्यावर लक्ष ठेवण्यासाठी नेमलेला माणूस आणि त्याचा मुलगा कोंबडा बाजारात जाताना 'आते है।' असे सांगून आनंदाने गेला. पर्णकुटीमध्ये बसलो

असताना कालची बनियनवाली व्यक्ती आमच्याजवळ येऊन बसली. आम्ही त्यांना 'नमस्कार' असे म्हणालो. आदर्श म्हणाला, ''कल से आप दिखे नहीं?'' बनियनवाला म्हणाला. ''घरमें काम था, इसलिए आ नहीं सका।'' काही वेळ नि:शब्द होतो, शांतता होती. ''आप यहाँ से कहाँ जानेवाले हो?'' असा प्रश्न त्याने विचारला. त्याच्या चेहऱ्यावर दिसणारी शंका स्पष्ट झाली. त्याने कालचेच प्रश्न परत-परत विचारले. आमचा उद्देश आणि आमचे कार्य निश्चित होते. त्यामुळे आमच्याकडूनही कालचीच उत्तरे आली. काही वेळ बसून तो निघून गेला.

आता आमच्याजवळ एकच जण थांबला होता. नुकतेच जेवण झाले होते. विश्रांती म्हणून बाजेवर पहुडलो होतो. तेवढ्यात त्याने आवाज दिला, ''दादालोग आ गये है... दादालोग आ गये है।'' आम्ही करंट बसल्यासारखे ताड्कन उठून बसलो. पर्णकुटीत एकूण तीन बाज होत्या. मधल्या बाकावर मी बसलो होतो. माझ्या डाव्या बाजूला आदर्श आणि विकास बसला होता. पर्णकुटीत वाकून प्रवेश करावा लागत होता. त्यामुळे आजूबाजूचे काहीच दिसत नव्हते. दादालोकांचा प्रमुख वाकून आमच्याकडे पाहत होता. आम्ही उठून 'नमस्ते' म्हणालो. तेव्हा तो आत येऊन माझ्या उजव्या बाजूला असणाऱ्या बाकावर येऊन बसला. ''आपके पास मोबाईल है क्या?'' त्याने विचारले. ''है, पर बंद हुआ है।'' त्याने आदर्शचा मोबाईल घेऊन पाहिला आणि परत केला. आम्ही तिघे नेहमीच्याच प्रश्नांची उत्तरे एकेक करून देत होतो. ''हम से भी उपर हमारा प्रमुख है, उसको पूछकर हम आप को छोड देंगे। कोई चिंता मत करो। आपको इधर से गाववाले अगली जगह ले जाएंगे।'' दादा लोकांचा प्रमुख म्हणाला.

आम्ही विनंती केली- 'हमे जल्दी छोड दो, हमे आगे जाना है।' ''छोड देंगे।'' एवढच. तो म्हणाला आणि आम्हाला 'लाल सलाम' म्हणून निघून गेला.

काही वेळातच आम्हाला दुसऱ्या गावात जायचे आहे, असे म्हणून आमच्या पुढे एक व पाठीमागे एक अशी दोन माणसे आणि आम्ही तिघे मध्ये असे पाच जण जंगलातील पाऊलवाटेने जात असताना एका टेकडीशेजारी थांबलो. काही वेळ तिथे थांबल्यानंतर पाठीमागच्या गावातील दोन माणसांनी आपापसात संभाषण करून ठरवले की, एका माणसाने आमच्यावर लक्ष ठेवायचे आणि दुसऱ्याने गावात जाऊन तिथल्या दोन माणसांना घेऊन यायचे. ही गोष्ट त्यांच्या हालचालीवरून स्पष्ट कळत होती. मागील गावातून येत असताना मी बॅग तपासली, तेव्हा माझा कॅमेरा सापडला नव्हता; म्हणून कॅमेरा कुठे ठेवला आहे, हा विचार सतत करत होतो. बॅग व्यवस्थित तपासून पाहण्याची हीच वेळ होती, म्हणून मी सर्व बॅगा पाहत होतो. तेव्हा विकासचे ओळखपत्र सापडले. त्यावर 'यूपीएससी स्टुडन्ट- स्पर्धापरीक्षा देणारा विद्यार्थी' म्हणून उल्लेख होता. हे जर दादालोकांनी पाहिले, तर त्यांचा चुकीचा समज नको

व्हायला यासाठी आम्ही ते कार्ड फाडण्याचा प्रयत्न केला. पण प्लॅस्टिकचे कव्हर असल्यामुळे त्याचे तुकडे होत नव्हते. आमच्यावर निगरानी ठेवणारा माणूस जवळच असणाऱ्या एका घराजवळ बसलेल्या एका स्त्रीशी संभाषण करत होता. मात्र आमच्या हालचालींकडे त्याचे बारीक लक्ष होते. ओळखपत्र लायटरने जाळण्याचे ठरवले. जाळताना जाळ कमी पण धूर जास्त होत होता आणि तो आमच्याकडे एकटक पाहू लागला. म्हणून आम्ही खाण्याचे साहित्य काढून त्याला दिसेल अशा प्रकारे खाऊ लागलो. तेवढ्यात आदर्शने कार्डाचे लहान-लहान तुकडे केले. आता त्यांचे काय करायचे? इथेच टाकले तर पुन्हा मनात संशय नको, म्हणून लघुशंका करण्यासाठी आदर्श गेला. तो कुठे निघाला आहे, हे तो माणूस बारकाईने पाहत होता. आदर्श मुद्दाम थोडा लांब गेला, तेव्हा तो लगेच उठून आदर्शच्या दिशेने चालू लागला. आदर्शने लघुशंकेचा इशारा केला, तेव्हा तो मागे फिरला. याची जाणीव होती म्हणून योजनेत बदल केला. थोड्या वेळाने विकासने त्या माणसाला हात करून लघुशंका करायला जातो असे सांगितले आणि त्या माणसानेही जाण्याचा इशारा केला. तेव्हा रस्त्याने जाताना विकास एकेक तुंकडा टाकत गेला. ही योजना सफल झाली. सापडत नसणारा कॅमेराही सापडला.

समोरून तीन माणसे येताना दिसली. त्यात एक ओळखीचा चेहरा होता. दोघे आम्हाला पुढच्या गावात घेऊन जाणार होते. मागे जाणाऱ्या व्यक्तींना 'शुक्रिया' म्हणून पुढे निघालो. अंदाजे दोन किमी अंतर पार केल्यावर एका झाडाखाली दोन माणसे बसलेली दिसली. 'इथे थांबा' असे म्हणून आम्हाला सोडण्यासाठी आलेली माणसे पुन्हा पुढच्या दिशेने गेली. संध्याकाळ झाली होती. थंडी वाजू लागल्यामुळे शेकोटी पेटवण्याच्या विचार होता, या नव्या माणसांशी काय बोलायचे, हा प्रश्न म्हणून आम्ही 'किस्स्... किस्स्' म्हणलो. तेव्हा त्यांनी लगेच शेकोटी पेटवली. आपल्याला इथेच रात्र काढावी लागणार आहे, हे समजले. शेकोटीतील अग्नीकडे पाहत कधी शून्यावस्थेत पोहोचलो, ते समजलेच नाही. त्याच कालावधीत तिथे एक गडद लाल रंगाचा टी-शर्ट, काळी स्पोर्ट्स पॅन्ट आणि हिरव्या रंगाची चप्पल घातलेला, पीळदार शरीरयष्टी असणारा तरुण आला. त्याने काही प्रश्न विचारले. त्यावरून त्याला हिंदी चांगली बोलता येते, हे समजले. आम्ही विद्यार्थी आहोत, दर वर्षीप्रमाणे या वर्षीही महाराष्ट्र आणि महाराष्ट्राबाहेर आदिवासी संस्कृती पाहण्यासाठी आलो आहोत, हे समजल्यानंतर त्याने ओळखपत्र तपासले. त्यावरून त्याची खात्री झाली की, हे चुकून दादालोकांच्या व्यवस्थेत सापडले आहेत. ''आप कहाँ पढते हो?'' असे विकासने विचारले. त्याने सांगितले जगदलपूर. ''आपका नाम?'' तो तरुण म्हणाला, ''हुंगा.'' त्याच्याबरोबर त्याचा मित्रही होता. नंतर हुंगाशी आमची चांगलीच मैत्री झाली. नंतर हुंगाने त्याचा जीवनपट आमच्यासमोर

उलगडला. वर्णन करण्याची सुंदर कला त्याच्याकडे होती.

आम्हाला आणखी आत घेऊन जाणार आहेत, हे कळले होते. आमच्याबरोबर हुंगा आणि त्याचा मित्र होता. त्यांच्यातील दोन माणसे ताडीच्या पूर्ण नशेत होती. हातांमध्ये धारदार शस्त्रे होती. नशेत असणाऱ्या माणसांपैकी एकाने गडद लाल रंगाचा शर्ट घातला होता आणि कमरेला लुंगी गुंडाळलेली होती. दुसऱ्या माणसाचे नाव सुरेश होते. सुरेश वयाने तरुण वाटत होता. ते दोघं आम्हाला सतत प्रश्न विचारत होते. प्रत्येक प्रश्नाचे उत्तर देणे गरजेचे होते. कारण ही माणसं दादालोकांच्या जवळची असावीत. त्यांना काहीही बोलणे योग्य नाही आणि विरोध करणे तर शक्यच नाही, त्यामुळे आदरयुक्त संभाषण करत होतो. तिघेही ठरावीक अंतर ठेवून चालत होतो. अंदाजे दीड-दोन किमीचा प्रवास केल्यानंतर वस्तीवरची माणसं दिसू लागली. आम्ही येणार आहोत याची माहिती अगोदरच गावकऱ्यांना कळली होती, असे गोळा झालेल्या जमावावरून लक्षात आले.

पुन्हा नवी माणसे! आपल्याबाबत काय करणार, या विचाराने मन अस्वस्थ झाले होते. माझी सायकल पाहताच दोघे-तिघे सायकल घेण्याचा प्रयत्न करू लागले. एकाने फिरवेल (गिअर) कसा पाडायचा, हे समजावून घेतले आणि सायकल घेऊन फिरू लागला. हे आम्हाला नवं नव्हतं. नव्या वस्तूकडे लक्ष आकर्षित होणे, हा मनुष्यस्वभाव आहे. ती वस्तू आपण वापरून, स्पर्श करून पाहावी, हा मानवी मनाचा गुण-अवगुण म्हणता येईल. पण सायकल चालवून त्यांना मिळणारा आनंद मला समाधान देऊन जात होता. आम्हाला बसण्यासाठी बाज ठेवली होती. अस्वस्थ परिस्थितीत पाणी पिऊन बसणार, एवढ्यात तिथे असणाऱ्या एका माणसाने ''आपमें से एक को उधर बुलाया है।'' दूरवर झाडाखाली काही माणसे बसलेली दिसत होती. कदाचित तिथे कुणी तरी प्रमुख असावा. आदर्शने सहमती दर्शवून स्वत: जाण्याचा निर्णय घेतला. एकट्याला पाठवण्यास मन तयार होत नव्हते. मी म्हणालो, एकट्याने जाणे बरोबर नाही. आदर्श म्हणाला, ''मी त्यांच्याशी व्यवस्थित बोलून घेतो. तुम्ही काळजी करू नका.'' त्याला ''काळजी घे. अडचण आली तर हाक मार,'' असे आम्ही सांगितले.

आदर्श आमच्यापासून दूर जात होता, तसतसे हृदयाचे ठोके वाढत होते. त्याला जाऊन खूप वेळ झाला होता. त्यांच्यात काय बोलणे चालले आहे याचा आम्हाला अंदाज नव्हता. अचानक आरडाओरडा सुरू झाला. काय झाले म्हणून सर्व जण तिकडे पाहायला लागले. थोड्या वेळाने आदर्श आणि त्याच्याबरोबर काही माणसे येताना दिसली. आदर्शने त्या गावातील मुखियाची ओळख करून दिली. शरीराने सडपातळ, काटक, हसरा चेहरा असा मुखिया. त्याच्याशी बोलताना लक्षात आले की, 'जसा राजा तशी प्रजा'. तोही ताडीच्या नशेत बेधुंद होता. कुरळे केस, मध्यम

शरीरबांधा, काळा रंग, उजव्या कानावर बिडी अडकवलेला व फक्त लंगोट परिधान केलेला एक माणूस जवळच उभा होता. अतिरिक्त ताडी प्यायल्यामुळे देहावरील संतुलन सुटलेला. बिडी पेटवण्यासाठी आमच्या बॅगेतून घेतलेले लाइटर चालू-बंद करत होता. 'लाइटर परत कर' असे मुखियाने त्याला सांगितले. ''हमारे बस्तर का नाम खराब हो जाएगा'' असं म्हणताच त्याने लाइटर परत केला. आपण राहतो त्या भागाचा अभिमान बाळगणे आणि त्या जागेचे नाव माणसांनी निर्भीडपणे घ्यावे, असा उपदेश करणारे वाक्य मुखियाने उच्चारले होते. एवढ्या लहान गोष्टीवरून आपल्या वसाहतीचे नाव खराब होईल असे त्यांना वाटत असेल तर ते आम्हाला मारून बस्तरचे नाव कशाला खराब करतील- असा सुखद स्पर्श करणारा विचार मनात येऊन गेला.

''हमे कब छोडेंगें?'' असा प्रश्न विचारताच मुखिया म्हणाला, ''एक-दो दिन तो रुकना पडेगा।''

मी म्हणालो, ''एक-दो दिन कहते कहते तीन दिन हो गये है। हमें हमारे माँ-बाप की याद आ रही है। तीन दिन से उन से कोई बातचित नहीं हुई है। प्लीजऽ हमे जल्दी छोड दो।''

''आपको इधर आना नहीं चाहिए था। शायद आपको एक महिना भी इधर रुकना पड सकता है। कौन जाने, आपको कितने दिन तक रुकना पडेगा। जाओ, आपके रहने की व्यवस्था उधर कर दी गई है।'' मुखिया म्हणाला.

हुंगा आमच्याबरोबर होताच. त्याला 'थँक्स' म्हणालो. हुंगा दुसऱ्या दिवशी जगदलपूरला जाणार होता. त्याची तायक्वांदोमध्ये निवड झाली होती. पुढच्या कार्यासाठी त्याला शुभेच्छा दिल्या. रांगोळी ठरावीक कालावधीसाठीच असते हे माहीत असूनही रांगोळी काढणारा त्याच्याशी एकरूप होतो, तशीच एकरूपता हुंगा आणि आमच्यात साधली होती.

सायकलवरून पुढे जात असताना आदर्शला मघाशी कसला गोंधळ झाला, हे विचारले. ''माझी सायकल चालवण्यासाठी लहान मुले ओढाताण करत होती. ते पाहून मुखिया त्यांच्यावर ओरडला. तेव्हा सगळेच ओरडू लागले. त्यामुळे तुम्हाला भीती वाटली असेल.'' आदर्श म्हणाला.

मगाशी आम्हाला घेऊन जी माणसे आली होती, तीच पुढच्या वस्तीवर सोडण्यासाठी आली होती. नव्या वस्तीवर पोचताच अनोळखी प्राण्याला अथवा सापाला पाहून आपण विशिष्ट अंतर ठेवून भीतियुक्त कुतूहलाने पाहतो, त्याप्रमाणे सर्व लहान मुले पाहू लागली. आम्हाला एका बाजेवरती बसवले. ''अजून दोन बाजा आणा.'' असे सुरेशने सांगितले. बाजा आणल्यावर सुरेश आमच्यासमोर बसला. शेकोटीच्या उजेडात नव्या जागेवरील रात्र कशी असेल, या विचारात मन

भरकटत होतं.

काही लहान मुलं विवस्त्र होती. ''इनको ठंड नहीं लगती क्या?'' मी विचारले. ''इनको आदत हो गयी है।'' सुरेश म्हणाला. ताईंच्या नजरेत असणारा सुरेश अडखळत बोलत होता. त्याने आपला डावा हात पुढे करून दोन्ही बोटांमध्ये झालेल्या जखमा दाखवल्या. लहान मुलांकडे पाहिल्यावर तीही आपल्या हातावर-पायावर खाजवत असल्याचे दिसले. कशामुळे असे होत असेल? यावर काही औषध नाही का? सर्व लहान मुलांच्या अंगाकडे बारकाईने पाहिले असता त्यांच्या अंगावर लहान-लहान पुटकुळ आणि जखमा दिसत होत्या. मनात आले, आपल्याजवळ कॅलामाईन आहे, ते लावले तर? पण जर हे वाढले तर? मग पहिल्यांदा एकाला लावून पाहू, म्हणून सुरेशच्या जखमांना आदर्शने प्रेमळपणे औषध लावले. ते पाहून शेजारी असणारी लहान मुले हळूहळू जवळ आली. हे दृश्य मनाला अस्वस्थ करणारे होते. या लहान मुलांच्या जखमांसाठी आपल्याला काहीच करता येत नाही, या विचाराने मन खिन्न झाले. डोळ्यांत जमा झालेल्या पाण्याने आदर्श आणि माझ्या संवादामध्ये अडथळा निर्माण केला. ''कल सब को दवा लगायेंगे'' असं म्हणताच मुले नाराज होऊन मागे सरकली. आम्ही डॉक्टर आहोत असं त्यांना वाटत होतं.

बोलता-बोलता जेवणाची वेळ झाली. मावंने दिलेले जेवण करून लगेच झोपण्याची तयारी सुरू झाली. वस्तीमधील सर्व माणसे रात्री आठपर्यंत झोपून जातात. परंतु सकाळी चारपासून सर्वत्र हालचाल सुरू होते. आमच्या बॅगा कुठे तरी सुरक्षित जागी ठेवाव्या लागतील, असा विचार करून एका माणसाला विचारले. त्याने आम्हाला बॅगा घेऊन शेजारच्या घरात नेले. बॅगा ठेवण्याअगोदर जवळ असणाऱ्या बॅटरीने जागा पाहिली. घरात एक मातीची चूल होती. घराच्या भिंती मातीने सारवलेल्या होत्या. इतके हे स्वच्छ घर पाहून आश्चर्य वाटले. घराच्या एका कोपऱ्यात चार-पाच भांडी आणि खुंटीला अडकवलेली एक-दोन अंगवस्त्रे होती. आदिवासी माणसे निसर्गाचा वापर गरजेपुरताच करतात. माती, लाकडांची घरे बांधून त्यात अन्न शिजवण्यासाठी लागणारी मोजकीच भांडी आणि अंगसंरक्षणासाठी काही कपडे असतात. काहींच्या घरात लाकडी बाज असते. धान्य ठेवण्यासाठी घराला लागूनच स्वतंत्र खोली बांधलेली असते. शेतीमध्ये लाकडी नांगर, शिकारीसाठी धनुष्य-बाण इत्यादी जीवनावश्यक गोष्टींचा वापर केला जातो. घरात साठवण पद्धत नाही. कमी साधनसंपत्तीत जास्त समाधानी कसे राहावे, हे त्यांच्याकडून शिकावे.

तीन बाजा त्रिकोणी आकारात ठेवून मधल्या जागेत शेकोटी- अशी आमची झोपण्याची व्यवस्था आम्ही केली होती. त्या दिवशी झोप लगेच लागली. आदर्शला

अचानक बारा वाजता जाग आली. शेकोटीचा जाळ विझत आला होता. आदर्शने मला आणि विकासला हाक मारली. फुंकर मारून विझलेली आग पुन्हा पेटवली. आज ३१ डिसेंबरची रात्र... इंग्रजी महिन्यातील शेवटचा दिवस. नव्या वर्षाच्या एकमेकांना शुभेच्छा दिल्या. आम्ही तिघेही नवं आयुष्य, नवे विचार आणि नव्या इंग्रजी वर्षाची सुरुवात करून बाहेर पडणार, असे ठरवले होते. मार्गशीर्ष महिन्यातील तिसऱ्या गुरुवारी रात्री आकाशात दिसणारे टपोरे चांदणे पाहत झोपलो होतो. ती बोचरी थंडी खूप वेळ झोपू देत नव्हती. त्रिकोणात पेटवलेली शेकोटी एक-दीड तासाने विझत होती. रात्री दोन वाजता शेकोटी पेटवण्यासाठी उठलो, तेव्हा डाव्या बाजूला लक्ष गेले. झोपडीशेजारी एक महिला आपल्या रडणाऱ्या बाळाला मांडीवर घेऊन शेकोटीच्या जाळाशेजारी बसली होती. लहान मूल सतत रडत होते. कदाचित थंडी सहन होत नसल्यामुळे ते रडत असावे. आईच्या पदराचीच ऊब त्याला थंडीपासून संरक्षण देणार होती.

दररोजच्या सवयीप्रमाणे पहाटे साडेचारला जाग आली. आज ध्यानाला बसता येईल म्हणून मी आनंदी होतो. ध्यानातून गुरूंच्या अधिक जवळ जाता आले. ध्यानाने खूप हलकेपण जाणवत होते. आदर्श उठल्यानंतर त्याला सांगितले की, आपली सुटका होणार आहे- आपण लवकरच जाणार आहोत. विकास बराच वेळ झोपला होता. अशा ठिकाणीही निवांत झोप लागू शकते, हे विकासकडून शिकता आले. सकाळचे सात वाजले. रात्रभर असणाऱ्या थंडीला सूर्य निरोप देत होता. सूर्याच्या उबेला आम्ही आमंत्रण देत होतो. सुरेश त्याच्या खिशातून एक पांढरा कागद घेऊन आला होता. कालची ताडीची नशा उतरल्यामुळे आज तो प्रसन्न दिसत होता. त्याने विचारले, "तुम्ही नकाशा कसा काढला?" "गुगलच्या माध्यमातून." आम्ही सांगितले. "असाच नकाशा मला काढून देणार का?" असे विचारत त्याने वरच्या खिशातील कागद आदर्शकडे दिला. आदर्शने सर्वांना शिकवत कागदावर नकाशा काढला. सुरेशची खात्री झाली की, नकाशा आम्हीच तयार केला आहे. काल मलम लावल्यामुळे त्याच्या हाताच्या जखमेला फरक पडला होता. "जखम ठीक हो गई है।" सुरेश म्हणाला. सुरेशने चिंचेच्या काड्या दंतून म्हणून आम्हाला दिल्या. दात घासत असताना एकाने सुरेशजवळ येऊन काही तरी सांगितले. "आपको दादालोगोंने बुलाया है। यहाँसे जल्दी जाना पडेगा।" सुरेश म्हणाला.

बॅगा आवरून आम्ही लगबगीने निघालो. आज कोण भेटणार आहे, या विचारात होतो. प्रमुख कसा असेल, तो काय निर्णय घेईल, आम्हाला इथे किती दिवस राहावे लागेल... असे अनेक प्रश्न मनात होते. त्या विचारांतच आम्ही त्या ठिकाणी पोचलो. तिथे आधीच्या भेटीतला माणूस दिसला. त्याच्या शेजारी

दादालोकांचा प्रमुख माणूस गडद हिरव्या गणवेशात बसला होता. पहिल्या भेटीतल्या प्रमुखाच्या जवळ जाऊन हातात हात घेऊन 'लाल सलाम' असे उद्‌गार त्याने काढले. तिथे सर्व लोक एकमेकांना 'लाल सलाम' म्हणतात. आम्हालाही 'लाल सलाम' म्हणत समोरच्या बाजेवर बसण्यास सांगितले. प्रमुखाला मी म्हणालो, ''आपको देख कर अच्छा लगा।'' त्याने हसून ओळख करून दिली. शेजारच्या माणसाकडे हात दाखवत म्हणाला, ''ये हमारे हेड है।'' हे ऐकताच आम्ही उभे राहून त्यांना 'लाल सलाम' म्हणालो. प्रत्युउत्तर दिल्यावर नेहमीचे प्रश्न बाकीच्यांनी विचारले. आम्हीही तीच उत्तरे स्पष्टपणे दिली. प्रमुखाने शांतपणे सांगितले, ''ठीक है, आपको दो दिन रुकना पडेगा। फिर आप को छोड देंगे।''

कालच्या मुखियाने एक महिना सांगितला होता, आज या प्रमुखाने दोन दिवस सांगितले. आम्ही विनंती केली– ''और दो दिन होंगे तो हमारे माँ–बापसे बातचित नहीं होगी। बहुत दिन हो गये है, माँ–बाप चिंतामें होंगे।'' तो म्हणाला, ''ठीक है। हम आपके माँ–बापके साथ बातचित करवायेंगे।'' आम्ही म्हटलं,''हमारे मोबाईलमें चार्जिंग नहीं है। और यहा पे रेंज भी नहीं है।'' प्रमुख म्हणाला, ''ठीक है, हम आपको सब दे देंगे। ऊपरवाले लोग आपकी आयकार्ड की मदद से जानकारी हासिल करेंगे, फिर आपको छोड देंगे। चिंता मत करो। मैं बॅटरीकी व्यवस्था कर देता हूँ। फिर मोबाईल चार्ज करके रेंज में जा कर बातचित करवायेंगे।''

मुखिया समजूतदार वाटला. खरं तर आम्हाला इथून बाहेर पडायचे होते, त्यासाठी चेहरा पाडून आई–वडिलांच्या आठवणीचे कारण सांगून विनंती करत होतो. पण ते निर्णयावर ठाम होते. आम्हाला पुन्हा त्याच जागेवर आणण्यात आले. बाजेवर बसून आम्ही पुढच्या प्रवासाचे नियोजन करू लागलो. आपल्याकडे प्रवासासाठी वीस दिवस होते; त्यातले दहा गेले, आता दहाच शिल्लक होते. आमच्याकडचा खाण्याचा साठाही कमी झाला होता. गेले तीन दिवस बसूनच होतो. काहीच काम होत नव्हते. वेळच्या वेळी जेवण आणि उत्तम पाहुणचार केला जात होता. त्यांच्या या उपकाराची फेड केली पाहिजे, असा विचार आला. आम्ही इथे झाडे लावू शकतो. त्यांच्या कामासाठी हातभार लावू शकतो. पर्याय म्हणून काही काड्या एकत्र करून त्याच्या वस्तू बनवण्याचा प्रयत्न करू लागलो. तेवढ्यात लाल शर्ट घातलेला माणूस हातात शस्त्र घेऊन आमच्याजवळ आला. त्रास द्यायचा असे ठरवून आला होता की काय, न कळे! कोणतीच गोष्ट तो आम्हाला करू देत नव्हता. त्याचा प्रचंड राग येत होता. त्यातून सुटका म्हणून आम्ही झोपेचे सोंग घेतले. काही वेळ थांबून तो निघून गेला, तेव्हा खूप बरे वाटले. काही गोष्टींपासून सुटका मिळवण्यासाठी सोंग घेणे गरजेचे आहे याचा बोध झाला.

सायंकाळची वेळ झाली की, माणसांचा आणि लहान मुलांचा कलकलाट सुरू

होत होता. मुले आता आमच्याशी बोलू लागली होती. त्यांना सायकली चालवायला दिल्या, खाऊ दिला, त्यामुळे ती खूश होती. त्यांच्यासाठी आम्ही परदेशी प्राण्यासारखे होतो. काहीही बोललो की, ती हसत होती. त्यांना एकच गोष्ट पुनः पुन्हा सांगावी लागत होती, कारण भाषेची अजाणता. मुलांच्या चेहऱ्यावरील निरागस भाव वातावरण प्रसन्न करणारे होते. त्या मुलांच्या नि:स्वार्थी भावनेत आम्ही रमून जात होतो. अंदाजे आठ-नऊ वर्षांची ही मुलं आम्ही काय बोलतो, काय हालचाली करतो, हे बारकाईने पाहत होती. त्यातील एकाला हिंदी बोलता येत होतं. त्यांच्याशी बोलत-खेळत कसा वेळ गेला, कळलेच नाही.

जेवणाची वेळ झाली. जेवण करून लगेच झोपण्याची तयारी सुरू झाली. मुलांनी बाजूला आणखी एक शेकोटी तयार केली. शेकोटीसभोवती अंथरूण टाकून सर्व झोपी गेले. आम्ही बाजेवर आणि ती मुले जमिनीवर, हे दृश्य पाहवत नव्हते. परंतु कसलीच हालचाल करता येत नव्हती. आज झालेल्या घटनेवर थोडा वेळ चर्चा करून आम्ही झोपी गेलो. झोप चांगली लागली.

सकाळी ध्यानाची स्थिती उत्तम होती. इंग्रजी नव्या वर्षाचा दुसरा दिवस. आज आपल्याबरोबर काय घडणार? आपण काय करू शकतो, या विचारात होतो. पहाटे उठल्यापासून काही तरी कुटण्याचा लयबद्ध आवाज येत होता. सूर्यप्रकाशाने अंधाराला बाजूला सारल्यावर समजले की, एक स्त्री तांदूळ कांडत होती. गाई-गुरांना सोडण्याची माणसांची गडबड सुरू होती. एक स्त्री डोक्यावरून पाण्याचा हंडा घेऊन जात होती. लहान मुले शेकोटीतील जाळाकडे पाहत होती. वाऱ्यामुळे झाडांच्या पानांचा आवाज येत होता. कुठून तरी पक्ष्यांचा आवाज येत होता. असे ते मोहित करणारे वातावरण होते.

साडेआठ वाजता सुरेश आपल्या हातात एक रेडिओ घेऊन आला. रेडिओवर एखादे न्यूज चॅनल लावण्याचा प्रयत्न करत होता. पण रेंज येत-जात असल्याने रेडिओ कानाला लावून इकडे-तिकडे फिरत होता. इंग्रजी बातम्या लागल्यावर सुरेश तन-मन एकवटून त्या ऐकत होता. ऐकताना त्याच्या चेहऱ्यावरील भावही बदलत होते. एका जागी बसून तो जगभरातील घडामोडी ऐकत होता. सुरेशमुळे न समजणारा संगीतमय आवाज बऱ्याच दिवसांनी ऐकायला मिळाला होता. रेडिओ बंद केल्यानंतर सुरेशने भयभीत आवाजामध्ये एक गोष्ट विचारली, ''मैंने सुना है की, प्रधानमंत्रीने ऐसा कहा है कि मानवरहित विमान छोड कर यहाँ के लोगों को बम्बसे उडाने वाले है।'' हे ऐकताच मी म्हणालो, ''ते असे नाही करू शकत. दादालोकांना मारण्यासाठी निरपराध आदिवासींना का बरे मारतील? आम्ही असे होऊ देणार नाही. त्यांना विरोध करू.'' हे ऐकून सुरेशच्या चेहऱ्यावर समाधान दिसले.

दुपारचे जेवण झाल्यावर सुरेश म्हणाला, ''कल यहाँ से एक औरत बच्चे को गोद

में ले कर गई थी। आपने देखा?'' आम्ही ''नहीं'' म्हणालो. सुरेश म्हणाला, ''वो मेरी बीवी थी और उसके गोद में मेरा बच्चा था।'' आदर्शने आश्चर्याने विचारले, ''आपकी शादी हुई है?'' कारण त्याचे वय लहान दिसत होते. ''तुम्ही घरामध्ये किती जण राहता?'' आदर्शने विचारले. ''मैं, मेरी बीवी और बच्ची.'' सुरेश म्हणाला. ''तो माँ-बाप कहाँ रहते है?'' असं विचारल्यावर ''वो दुसरे घर में है। पर हम एकसाथ काम करते है।'' असं सुरेश म्हणाला. घराविषयी विचारल्यानंतर तो भावनिक झाला होता.

विकासलाही घरची आठवण येत होती. तो घरच्या आठवणीमध्ये बाजेवर झोपला होता. सुरेशने विचारले, ''ये क्यों लेटा हैं?'' आम्ही म्हणालो, ''उसको घरकी बहुत याद आती है। इसलिए वो घर की याद में खोया है। हमे कब छोड देंगे?'' सुरेशलाही त्याबद्दल काही कल्पना नव्हती. एखाद्या गोष्टीच्या विचारामध्ये सतत राहिले असता, त्या गोष्टीचा लळा लागतो.

सुरेश आमच्या दु:खात सामील झाला होता. सुरेशला आम्ही सांगितले, ''मुलीला चांगले शिकव, बायको आणि मुलीची चांगली काळजी घे.'' हे ऐकून सुरेश नि:स्तब्ध झाला होता. तो नवं घर बांधत होता. त्यासाठी मातीच्या विटा बनवाव्या लागतात. 'मी विटा बनवण्यासाठी जातो' असे म्हणून त्याने निरोप घेतला. दुपारच्या वेळी विश्रांती घेऊन झाली, तेव्हा एक माणूस आला. त्याने सांगितले, ''दादालोगों ने आपको बुलाया है। अभी सामान ले कर चलो।'' अचानक आलेल्या निरोपामुळे विचारांचा कल्लोळ निर्माण झाला. आपली सुटका करणार आहेत की काय, असे विचारल्यानंतर दोघे म्हणाले, कदाचित तसाच विचार असावा. आज तिसऱ्या वेळी त्याच वाटेने जाताना 'परत या वाटेने येणार नसून सुटकेच्या वाटेने पुढे जाऊ' असा विचार मनात येत होता. दादालोकांच्या ठिकाणी गेल्यानंतर काल भेटलेला बासागुडातील प्रमुख माणूस गावातील साध्या कपड्यांत आला होता. तुम्हाला कसला त्रास झाला का? प्रमुखाने विचारले. ''हम को टाइमपे खाना देते थे। रहने और खाने की अच्छी सुविधा की थी। इससे और क्या चाहिए?'' आम्ही म्हणालो.

प्रमुखाने विचारले, ''आप को क्या लगता है- हम आपके साथ क्या करेंगें?'' आम्ही म्हणालो, ''आम्ही असे सायकलवरून भारतभ्रमंती करत असता, पुन्हा घरी जाऊन लोकांना आलेले अनुभव व मिळालेली शिकवण सांगत असतो. तुम्ही सोडलेत, तर आम्हाला अधिक अनुभव घेता येईल, शिकता येईल, मदत करता येईल... हे ऐकून ''तुम्हाला आम्ही सोडतो'' असं त्याने सांगितलं. ''सोडण्यासाठी, रस्ता दाखवण्यासाठी आमचा एक माणूस येईल'' असे सांगून प्रमुख माणूस 'लाल सलाम' म्हणाला. आम्हीही 'लाल सलाम' म्हणून निरोप

घेतला.

आनंदाने सायकल वेगाने पळवत होतो. पण नियतीला आम्ही आज चिंतलनारला जावे, असे वाटत नव्हते. वेगात सायकल चालवताना माझ्या सायकलचा गिअर तुटला, त्यामुळे पोहोचेपर्यंत सायकलीचा पॅडल मारता आला नाही. माझ्या सायकलच्या अडचणीमुळे तिघांनाही त्रास सहन करावा लागला.

चिंतलनारला पोचण्यासाठी अजून पंचवीस किमी अंतर बाकी होते. अंधार पडल्यामुळे पुढच्या वस्तीवर मुक्काम करण्याचे ठरले. पुन्हा नवी वस्ती, नवी माणसे, नवे विचार... हे सगळे आम्हाला शिकवण देणारे होते. वस्तीवर पोचलो असता, सर्व माणसे सभोवताली जमा झाली, परंतु इथे आमचा वेगळाच पाहुणचार होता. वस्तीवरील माणसे आम्हाला कॉम्रेड समजत असावीत. आम्ही अधिक संभाषण न करता जेवण करून झोपी गेलो. रात्री आनंदामध्ये तिथे पुढचे नियोजन करत होतो. बोलता-बोलता कधी झोप लागली, समजलेच नाही. इथेही तीन बाजा त्रिकोणी आकारामध्ये ठेवून मधे शेकाटी पेटवून झोपलो होतो. दर एक-दोन तासांनी उठून विझलेली शेकोटी पुन्हा पेटवत होतो. रात्री अचानक जाग आली. घड्याळात पाहिले, तर एक वाजला होता. शेकोटी विझली होती. लाकूडही संपत आले होते. म्हणून लाकूड आणण्याच्या उद्देशाने हातात बॅटरी घेऊन इकडे-तिकडे पाहत होतो. एके ठिकाणी लाकूड होते, ते वाजवीपेक्षा मोठे असल्याने आणणे कठीण होते. त्यामुळे परत आलो, तसाच झोपी गेलो. काही वेळानंतर झोपडीतून कसला तरी आवाज आला. कुणी तरी उठले आहे आणि आपल्या दिशेने येत आहे, हे स्पष्ट जाणवत होते. कसलीच हालचाल न करता तसाच निपचित पडून राहिलो. माझ्या पाठीमागे एक माणूस उभा होता. मी ज्या ठिकाणी लाकूड शोधण्यासाठी गेलो, त्या जागेवर तो जाऊन आला. त्याने हातातून लाकडाच्या एक-दोन फांद्या आणल्या. मी डोळे बारीक करून पाहिले, तर तो एक लहान मुलगा होता. त्याने झोपण्याच्या ठिकाणी लावलेल्या शेकोटीमधून जाळ आणला आणि आमच्या इथली शेकोटी पेटवली. जाळ चांगला लागल्यानंतर तो झोपडीकडे निघून गेला. त्या मुलाला माझे दुःख कसे काय समजले, याचे उत्तर माणुसकीची जाणीव असणारा तो मुलगाच देऊ शकतो.

तीन तारखेच्या सकाळी लवकर निघण्याचे ठरवले होते. चिंतलनार गाव पंचवीस किमीवर आहे, असे गावकऱ्यांनी सांगितले. आमच्याबरोबरच्या माणसाला हिंदी येत नव्हती. त्यामुळे तो संवाद न करता गडबडीने पुढे जात होता. मधेच त्याला ऐत्तल साठवण्यासाठी झाडाला अडकवलेले मडके दिसले. तो लगबगीने झाडावर चढला. अडकवलेल्या मडक्यातील ऐत्तल एका प्लॅस्टिकच्या कॅनमध्ये ओतून खाली आला. कॅनच्या तोंडाला पानाची जाळी लावली. गावातील माणसेही आली.

SENIOR 45719

कॅनमध्ये असणाऱ्या मुंग्या, वाऱ्याने पडलेली पाने जाळीला अडकत होती. आदर्श आणि मी पानाच्या द्रोणमध्ये घेऊन शुद्ध ताजी ऐत्तल पेलाभर प्यायली. याचा परिणाम म्हणजे, अर्धा तास झाल्यानंतर दोन-तीन वेळेला लघुशंकेला जावे लागले. नंतर समजले की, हे पेय मूतखड्यावर रामबाण उपाय आहे.

सायकल चालवणे अशक्य असल्यामुळे प्रवास पायी करावा लागत होता. शरीर थकून गेले असले तरी आमची सुटका सुखावह, मन प्रसन्न करणारी होती. इथे दोन-तीन वेळेला दादालोकांची भेट झाली. परंतु आमच्याबरोबर असणाऱ्या व्यक्तीने त्यांच्याशी संभाषण केल्यानंतर आम्हाला 'लाल सलाम' म्हणून सोडून दिले होते. शेवटी आम्ही सीआरपीएफ कॅम्पमध्ये एका माणसाच्या माहितीवरून गेलो. कॅम्पमध्ये जवानांना आमच्याविषयी काहीच माहिती नव्हती. परंतु पंधरा मिनिटानंतर कॅम्पमधील एक अधिकारी आमच्याकडे आले. ''तुम्हीच ती तीन मुलं का, ज्यांना नक्षलवाद्यांनी अपहरण करून सोडले?'' आम्ही निरागसतेने 'हो' म्हणालो. अधिकाऱ्यांनी चहा-पाणी दिले. फोन करून आई-वडिलांशी बोलायला मदत केली. तेवढ्यात हेलिकॉप्टरचा आवाज कानांवर पडला.

आम्हा तिघांना चिंतलनार सीआरपीएफ कॅम्पमधून दुसरीकडे घेऊन जात होते. सर्वत्र धावपळ, गडबड. आमच्या चारी बाजूंनी असलेले सीआरपीएफमधील अधिकारी आम्हाला घेऊन जात होते. लांबून हेलिकॉप्टरचा आवाज येत होता. त्या आवाजाच्या दिशेने आपण जात आहोत हे कळत होते. काय चालले आहे आणि काय होणार? जवळ गेल्यानंतर समजले की, आपल्याला हेलिकॉप्टरमधून घेऊन जाणार आहेत.

आयुष्यात पहिल्यांदाच हेलिकॉप्टरमध्ये बसलो होतो. त्यातल्या त्यात खिडकीशेजारी बसायला जागा मिळाली होती. माझ्या डाव्या बाजूला विकास आणि त्याच्या डाव्या बाजूला आदर्श बसला होता. आमच्याकडे तोंड करून बस्तरचे आयजी आणि एसपी बसले होते. एसपींनी ओळख करून दिल्यानंतर ते कळले. अचानक झालेल्या या हालचालींमुळे मन अनेक विचारांत गुरफटले होते. हेलिकॉप्टरच्या खिडकीतून पाहिल्यानंतर जंगल अन् काही ठिकाणी आदिवासी वस्त्या दिसत होत्या. मनात विचार आला- जमिनीवरून पाहिलेला वेगवेगळा भाग आकाशातून पाहिला असता एकच दिसतो!

जंगलामध्ये असताना आम्ही पोलीसवाले किंवा पोलीसखबरे नाहीत हे सिद्ध करण्यासाठी संघर्ष करावा लागला आणि जंगलाच्या बाहेर आल्यानंतर आम्ही नक्षलवादी किंवा नक्षलवाद्यांचे मदतनीस नाहीत, हे पटवण्यासाठी संघर्ष करावा लागला. तेथील आदिवासींचाही संघर्ष असाच दुहेरी आहे.

G.M.D. Arts, B.W. Commerce & Science College ★ Sinnar Library